UNIVERSAL
LIBRARY
OU_192130
UNIVERSAL
LIBRARY

# संतकवि तथा शाहीर

लेखक

श्री. यशवंत नरसिंह केळकर,
वाङ्मयविशारद

नोव्हेंबर १९५२ ]

[ किं. १४ आणे

प्रकाशक :

न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.

दि टीचर्स आयडियल पब्लिशिंग हाउस लि.,

७७ शनिवार पेठ, पुणें २ करितां.

●●

आवृत्ति पहिली : १९५२

मुखपृष्ठ चित्रकार—पां. द. पारसनीस

●●

मुद्रक :

न. शं. कुलकर्णी, एस्. टी. सी., टी. डी.

टीचर्स प्रिंटिंग प्रेस,

७७ शनिवार पेठ, पुणें २ करितां.

# प्रस्तावना

प्रस्तुत पुस्तकांत मराठी शाहिरांच्या काव्याची तोंडओळख करून देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रथम शाहिरी वाङ्मयाचें मराठी सारस्वतांतील महत्त्व व त्याचें वैशिष्ट्य सांगून नंतर त्याचा धावता इतिहास कथन केला आहे.

या शाहिरी वाङ्मयांतील पांच प्रातिनिधिक प्रमुख शाहीर निवडून त्यांचीं चरित्रें दिलीं आहेत व त्या सोबतच त्या त्या शाहीर कवींच्या काव्य-गुणाचें आणि त्यांच्या काव्यांत ग्रथित झालेल्या सामाजिक वा राजकीय इतिहासाचें सोदाहरण विवेचन केलें आहे.

पोवाडे वजा केले असतां उरणाऱ्या शाहिरी वाङ्मयांत उत्तान शृंगार व अश्लीलता यांचा भरणा बराच असतो. तथापि तो वगळून किंवा निवडून बाहेर काढल्यानंतर शिल्लक उरणारी काव्यसंपदा इतकी श्रेष्ठ दर्जाची व वैशिष्ट्यपूर्ण आहे कीं, इतर वाङ्मयाप्रमाणेंच त्याचाहि अभ्यास होणें जरूर आहे.

सुमारें पाऊणशें वर्षांपूर्वी शाहिरांच्या काव्यसंशोधनाची सुरुवात महाराष्ट्रांत शाळीग्राम, शितूतांच्या प्रयत्नानें सुरू झाली व आज घटकेस शाहिरांचें छांपील वाङ्मय कमीत कमी चारपांचशें पृष्ठांचें तरी खासच भरेल.

रा. शाळीग्राम यांच्या पुस्तकाच्या पहिल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेंत प्रस्तावना लेखक मि. ऑकवर्थ यांनीं अशी सूचना केली होती कीं, मराठी शाळांतून व इंग्रजी शाळांच्या मराठी अभ्यासक्रमांतून पोवाड्याचें थोडेसें शिक्षण द्यावें. परंतु तो पारतंत्र्याचा काळ असल्यामुळें ती सूचना अर्थातच इंग्रजांनीं कधींहि अमलांत येऊं दिली नाहीं. त्याच सुमारास राष्ट्रीय चळवळीला भरती येऊं लागली होती व म्हणूनच या गतेतिहासाविषयीं स्वाभिमान जागृत करणाऱ्या स्फूर्तिप्रद वाङ्मयाचें संशोधन नेटानें सुरू झालें व कालांतरानें तर या शाहिरी वाङ्मयाचा विषय बी. ए., एम्. ए. च्या अभ्यासक्रमांत समाविष्टहि केला गेला. सध्यां पारतंत्र्य संपून आपण स्वराज्यांतच

पुन्हां आलों आहोंत. अशा वेळीं शाळादिकांपासून या स्वाभिमानप्रवर्तक काव्येतिहासपूर्ण वाङ्मयाची ओळख विद्यार्थ्यांना आस्थापूर्वक करून देणें अत्यावश्यक आहे.

प्रस्तुत पुस्तक याच हेतूनें इयत्ता आठवीसाठीं पुरवणी वाचनास उपयोगी पडावें म्हणून लिहिलें आहे.

शालेय दृष्टीनें पुस्तकाची उपयुक्तता वाढावी म्हणून प्रत्येक प्रकरण वाचून योग्य त्या सुधारणा सुचविण्याचें व प्रकरणाच्या शेवटीं प्रश्न वगैरे जोडण्याचें कार्य प्रा. वा. दा. गोखले एम्. ए., बी. टी. यांनीं आस्थेनें केलें, याबद्दल मी त्यांचा आभारी आहें.

पुणें २. दि. २।११।५२

य. न. केळकर

● ● ●

# अनुक्रम


| | |
|---|---|
| शाहिरी वाङ्मय | १ – १७ |
| १. परशराम | १८ – ३८ |
| २. होनाजी बाळ | ३९ – ५४ |
| ३. अनंतफंदी | ५५ – ६४ |
| ४. रामजोशी | ६५ – ८१ |
| ५. प्रभाकर | ८२ – १०२ |

# शाहिरी वाङ्मय

## शाहीर म्हणजे लोककवि

लावण्या व पोवाडे यांत ग्रथित झालेल्या मराठी सारस्वताला किंवा वाङ्मयाला शाहिरी वाङ्मय अशी संज्ञा देतात. ‘ शाहीर ’ या शब्दाचा मूळ अर्थ कवि असा आहे. तथापि मराठी वाङ्मयापुरतें बोलावयाचें तर त्या शब्दाला कांहीं मर्यादित किंवा विशेष अर्थ आहे व तो हा कीं लोककवि असेल तो शाहीर. मोघम “ कवि ” या शब्दांत संत, विद्वान्, पंडित या साऱ्यांचाच समावेश होतो. त्यांत ज्ञानेश्वरासारखे सिद्ध येतात, मोरोपंत-वामनासारखे संस्कृतज्ञ पंडित कवि येतात व तुकारामासारखे अपंडित असलेले संतकवि येतात. परंतु त्यांना शाहीर किंवा शाहिरी कवि हें नामाभिधान बिलकूल लावतां येणार नाहीं; कारण समाजाच्या प्रवाहाशीं किंवा प्रचलित व्यवहाराशीं त्यांच्या काव्यांचा संबंधच येत नाहीं. धर्म व नीत्युपदेश यांनाच तीं वाहिलेलीं आहेत. एकंदर मराठी काव्य-संभारांत त्या कवींचा पाऊण हिश्यापेक्षांहि अधिक मोठा भाग असला तरी ते ज्या ज्या काळांत वावरले त्या त्या काळच्या समाजाचें चित्र त्यांनीं केव्हांहि कांहींहि रेखाटलेलें नाहीं, अथवा त्या समाजाच्या आशा-आकांक्षा काय असत यांचेंहि वर्णन त्यांनीं कोठें केलेलें नाहीं. भगवद्भक्तींत आणि अध्यात्मांत

लीन झालेले हे सर्व कवि समाजपराङ्मुख होते. शरीरानें ते जिवंत होते आणि लौकिक व्यवहारहि ते करीत होते, तरी त्यांचें सर्व चिंतन अध्यात्म, वेदांत किंवा पुराणें यांचेंच असे.

आतां ही गोष्ट खरी कीं ते कवि मनानें तसे मुक्त होते म्हटलें तरी भौतिक उपाधि त्यांना सुटली नव्हती. शिवाय त्यांनीं वेदान्ताचें विवरण केलें किंवा पुराणांतल्या नीतिकथांचीं किंवा लढायांचीं वर्णनें केलीं तरी तीं लोकांना समजण्याकरितां स्वकालीन दाखले, उदाहरणें, दृष्टान्त देऊनच त्यांना करावीं लागत. त्यामुळें त्यांच्या समाजविन्मुख काव्यांतूनहि त्यांच्या काळच्या सामाजिक व राजकीय इतिहासाचे कण इतिहास संशोधक वेचून काढूं शकतात. रुक्मिणीस्वयंवर या एकनाथांच्या शुद्ध पौराणिक काव्यांत कृष्णाचें व शिशुपालादीचें समर वर्णिलें आहे तें खरोखर पाहतां प्राचीन पुराणकालीन युद्ध-पद्धतीचें नसून, देवगिरीकर यादवांच्या काळांतील युद्ध-पद्धतीचें आहे.

आम्ही आमच्या ‘ ऐतिहासिक पोवाडे ’ या ग्रंथाच्या पहिल्या खंडाच्या प्रस्तावनेंत एका मराठी शाहिराचें असलेंच एक उदाहरण दिलें आहे. तो उतारा असा : “ शितूतांनीं द्रौपदी वस्त्रहरणाचा एक पोवाडा छापला आहे, शके १७२८ रुद्रहावशी । क्षयनाम संवत्सर, रविवाराचे दिशीं । जोडिला ख्याल कार्तिक शुद्ध द्वादशी ” असा रचना काळ पोवाड्याच्या शेवटीं तपशीलवार दिला आहे. म्हणजे इ. स. १८०६ मध्यें हा पोवाडा रचला गेला. या पोवाड्याच्या शाहिरानें, द्रौपदीला कृष्णानें जीं निरनिराळीं वस्त्रें नेसविलीं, त्यांची यादी देतांना, स्वतःच्या काळीं हिंदुस्थानांत प्रसिद्ध असलेल्या सर्व कापड-पेठांची व त्या त्या ठिकाणीं होणाऱ्या विशिष्ट फर्माशी कापडाची न कळत माहिती दिलेली आहे. द्वापार युगांतील कृष्ण, पण त्यानें शाहिराच्या द्रौपदीला ‘ विलाइत, कलकत्ता व बंगाल्याचे पीतांबर ’ सुद्धां नेसविले आहेत. बालसदृश अज्ञानामुळें अडाणी शाहिराच्या हातून हा

कालविपर्यासाचा मोठाच दोष घडला; पण इतिहास संशोधकांच्या दृष्टीनें तोच किंमती मोत्याचा घोस ठरला. ”

अशा रीतीनें इतिहास संशोधकांना या कवींच्या काव्यांवरून तत्कालिन समाजस्थितीची कांहीं तुरळक माहिती मिळूं शकते, हें खरें असलें तरी तेवढ्यावरून त्या समाजाचें विश्वसनीय व सम्यक् दर्शन कांहींच होऊं शकत नाहीं. म्हणून या पूर्वोक्त संत, विद्वान् किंवा धार्मिक कवींची काव्यगंगा ही ‘ उलटी गंगा ’ म्हणजे आकाशगंगाच म्हणावी लागते; कारण ती ज्या काळांतील ज्या समाजांतून वहात गेली त्या काळाचें किंवा त्या समाजाचें प्रतिबिंब तिच्या पात्रांत कोठेंच पडलेलें नाहीं. उलटपक्षीं ‘ लोककवि ’ असलेल्या शाहिरांच्या कवितेच्या पात्रांत मात्र त्यांच्या समकालिन समाजाचीं प्रतिबिंबें दोन्ही तटाकीं अगदीं सजीव असल्यासारखीं स्वच्छ उमटलेलीं आहेत.

## शाहिरांची काव्यसंपदा

वास्तविक लोककवि शाहीर शेंकड्यांनीं होऊन गेले असले पाहिजेत आणि त्यांचा कवनसंभारहि फार प्रचंड असला पाहिजे. असें असतां आज-मितीस शाहिरांची जी पोवाडे, लावण्यादिक काव्यसंपत्ति उपलब्ध आहे, ती, विदग्ध म्हटल्या जाणाऱ्या कवितेच्या मानानें खंडीस रति इतकी स्वल्प किंवा तुटपुंजी आहे. ज्ञानेश्वर, एकनाथ, मुक्तेश्वर, वामनपंडित, मोरोपंत, तुकाराम, नामदेव, श्रीधर, महिपति इत्यादि अनेक कवींचीं जीं काव्यें उपलब्ध आहेत त्यांनींच एखाद्या ग्रंथालयांतील कपाटेंच्या कपाटें भरून जातील. उलट शाहिरांच्या कवितेला त्या कपाटांतील एखाद्या खणाचा कोपराहि मोठा ठरेल. हा सकृद्दर्शनी चमत्कार वाटतो यांत शंका नाहीं; परंतु थोडा विचार केला असतां याचें कारण लक्षांत येऊं शकेल. मराठी भाषा महाराष्ट्रांतील सगळेच लोक बोलतात; परंतु त्या भाषेला वाङ्मयपद मिळत नाहीं. तो मान, ती मराठी भाषा बोलणाऱ्या लोकांपैकीं प्रतिभावान्,

देतात त्याला मिळतो व तेंच भाषेंतलें वाङ्मय किंवा साहित्य म्हणून ओळखलें जातें. शिवाय हे लोक लिहिणारे वाचणारे असल्यामुळें म्हणजे इतरांपेक्षां सुधारलेले असल्यामुळें ते आपलें वाङ्मय किंवा कवित्व कागद व शाई या साधनांनीं चिरंजीव करून ठेवण्याचा उद्योग करीत. उलटपक्षीं शाहिरादि लोककवींना लिहिण्या-वाचण्याचा संस्कार नसे. स्फूर्तीनें त्यांनीं रचलेली कविता प्रथम कंठगत होई व नंतर ती पाठांतरानें एकाकडून दुसऱ्याकडे जात जात, यदृच्छेनें, टिकेल तितके दिवस टिके. त्यांची कविता क्वचितच लेखनबद्ध होई. अशी अवस्था असल्यामुळें आपल्याकडील शाहिरादिक लोककवींनीं खरोखरच पूर्वीं अगणित कवित्व केलेलें असलें तरी तें लेखनबद्ध न झाल्यामुळें बहुतेक नष्ट होऊन गेलें.

पण याचा अर्थ असा नव्हे कीं तें गुणहीन, टाकाऊ होतें. तसें पाहिलें तर केवळ लेखनबद्ध झाल्यामुळेंच, संशोधकांच्या दृष्टोत्पत्तीस येऊन छापून निघालेली कितीतरी कविता गुणानें अगदीं उणी आहे असें आढळतें. गेल्या ४० वर्षांतच इतिहास संशोधकांनीं पूर्वीं अज्ञात असलेले असे खंडोगणती संत किंवा इतर तऱ्हेचे कवि लोकांपुढें आणून उभे केले आहेत. परंतु खरें बोलावयाचें तर त्यांतील बहुतेकांत काव्यलाघव किंवा विद्वत्ता ही अगदींच सुमार आहे. यामुळें ती कविता असून नसून सारखीच, केवळ अडगळच समजावी लागते. विस्मृतीच्या बळदांत खत होत पडलेल्या त्यांच्या रद्दी कवितांचीं बाडें संशोधकांनीं स्वतःच्या व्यसनाची तलख भागविण्या-साठीं, साफसूफ करून पुन्हा जगापुढें मांडली; म्हणून नाइलाजानें 'मराठी वाङ्मय-संभारांत नवीन भर' असा त्यांचा गौरव केला जातो इतकेंच.

लोककवींच्या कवनांतहि असा प्रकार असणारच. पण तेथें एक मोठी सोय होती. ती ही कीं, तेथें गुणहीन किंवा अनाकर्षक असे, तें आधीं फारसें कंठगतच होत नसे व आपोआपच तें विस्मृतीच्या गर्तेत कायमचें गाडून जात असे. तें कंठगत करण्याचें वाङ्मय असल्यामुळें कोणा संशोधकाला

त्याचें नोटेशन म्हणजे लेखी प्रत सांपडण्याची धास्ती नसे. ‘ Survival of the fittest ’ म्हणजे उत्कृष्ट तेंच अवशिष्ट राहावें हाच तेथला न्याय आणि यामुळें शाहीर-तमासगिरांच्या किंवा गोंधळ्यांच्या मुखांत आज जी काय थोडीबहुत शाहिरी कविता शिल्लक उरली आहे ती त्यांतल्या त्यांत चांगली अशीच होती व म्हणूनच ती जिवंत राहिली आहे.

## शाहिरांचें वैशिष्ट्य

शाहीर हे बहुजन समाजाचे उपदेशक, नाटककार, कवि, नट सर्व कांहीं होते. संस्कृतशास्त्री किंवा विद्वान् पंडित यांची विद्वत्ता फक्त विद्वान् लोकांनाच कळे. त्यांच्या ग्रंथांची चर्चा फक्त पंडित सभांतूनच होई. त्यांच्या खालचा दुसरा वर्ग कीर्तनकारांचा व पुराणिकांचा. हेही लोक संस्कृत जाणणारे असत. समाजाला गोष्टींच्या रूपानें, करमणुकीच्या द्वारें धर्माचरणाचा किंवा नीतीचा उपदेश हेहि करीत असत. मात्र कीर्तनसंस्था ही पुराणिकांच्या किंवा प्रवचन-कारांच्या संस्थेपेक्षां केव्हांहि अधिक लोकप्रिय होण्यासारखी होती; कारण त्यांत गायन, वादन, नाट्य, नर्तन इत्यादि सर्व मोहक साधनांचें संमेलन झालेलें असे. तसें पुराणांत नव्हतें. पुराणिकबोवा व्यासपीठावर डांबलेले आणि संस्कृत श्लोक वाचून त्यांचें त्यांनीं गद्यांत निरूपण करावयाचें. तेव्हां पुराणिक स्वतः उत्कृष्ट वक्ता असला तरच तो श्रोत्यांच्या मनांची पकड घेऊं शकावयाचा. याच्या उलट कीर्तनकार स्वतः चांगला विद्वान् किंवा वक्ता नसला तरीहि गायन वादनाच्या जोरावर तो श्रोत्यांना रमवून सोडी. कीर्तनकाराच्या पायाखालचा गालीचा ही एक रंगभूमीच आहे. लावलेल्या आख्यानांतील विविध स्त्री-पुरुषांच्या भूमिका, कीर्तनकार स्वतःच रंगवीत असे. वेष न बदलतां तो कृष्णाची, राधेची, रुक्मिणीची, पेंद्याची वाटेल त्याची भूमिका करून दाखवी. आधुनिक नाट्यकलेच्या सुरवातीस निरनिराळ्या भूमिका निरनिराळ्या लोकांनीं करावयाच्या; फक्त त्यांचीं पदें मात्र सूत्रधारानें म्हणावयाचीं असा प्रघात असे. पण या कीर्तनांत पदेंच काय, आख्यानांतील

सर्व पात्रांचीं भाषणें सूत्रधारच साभिनय करी. बरें, या रंगभूमीला खऱ्या रंगभूमीवरच्या प्रयोगासारखा खर्चहि नव्हता. प्रत्येक गांवांत देऊळ असावयाचेंच. मग थिएटरांना काय तोटा? तसेंच त्यांच्या नाटकाला तिकीट म्हणावें तर तेंहि नाहीं. सगळाच मोफत मामला! वृद्धाकरितां वेदान्त, तरुणाकरितां विविध रसात्मक आकर्षक आख्यानें, बालगोपालाकरितां विनोदी गोष्टी व नकला आणि विविध रसानुकूल गायन वादन अशी सर्वांची सोय एकाच कीर्तनांत सहज होत असल्यामुळें बहुजनसमाजाशीं या संस्थेचा संबंध पंडितसभांपेक्षां पुष्कळ अधिक येई. पण कीर्तन संस्था इतकी आकर्षक असूनहि तिला तमाशांची लोकप्रियता लाभली नाहीं.

हरिदास, कीर्तनकार किंवा गोसावी उच्च वर्णीय ब्राह्मण जातींतलेच असत. रूपकात्मक आख्यानांनीं प्रचलित, सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह करण्याची किंवा प्रचार करण्याची सोय असली तरी कीर्तनांचा उपयोग तशा कामाकडे करावा अशी बुद्धि त्यावेळच्या कीर्तनकारांना होणें शक्य नव्हतें. लोकांना धर्मप्रवण करणें, त्यांना परमार्थ शिकविणें हाच एकमेव हेतु ठरलेला असल्यामुळें रसाळ कीर्तनांतहि एकेरीपणा, कंटाळा येई. बहुजनसमाजाच्या खालच्या थरापर्यंत कीर्तनसंस्था लोकप्रिय न होण्याचीं दुसरींहि आणखी कांहीं कारणें असावींत. कीर्तनकार प्रतिष्ठित, यामुळें खालच्या लोकांना प्रिय होण्याइतका उत्तान शृंगार निर्माण करणें त्यांना शक्य नव्हतें. शृंगार केला तरी तो पौराणिक पदरांतून गाळलेला. चालत्याबोलत्या मनुष्यव्यक्तींच्या शृंगारवर्णनाची लज्जत त्याला कशी येणार? अद्‌भुत पराक्रम वर्णन करावयाचे ते देवादिकांचे. त्यानेंहि सामान्य जनांचें तितकें समाधान होणें शक्य नाहीं. सुसंस्कृत मनुष्यांना अशाहि वर्णनांतून आपल्या कल्पनाशक्तीच्या बळावर रस चाखतां येतो; पण अशिक्षित लोकांना तसें करतां येत नाहीं. त्यांना त्यांच्याचभोंवतीं वावरणाऱ्या साळूचा आणि सुभानरावांचा शृंगार किंवा लाड झगडा दाखविला तरच तो पटणार. देवादिकांच्या अद्‌भुत पराक्रमापेक्षां प्रत्यक्ष चालू लढ्यांत निरनिराळ्या मराठ्यांनीं जे पराक्रम गाजविलेले

असतील त्यांचीच त्यांना केव्हांहि अपूर्वाई. खालच्या बहुजन समाजाची ही अपेक्षा कीर्तन-पुराणापेक्षां शाहिरांच्या फडांत किंवा तमाशांच्या कड्यांत तृप्त होणें शक्य होतें. कीर्तनें देवळांतून व्हावयाचीं. देवळांत ब्राह्मण, शूद्र इत्यादिकांसाठीं बंधनें होतीं. यामुळेंहि तेथें खालचा समाज मनमोकळेपणानें मिसळून समरस होऊं शकत नव्हता.

या सगळ्या अडचणी शाहिरांच्या किंवा गोंधळ्यांच्या तमाशांनीं नाहींशा करून टाकल्या. तमाशे वाटेल तेथें मोकळ्यावर होत. त्यास तिकीट नाहीं आणि प्रेक्षकांत उच्चनीच वर्णांचे भेदहि नाहींत. कीर्तनांत सोंग न घेतां कीर्तनकार एकटाच निरनिराळ्या भूमिकांचा अभिनय करी. तमाशांत तर अनेक पात्रें असून तीं सोंगें घेत व त्यांत स्त्रियांचा अभिनय करणारे खास नाचे पोरे असत. एवढेंच नव्हे तर स्त्रियांचीं कामें प्रत्यक्ष स्त्रियाहि करीत. नाटकाप्रमाणें त्यांत संभाषण, गायन सर्व कांहीं असे. आणि मोठी गोष्ट ही कीं तमाशांतून सर्व भाषण व गायन अस्सल मराठमोळ्या बोलींत चाले. संस्कृत श्लोक घेऊन मग मराठी आर्यांनीं त्याचें विवरण करीत बसावयाचें असा प्रकार त्यांत नव्हता. तमाशांत म्हटल्या जाणाऱ्या सर्व लावण्या-पोवाड्यांचे विषय मराठ्यांच्या नेहमींच्या व्यवहारांतले आणि हुबेहूब वर्णिलेले असत. त्यामुळें आपण पाहतों आहों किंवा ऐकतों आहों तें सर्व आपलेंच चित्र आहे, अशी जाणीव उत्पन्न होत असल्यानें तमाशे ही मराठ्यांची म्हणजे बहुजन-समाजाची सर्वांत आवडती संस्था बनली यांत आश्चर्य नाहीं.

कीर्तनसंस्थेसारखीच बहुजनसमाजाची गोंधळ ही एक संस्था होती. तींत गायन, वादन, नर्तन असून शिवाय कीर्तनकार म्हणजे गोंधळी बहुजन-समाजांतला म्हणजे अशिक्षित माणूसच असे. पण गोंधळ हाहि कीर्तना-प्रमाणेंच धार्मिक प्रकार असल्यामुळें त्यावर बंधनें पडत. तमाशासारखी त्यांत स्वैर आणि मनमुराद मजा लुटतां येत नसे.

सारांश समाजापैकीं शेंकडा पंचाण्णव लोकांचें साऱ्या करमणुकीचें अत्यंत आवडतें आगर म्हणजे शाहिरांचे किंवा तमाशांचे फड एवढें एकच

होतें. आणि त्या संस्थेची लोकप्रियता ओळखूनच पुढें उच्च वर्णीय नामांकित ब्राह्मण कविहि अखेर सारीं बंधनें तोडून तमासगीर बनले. इतकेंच नव्हे तर साऱ्या शाहिरांना मागें सारून स्वतः त्यांचे तुरे बनले. प्रसिद्ध रामजोशी हा व्युत्पन्नशास्त्री कीर्तनकार होता. तसाच अनंतफंदीहि. पण आतां कीर्तनकारापेक्षां शाहीर या नांवानेंच तो चिरंजीव झाला आहे. सर्व शाहिरांचा तुरा प्रभाकर हा ब्राह्मणच होता. बाबू सवाई, रामजोशी, रामचंद्र, बापू कोन्हेर, दादावीर अशीं दुसरींहि अनेक नांवें सांगतां येतात. ती जुनी परंपरा अद्यापहि टिकून आहे असें म्हणतां येईल. कारण परवांपर्यंत गाजणारे बापू पठेराव हे ब्राह्मणच होते व नानिवडेकर, जामखेडकर, खाडिलकर इत्यादि अनेक ब्राह्मण कवि शाहिरकींत आजहि आघाडीस आहेत.

## शाहिरी वाङ्मयाचें स्वरूप

शाहिरी वाङ्मयाचा विभाग सर्व मराठी सारस्वतांत सरस, मोहक व जिव्हाळ्याचा वाटतो. याचें कारण त्यांतील अस्सल देशीपण म्हणजे मराठमोळा होय. दुसरेंहि असें कीं त्या सारस्वतांत इतिहासाचें फार मिश्रण झालेलें आहे. त्यांत जितकें काव्य आहे तितक्याच प्रमाणांत इतिहास भरलेला आहे. मराठेशाहींत निर्माण झालेल्या सारस्वतांत शाहिरी वाङ्मय हाच तेवढा एक भाग मात्र असा निर्माण झाला कीं ज्यानें समाजाचीं सुखदुःखें, त्याचे विचारविकार उत्कटतेनें प्रकट केले.

या वाङ्मयांतील मुख्य रस वीर आणि शृंगार. या दोनहि रसांची भरती राष्ट्राला उन्नतीचे, भाग्याचे, संपन्नतेचे व स्वातंत्र्याचे दिवस लाभतात तेव्हांच येते. शिवाजीमहाराजांपासून पेशवाईच्या अखेरपर्यंत महाराष्ट्राचें वैभव क्रमाक्रमानें वाढत अखेर त्याची परिसीमा झाली. मराठ्यांच्या यशाचे डमले सर्वत्र उठत होते. रोज नवी लढाई, नवी मुलुखगिरी असा तो लढवय्यांच्या पराक्रमांनीं बहरलेला काळ होता. शिवाजीनें स्वराज्य स्थापलें. पेशव्यांनीं त्या स्वराज्याचें साम्राज्य केलें. अशा परिस्थितींत मराठे स्वतःच

भारतीय योध्यासारखे पराक्रम करूं लागले. यामुळें लोकांना साहजिकच त्यांच्याच पराक्रमाचीं वर्णनें गाण्याची इच्छा झाली. स्वकीयांचे ताजे भीम-पराक्रम रोज प्रत्यक्ष दृष्टीसमोर दिसत असल्यामुळें पुराणकालीन वीरांची उसनीं वर्णनें करण्यांत जातिवंत कवींना हौस वाटेनाशी झाली. (साहजिकच आहे; समोर वाहणारी नदी असतां तींत पोहायला पडायचें सोडून तिच्या उगमस्थानीं जाऊन तेथल्या चुळकाभर पाण्यानें आचमन करण्याची कोणास बुद्धि होणार ? )

## काव्यमय जोडपें

पोवाडा व लावणी या जोडप्याचा संसार तें शाहिरी वाङ्मय. पोवाडा हा पुरुष, अर्थात् स्वरूपांत ओबडधोबड; परंतु तो पराक्रमी असतो. त्याला आपत्तींशी झगडून यश मिळविण्यांत आनंद वाटतो. वृत्तीनें कठोर असल्यामुळें लढाया, मुलुखगिऱ्या, दंगे-मारामाऱ्यांत भिसळण्यास त्याला दिक्कत वाटत नाहीं. असें असल्यामुळें पोवाड्यांत वीर पुरुष आणि मुत्सद्दी यांनीं शत्रूंशीं घेतलेलीं झुंजें, गाजवलेले पराक्रम, रचलेलीं कारस्थानें आणि त्यांचे घडलेले बरे वाईट परिणाम यांविषयींचीं शब्दचित्रें मोठीं जोरकस काढलेलीं असतात. या उलट लावणी ही स्त्री असून नाजुक बांध्याची असते. नांवाप्रमाणें लावण्य-संपन्न असते. प्रेमळपणा हा स्त्रीस्वभावसुलभ गुण तिच्यांत उत्कटत्वानें वास करीत असतो. रूपक सोडून सरळ सांगावयाचें म्हणजे पोवाड्याची भाषा आणि रचना ओबडधोबड पण तो अतिशय ओजस्वी असून, त्यांत वीररस रसरसत असतो. उलट लावणीची रचना फार मोहक असते. तिला चालीहि गोड लागतात आणि तींत शृंगार, करुण इत्यादि नानाविध कोमल रस पाझरत असतात. पोवाड्यांत सामान्यतः राजकीय इतिहासच वर्णिलेला असला तर, लावणींत सामाजिक इतिहासाचें प्रतिबिंब पडलेलें असतें. लावण्यांवरून ऐतिहासिक कालांतील समाजस्थितीविषयीं, लोकसमजुतींविषयीं, लोकाचाराविषयीं माहिती कळून येते. मराठेशाहींत समाजाच्या समजुती

व ग्रह काय होते, शकुनावर व मुहूर्तावर लोकांचा किती दृढ विश्वास होता, ज्योतिषांचें केवढें प्राबल्य होतें, विवाह कोणत्या वयोमर्यादेपर्यंत होत होता, स्त्रियांचें शिक्षण कितपत असे, त्यांच्या सौंदर्याच्या व्याख्या काय असत, स्त्रियांचे व पुरुषांचे पोषाख कसे असत, दागदागिने व अलंकार किती व कोणते वापरले जात, नवससायास कोणते व किती केले जात, सास्वा-सुना, नणदा-जावा इत्यादिकांचे परस्पर संबंध कसे असत, गृहसौख्य आणि गृह-व्यवस्था कशीं असत, वाहनें कोणतीं असत, घरांची रचना व मांडणी कशी असे, खेळ कोणते खेळले जात वगैरे शेंकडों बारीक सारीक पण इतिहास-दृष्ट्या महत्त्वाच्या गोष्टींवर लावण्या प्रकाश पाडतात. एकंदरींत असें म्हणतां येईल कीं शाहिरी वाङ्मयाचा कोणताहि प्रकार पाहिला तरी त्यांत इतिहासाचे सुवर्णकण चोहोंकडे सर्वत्र विखुरलेले सांपडतात. आणि या विशेषामुळेंच इतिहासाच्या साधनांत पोवाडे-लावण्यांना बरेंच वरचें स्थान देण्यांत येतें. बखरी या त्यांत वर्णन केलेल्या प्रसंगानंतर अनेक वर्षांनीं ऐकीव माहिती-वरून लिहिलेल्या असतात. पण पोवाडे हे त्या त्या प्रसंगानंतर लगेच रचून तयार झालेले असत. यामुळें त्यांत वर्णन केलेल्या हकीकतींत ढोबळ चुका तरी फारशा नसतात.

आज उपलब्ध असलेल्या पोवाड्यांची संख्या अदमासें तीनशें आहे. त्यांपैकीं शिवकालीन म्हणजे शिवाजीमहाराजांपासून पहिल्या शाहू महाराजां-पर्यंतच्या काळांतले सात आहेत. पेशवेकालीन सुमारें दीडशें आहेत व बाकीचे अव्वल इंग्रजींतले आहेत. अफझलखान-वध, तानाजी, बाजी फसलकर आणि दत्ताजी जाधव येवढे चारच खुद्द शिवाजीमहाराजांच्या कारकीर्दींतील प्रसंगावर आहेत. संभाजी-राजारामाच्या कारकीर्दीसंबंधीं पोवाडा उपलब्ध नाहीं.

दुसरा कालखंड पेशवाईतील पोवाड्यांचा. त्यांची सुरवात पानिपतच्या पोवाड्यांनीं आणि समाप्ति खडकी-अष्टीच्या लढयांच्या पोवाड्यांनीं होते. पहिल्या व दुसऱ्या कालखंडाकडे पाहिलें असतांना सर्वच दृष्टींनीं फार तफावत

दिसेल. पहिल्यांत पोवाडे सात-आठच सांपडतात. दुसऱ्यांत सत्तर-ऐशीं आहेत. पहिल्यांत लावणी एकहि नाहीं. दुसऱ्यांत अगणित आहेत. पहिल्यांत शाहीर गोंधळी किंवा मराठेच असत. दुसऱ्यांत अनेक ब्राह्मण शाहीरहि गाजलेले दिसतील. पहिल्यांतील पोवाड्यांची रचना दुसऱ्यांत अगदी पालटलेली दिसते.

पहिल्यांत शाहीरांनीं आपल्या पोवाड्यांना जवळजवळ गद्यासारखेंच सुलभ असलेलें ओवीवृत्त लावलेलें आहे. तर दुसऱ्यांत अनेक 'अकटबिकट कवनांच्या चाली' आणि रागरागिण्या घुसल्या आहेत. पहिल्या पोवाड्यांना लाभलेले शाहीर खेडवळ, अडाणी असल्यामुळें त्यांची भाषा तडफदार पण रांगडीच आहे. याच्या उलट दुसऱ्या काळांतील लावण्या, पोवाडे रचणारे शाहीर व्युत्पन्न-पढीक-विद्वान् ब्राह्मणहि असल्यामुळें त्यांनीं शाहिरी वाङ्मयांत पुष्कळ गीर्वाण वाणी पसरून देऊन तिला ललित बनविलें आहे.

तिसरा कालखंड अव्वल इंग्रजींतील पोवाड्यांचा. महाराष्ट्राच्या पेशवाईरूप स्वराज्य-सूर्याला इंग्रजांच्या ग्रहणाचा स्पर्श सन १८१८ पूर्वींच झालेला होता व त्याची काळी छाया हळूहळू त्या बिंबावर पसरत चाललेली होती. तत्कालीन 'जाणे ज्योतिषांना' म्हणजे मुत्सद्यांना याची वार्ता होती. किंबहुना अनेक वेळां त्यांनीं ती बोलूनहि दाखविली होती. परंतु त्या संकटाचा प्रतिकार करण्याची पात्रता मात्र एकाच्याहि अंगांत राहिली नव्हती. याच्या उलट महाराष्ट्रांतील सामान्य जनतेची स्थिति अगदीं मूढ पशु-पक्ष्यांसारखी होती. सूर्याला ग्रहण लागून तो काळा ठिक्कर पडेपर्यंत पशु-पक्ष्यांना त्याची कल्पनाहि नसते आणि म्हणूनच त्यांचें फिरणें, ओरडणें, उडणें, बागडणें, चिवचिवणें नित्याप्रमाणें अनिर्बंध चालू असतें. पण ग्रहण पूर्ण होऊन 'सूर्या मावळला, बुडालें आभाळ' अशी जाणीव त्यांना झाली कीं ते चकित होतात, घाबरतात आणि दुःखानें शब्द करीत सैरावैरा धावूं लागतात. तीच स्थिति पेशवाई अखेरीस मराठे जनतेची झाली व तीच तिनें आपल्या मुखानें म्हणजे शाहिरांच्या पोवाड्यांच्या रूपानें बोलून दाखविली. 'काशीपासून राज्य एक-

छत्री ' अशी कालपर्यंत ज्या पेशवाईची आम्ही अभिमानानें स्तुति-स्तोत्रें गात होतों, ' ज्यांनीं पुण्याकडे विलोकिलें ते संपत्तीला मुकले ' अशी जिची ख्याति, ' ऐरावत बांधून आणतिल, प्रसंगीं इंद्राचा ' ही जींतील पुरुषांची ईर्षा ती पेशवाई एका फुसक्या लढाईनें नेस्तनाबूत झाली आणि तिच्या जागीं इंग्रजांची नवी मुद्रा उभी राहिली ! आतां ' कोणीकडे जावें, काय खावें, कोणाच्या बळे रहावें ', अशी दुःखाची, वैतागाची, भयचकीत-पणाची संमिश्र भावना सन १८१८ नंतर लगेच झालेल्या पोवाड्यांतून दृष्टीस पडते.

इंग्रजी अमल जारी झाला आणि त्याबरोबर महाराष्ट्राचें राजकीय व सामाजिक स्वरूप पार बदलून गेलें.

" तलवार बापडी " होऊन ' फिरंगीछडी ' दुनियेवर फिरावयास लागली, आणि

" तप तेजाचा सूर्य उदयला जशा चांदण्या गेल्या हरपून ।
तसे पृथ्वींतील निर्वीर्य राजे शूरत्व अंगीं गेलें करपून "

अशी सरदारांची स्थिति झाली. बाजीराव तर केव्हांच स्वराज्य अर्पून बसला होता. शाहीर म्हणतो—

" अशाश्वत जाणुन देई स्वराज्य गोपीचंद ।
विदेही झाले सोडुनि सर्वहि फंद । "

शिंदे-होळकरासारखे वीर पण त्यांची स्थिती

" जसे बाहुले भिंगाला " अशी झाली होती. इंग्रजांनीं

" हत्यारें न् पात्यारें मुलखांतली चटसारी " नेल्यामुळें,

' जे पंचहत्यारि होते आपल्या लावणींत ।
ढाल तलवारा ठेवल्या घरच्या गोणींत '। ही शिपायांची स्थिति,

' तीन लाख फौज ज्या ठायी । तिथें एक शिपाई नाहीं '

ही पेशव्यांच्या राजधानीची स्थिति! चवरंग, पलंग गेले आणि खुर्च्यांना किंमत आली! भरगच्ची मंदिल, चिरे, शाला, दुशाला यांना कोणी विचारीना; डगल्या टोप्यांचा प्रसार झाला. मशाला विझल्या, कंदील लागले; नालख्या-पालख्या संपल्या आणि त्यांची जागा मेण्यांनीं घेतली. अबदागिरी गेल्या आणि छत्र्या उघडल्या. सारांश, " जुने कायदे अगदि मोडले जधिपुन झाली इंग्रेजी. " पण जुने कायदे इंग्रजांनीं मोडले तरी त्या ऐवजीं आपले नवे कायदे सुरू केले होते. कडक शिस्त, टापटीप, कामाचा उरक, न्यायाचा कडकपणा व यंत्रकलेचे चमत्कार इत्यादिकांच्या जोरावर त्यांनीं तत्कालीन समाजाला असें चीत आणि चकित करून सोडलें होतें कीं विचारतां सोय नाहीं. घटोत्कचाच्या मायावी बाजारासारखें इंग्रजीं राज्य त्यांना अघटित वाटत होतें.

" कला कुशल हिकमती जाणतो ईश्वर कळनाकळ ऐशी ।  
दहा हस्तीशी काम ढळेना, एक माणूस हलवी त्याशी । "

" छत्तीस कारखाने घरीच करतो इतरांची ना धरी आस्ता । "

" झाला इंग्रजी अंमल फिरलि कुंपनिची द्वाही ।  
सद्दी त्याची बळकट, त्याला राम परसन हाओ । "

" बाच्छाओ न् मऱ्हाटे राजे होउन गेले माप ।  
अवघ्याहुन कल्पना अधिक बसविली छाप । "

अशी आश्चर्यचकित होऊन शाहिरांनीं वर्णनें केलीं आहेत..

स्वराज्यनाशानंतरच्या पहिल्या वर्षांत जे पोवाडे झाले त्यांत गत स्वराज्याबद्दलची हळहळ हाच मुख्य विषय दिसतो, यांत आश्चर्य नाहीं. नंतर इंग्रजी आंगवळणी पडल्यावर त्यांच्या शिस्तीची जी छब पडली त्या पाहिल्या रंगांत इंग्रजांची स्तुति भरलेली आहे. या काळांत पेशवाईंत पुण्याला जें महत्त्व होतें तें मुंबईकडे गेलें व पेशव्यांचें महत्त्व इंग्रजांकडे गेलें. यामुळें साहजिकच इंग्रजांचें व मुंबईचे पोवाडे झाले.

सन १८१८ नंतर स्वराज्य संपलें आणि त्याबरोबर पोवाड्याची निर्मिति घटत चालली. इंग्रजांच्या आरामराज्यांत कांहीं पोवाडे झाले; पण त्यांत राम राहिला नाहीं. सन १८१८ नंतर खास इंग्रजी अमलांत जो प्रदेश होता त्यांत तर फारच थोडे पोवाडे निर्माण झाले आणि ते निर्माण होण्याचें कारण तरी पेशवाईतले शाहीर सन १८४४ पर्यंत जिवंत राहिले हेंच होय! प्रभाकर आणि परशराम हे अनुक्रमें १८४३ व १८४४ सालपर्यंत जिवंत होते. त्यांनीं स्वराज्यांत जिथें फुलें वेचिलीं तिथेंच आतां त्यांना गोवऱ्या वेचण्याचा प्रसंग आला होता. स्वराज्यनाशाच्यां उलटापालटींत त्यांचा सर्व आधार तुटला आणि कर्जानें पिडून अन्नाला महाग होऊन पोटाकरितां दारोदार भटकण्याचा वख्त त्यांच्यावर गुदरला होता. पोटाची व्यथा मोठी कठीण आहे. या पोटाकरितां त्यांना वाटेल त्या लुंग्यासुंग्या लोकांची खुशामत करण्याचा प्रसंग आला. ज्यानें पेशव्यांच्या दरबारचा कडाका गायला त्याला त्याच तोंडानें स्प्रिंगल साहेबाच्या मोजणी हपीसाचा पोवाडा गावा लागला. ज्यानें सवाई माधवरावाच्या रंगाचीं आणि बाजीरावाच्या विलासाचीं वर्णनें उल्हासानें आळविलीं त्याला आतां बकाल मुंबईमधल्या शोकी मंडळींच्या पानचट लीला घोकण्याचा प्रसंग आला. ज्यांनीं नाना-महादजींचा गौरव केला त्यांनाच आतां साष्टी येथील कलेक्टर हपिसांतल्या मंडळींचीं स्तुति-स्तोत्रें म्हणावीं लागलीं किंवा ज्यांनीं आत्मस्फूर्तीनें परशराम भाऊ, बापू गोखले यांचे पराक्रम तोंडभर गायिले त्यांनाच आतां मुंबईतल्या पेस्तनजी शेटजीची चाटुस्तुति करावी लागत होती. सारांश, पेशवाईतले जे शाहिर जिवंत राहिले होते त्यांनीं पोटाकरितां कांहीं पोवाडे रचिले हेच काय ते मुख्यतः इंग्रजी अमलांतले पोवाडे. ही शाहिरांची पिढी नष्ट झाल्यावर मात्र शाहिरी कवितेची नदी बहुतेक कोरडी ठणठणीत पडली.

वर सांगितलेल्या काळांत इंग्रजी मुलखांत जे पोवाडे झाले म्हणून सांगितलें त्यांतले कांहीं सरस असण्याचें कारण त्यांत खुद्द स्वतःच्या डोळ्यांनीं पेशवाई पाहिलेल्या शाहिरांची करुणभावना उत्कटतेनें व्यक्त झालेली आहे,

हें होय. हे पोवाडे गातांना क्षणोक्षणीं त्यांना पेशवाईची आठवण येत होती आणि ते टिपें गाळीत होते.

‘ मनुष्यमात्रादिकांचें माहेर होति पेशवाई ’

‘ ते गेले दिवस हे आले मोठया कहराचे ।
निरुपाय प्याले प्यावे अतां जहराचे । ’

‘ सकळ रायांत म्हणविती श्रेष्ठ जे राय ।
दिवस सोन्याचा दर्शने जयाच्या जाय ।
असले गेले टाकून हवेल्या पागा ।
खराटे झाले उदकाविण सुकल्या बागा । ’

‘ स्वकर्म आचरणारे अभय जे बळि सर्वा ठायीं ।
पहा त्यांचे वंशज हिंडती पृथ्वीवर पायीं ! ’

‘ श्रीमंत गेल्यापासून मिळेना अन्न कोठें बाहेर ’

इत्यादि चटका लावणाऱ्या उद्गारांत पेशवाईबद्दलचें त्यांचें प्रेम वळवाच्या सरीप्रमाणें कोसळलेलें दिसतें.

इंग्रजांनीं पेशवाईचा वृक्ष मुळापासून उपटून टाकला. तरी त्याच्या सरदार-शाखा तोडून टाकल्या नव्हत्या. पेशवे नष्ट झाले होते. परंतु ‘ पेशव्यांच्या कृतीवर बावन सरदार शिंदे, होळकर वाढले भारी ’ असे सरदार अजून आपआपल्या संस्थानांवर अधिष्ठित होते. शिंदे, होळकर, गायकवाड, कोल्हापूरकर यांच्यांशीं इंग्रजानीं तह करून त्यांना राखले होते. शिवाय मराठ्यांचें समाधान करण्याकरितां सातारकरांचें स्वतंत्र असें संस्थानहि त्यांनीं निर्माण करून ठेविलें होतें. स्वराज्याचा आभास उत्पन्न करणाऱ्या या संस्थानांतून पोवाड्यांची परंपरा थोडी बहूत टिकली. पण त्या पोवाड्यांतलें तेज केव्हांच नष्ट झालें होतें. तोडून टाकलेल्या झाडाच्या फांद्या कांहीं दिवस ओल्या रहातात पण त्यांना फलपुष्पांचा बहर येणें शक्य नसतें. असल्या

संस्थानिकांनीं आश्रय दिलेल्या शाहिरांनीं पांच-पंचवीस पोवाडे रचलेले आहेत. ऐतिहासिक माहितीच्या दृष्टीनें त्यांची किंमत कितीहि असो, पण पोवाड्याचें म्हणून जें वैशिष्ट्य तें मात्र त्यांत यत्किंचितहि उरलें नाहीं. याला शाहीर तरी काय करणार आणि संस्थानिक तरी काय करणार ? पोवाड्याचें आदिकारण जो पराक्रम त्याचा साक्षात्कार कोठेंच दिसून येत नव्हता. फौजा नाहींशा झालेल्या होत्या, हत्यारें गंजून गेलीं होतीं, मुलुखगिऱ्या संपल्या होत्या, लढाया नामशेष झाल्या होत्या. ‘ शूर मर्दांची दाली बुडाली करूं लागले मजुरी ’ असा शिपायांवर प्रसंग आला होता. आणि ‘ मोठेमोठे उमराव धारकरी ’ पण, ‘ राव्यापरि पिंजऱ्यांत कोंडले मायेणीचा चंदिचारा ’ अशी त्यांची स्थिति झाली होती. येऊन जाऊन संस्थानिकांचे पराक्रम म्हणजे कागदी घोडे नाचविणें, लाटसाहेबांच्या भेटी घेणें, त्यांना मेजवान्या देणें, जुना आव आणून पोकळ स्वाऱ्या मिरविणें, हे किंवा असलेच कांहीं तरी होते. आणि यावर त्या उदरार्थी शाहिरांनीं पोवाडेहि रचले. परंतु एखाद्या राजसौधावरील रत्नजडित पिंजऱ्यांतल्या पोपटाची एखाद्या भिकाऱ्याच्या घरच्या पिंजऱ्यांतल्या पोपटानें स्तुति करून त्याच्या वीतभर रत्नखचित वासयष्टीचें, उंदराच्या कानाएवढ्या रुप्याच्या वाटीचें आणि सोलून ठेवलेल्या मूठभर डाळिंबांच्या दाण्यांचें विशाल कल्पना करून वर्णन करावें किंवा तो चोंच वासून त्या काठीवरून उपडा पडला म्हणजे त्याची पोटभर स्तुति करावी, इतकीच त्याची योग्यता. त्यांत स्वतंत्र वनवृत्ति कोठून प्रकट होणार ? इंग्रजींतील बंदिस्त खुराड्यांतील एकेका कप्प्यांत कोंडलेल्या त्या निरुपद्रवी राजबिंड्या कबुतरांच्या पोवाड्यापेक्षां शंभूमहादेवाच्या डोंगरांत वाटमाऱ्या करणाऱ्या किंवा दरोडे घालणाऱ्या उमाजी नायकाचे किंवा हरि रामोशाचे पोवाडे अधिक जीवंत आहेत. याचा अर्थ तरी तोच. त्यांचा धंदा कितीहि वाईट असला तरी त्यांत जिवंत पराक्रम होता आणि म्हणूनच शाहिरांनीं स्वयंस्फूर्तीनें रचलेले त्यांचे पोवाडे सरस वठले आहेत.

आणि नांवें मोठीं नि लक्षणें खोटीं असल्या या संस्थानिकांच्या पोवाड्यांपेक्षां उमाजीनायकासारख्या दरोडेखोराच्या नांवावरच गोंधळ्या-भराड्यांना आपलीं पोटें अजूनहि भरतां येत आहेत.

## अभ्यासाच्या वाटा

( १ ) शाहीर व इतर कवि यांच्या काव्यांतील मुख्य फरक कोणता ?

( २ ) शाहिरी काव्यें संख्येनें कमी कां ?

( ३ ) कीर्तनकार, प्रवचनकार यांपेक्षांहि शाहीर अधिक लोकप्रिय कां झाले ?

( ४ ) शाहिरी वाङ्मयाचे मुख्य दोन प्रकार कोणते ? त्या प्रत्येक प्रकाराचें वैशिष्ट्य काय ?

( ५ ) शाहिरी वाङ्मयाच्या तीन खंडांतील दिसून येणाऱ्या काव्य-निर्मितीचा थोडक्यांत परामर्श लिहा.

( ६ ) " स्वराज्यनाशानंतर निर्माण झालेल्या शाहिरी वाङ्मयांतील मूळचें तेज नष्ट झालें होतें." चर्चा करा.

---

# परशराम : . : १

परशराम हा जातीनें शिंपी. त्याचें आडनांव, फार काय त्याच्या बापाचेंहि नांव उपलब्ध नाहीं. त्याच्यासंबंधीं जी काय माहिती आज आपणांस मिळाली आहे ती फारा वर्षांपूर्वी श्री. शाळीग्राम यांनीं परशरामी लावण्यांचें जें पुस्तक छापून काढलें त्यांत दिलेल्या चरित्रावरूनच होय. ती माहिती सुद्धां स्थलकालादिकांच्या बाबत निःशंक विसंबण्यासारखी नाहीं. जुन्या वृद्ध माहितगार लोकांच्या तोंडून आठवणी ऐकून घेऊन मग शाळीग्राम यांनीं परशरामाच्या चरित्राचा जमेल तसा आराखडा तयार केला. तथापि माहिती सांगणारे लोक तमासगिरांच्याच पेशांतले किंवा तमाशांचा शोक असलेले वृद्ध वृद्ध गृहस्थ असल्यामुळें त्यांनीं सांगितलेल्या हकीकती स्थूलरूपानें विश्वसनीय म्हणावयास हरकत नाहीं. त्या माहितींत इतिहास संशोधकांनीं उपलब्ध केलेल्या विश्वसनीय माहितीची आणि खुद्द परशरामाच्या कवनांत उल्लेख झालेल्या माहितीची भर घालून परशरामाच्या चरित्राचा नवा आराखडा काढतां येतो.

गोदा कांठीं वावी म्हणून गांव आहे, तें परशरामाच्या घराण्याचें वसतिग्राम. या गांवाभोंवतीं आसपास मायगांव, वेळापूर, तास, मोरोसी, धामोरी, कोळगांव, सांगवी, मंजूर इत्यादि गांवें आहेत. परशरामाचा जन्म वावीं येथें सन १७५४ सालीं झाला असें सांगतात. त्याचें जन्मटिपण त्याच्या जन्मकाळीं लिहिलेलें असण्याचा संभव बिलकूल नाहीं; कारण खेडेगांवच्या एका सामान्य शिंप्याच्या मुलाचा जन्मकाळ कोण कशाला टिपून ठेवणार ? पण परशराम हा पुढें एक विख्यात 'वरदी' कवि व शाहीर म्हणून प्रख्याति

पावला व अत्यंत वयस्कर होऊन ९० व्या वर्षी वारला. तेव्हां मृत्यु समयींच्या त्याच्या उमरीवरून त्याचा जन्मशक लोकांनीं काढला. मरणसमयीचें परशरामाचें वय जर बरोबर असलें तर अर्थातच त्याचा जन्मकाळ सहज काढतां येतो. तो १८४४ सालीं ९० व्या वर्षी वारला. म्हणजे त्याचा जन्म सन १७५४ येतो. तो नानासाहेब पेशव्यांच्या कारकीर्दींत जन्मला. पानपतच्या लढाईचे वेळीं तो सहासात वर्षांचा असेल.

परशरामाच्या वडलांचें नांव काय होतें तेंहि कोणास माहीत नाहीं. परंतु ते शिंप्याचा धंदा करीत असावेत असें वाटतें; कारण परशराम हाहि आपला वडलार्जित शिंप्याचाच धंदा करीत होता असें चरित्रकार सांगतात. परशरामाची गृहस्थिति काय होती? त्याला गांवांत कांहीं घर किंवा शेत-जमीन होती कीं काय? त्याचे वडील, परशराम अल्पवयीच असतांना वारले कीं काय? इत्यादि खुलासा करणारी विश्वसनीय माहिती कोणीच देत नाहींत. मात्र तर्क असा करतां येतो कीं त्याचे वडील त्याच्या लहानपणींच वारले असावे. वयाच्या पंधरा सोळाव्या वर्षींच परशरामानें भंजूर गांवानजीक जंगलांत एक विठोबाचें पडकें देऊळ होतें त्यांत जाऊन सात दिवसपर्यंत कडकडीत उपोषण केलें व ज्ञानेश्वरीचें पारायण केलें व तेव्हांच त्याला विठोबाचा साक्षात्कार झाला, अशी आख्यायिका आहे. त्यावरून वडलांच्या मृत्यूनंतर तो वैराग्य येऊन कोणा भगवद्भक्तांच्या संगतींत रमूं लागला असावा.

त्याचें जें चरित्र लोकांना माहित आहे तें, त्याला साक्षात्कार होऊन तो कवित्व करूं लागला तेव्हांपासूनचें. परशराम आपल्या प्रत्येक लावणीच्या शेवटीं स्वतःच्या नांवाच्या आधीं 'नामी विठ्ठल,' 'नामें विठ्ठल,' किंवा 'वरदी विठ्ठल' असा उल्लेख करतो; तो जंगलांत ज्या विठ्ठलाचा साक्षात्कार त्याला झाला त्याच्या विषयींचा परमादर दर्शविण्याकरितां, अशी एक आख्यायिका आहे, तर विठ्ठल खत्री किंवा विठोबा खत्री नांवाचा इसम

परशरामाचा मोक्ष गुरु होता व लावण्या-पोवाडे रचून नामसेवा करण्याचा आदेश त्यानेंच परशरामाला दिला, अशी एक दुसरीहि आख्यायिका आहे. साक्षात्काराच्या आख्यायिकेपेक्षां विठोबा खत्री नांवाचा त्याचा कोणी कवि असलेला इसम साक्षात् गुरु होता हेंच अधिक वास्तव धरून चालण्यास हरकत नाहीं. इतर अनेक शाहिरांच्या कवनांतहि त्यांनीं आपआपल्या नांवाचा उल्लेख करण्याआधीं आपल्या गुरूचा उल्लेख केलेला सांपडतो, हें एक त्यास प्रमाण आहेच. परशरामानें तमाशाचा धंदा तरुण वयांतच सुरू केला असावा. तो स्वतः कवि असल्यामुळें लोकांच्या लावण्या म्हणण्याची त्याला गरज नव्हती. सुरवातीस कांहीं दिवस विणा हातीं घेऊन पदांच्या सुंदर चालींनीं स्वतःच लावण्या म्हणाव्या अशी त्याची रीत दिसते. पण पुढें त्याला निरनिराळे चांगले गाणारे जोडीदार मिळाले. तमाशा म्हटला म्हणजे नाच्यापोऱ्या, सोंगाड्या आणि इतर गाणारे, री ओढणारे आणि साथ करणारे साथीदार लागतात. परशरामाच्या तमाशांत ती सगळी भरती होतीच. बाबा सातभाई, मलुराज, नारायण, सका शिंपी, भवानी तेली ऊर्फ बाकेराव, बापू, रामा कुंभार, गोविंद सोनार, बाबाजी शिंपी, येसू, रामकृष्ण, महादू वगैरे नांवें त्याच्या साथीदारांत नमूद आहेत. यांपैकीं भवानी तेली ऊर्फ बाकेराव हा पुढें फार विख्यात झाला. असें सांगतात कीं, मरणाच्या दिवशीं परशरामानें त्याच्या डोक्यावर हात ठेवला व हा पुढें नांव काढील म्हणून आशीर्वाद दिला.

श्री. शाळीग्राम यांनीं बाकेरावाची माहिती देतांना बाकेरावाचा जन्म १८१७ सालीं झाला असें सांगितलें आहे. परंतु दुसऱ्या बाजीरावाच्या स्वहस्तें लिहिलेल्या खाजगी जमाखर्चांत पुढील दोन नोंदी आढळतात. पहिली नोंद-समान मयातेन जिल्हेज उर्फ माघ, छ २६ जिल्हेज म्हणजे २४-२-१८०८ ची आहे. त्यांत '५०० रुपये बाकेराव यांस देविले रुपये ते खर्च असेत,' असें लिहिलें आहे. दुसरी नोंद-तिस्सा मयातेन छ १७ रबिलाखर म्हणजे १२ जून १८०८ ची आहे. त्यांत '१५०० रुपये

बाकेराव यास खर्चाबद्दल देविले ' असें म्हटलें आहे. यावरून शाळीग्रामांनीं दिलेली माहिती उघडच चूक ठरते. एवढेंच नव्हे तर १८०८ सालीं तो चांगला कसबी तमासगीर असला पाहिजे. म्हणजे त्याचा जन्म शाळीग्राम म्हणतात त्या प्रमाणें १८१७ चा नसून निदान १७९० पर्यंत तरी मागें न्यावाच लागतो. या खेरीज आणखीहि एक नोंद त्रिंबकजी डेंगळयाच्या जमाखर्चांत सांपडते. तींत ' १०० रु. भवानी नाच्या यास दुपट्टा देविला छ ४ सफर ' असें म्हटलें आहे. ती नोंद अशरमयातेन फाल्गुनांतील आहे म्हणजे तिची ता० १०-३-१८१० अशी येते.

कोल्हारकरांनीं छापलेल्या परशरामी. लावण्याच्या पुस्तकांत परशराम हा आईबापांचा नकार असतांहि तमाशाच्या धंद्यांत शिरला असें सांगितलें आहे व तो काळहि त्याला विठोबाचा साक्षात्कार झाल्यानंतरचा असें ते म्हणतात. म्हणजे इत्यर्थ हा कीं परशराम अगदीं तरुणपणापासून या धंद्यांत पडला होता. त्याची मूळची बुद्धि तल्लख आणि बाबा भागवतांच्या सहवासामुळें त्याला संत वाङ्मयाचा आणि अध्यात्माचा परिचय झालेला. यामुळें त्याची लावणी सरस होऊं लागली व अडाणी गांवढळ शाहीर कविमधील 'विद्वान' असेही लोक त्याला नांवाजूं लागले. लावणीकारांत कलगीवाले आणि तुरेवाले असे दोन पक्ष पूर्वापार आहेत. हे पक्ष पुरुष आणि प्रकृति किंवा जीव आणि शिव या अध्यात्मांतील द्वंद्वाचे प्रतिनिधि समजले जातात. या दोन पंथांतील शाहीर आपआपल्या मगदुराप्रमाणें हरदामाप्रमाणें आपआपल्या लावण्यांतून वेदांतचर्चा करतात व प्रतिपक्षाला कांहीं कोडीं घालून तीं सोडविण्याचें त्याला आव्हान देतात. परशराम हा कलगीवाला होता.

## परशरामाचा फड

परशरामाच्या तमाशाची थोड्याच दिवसांत चांगली प्रसिद्धि होत गेली. खुद्द त्याच्या परिसरांत तर त्याला कोणीच प्रतिस्पर्धी शिल्लक उरला नाहीं.

“ विठ्ठल नामीं छंद गातो तोड लावुनी कांहीं शास्त्री ।
परशरामाचे अजब्र भिऱ्हाके अशा फुकण्या मोजाव्या किती ? ”

किंवा

“ नामी विठ्ठल परशराम म्हणे मूळ शास्त्राचे धडे
रामकृष्ण गुणी रामा गातो सर्वांचे गणित झडे ।
शिकून शिकोरे गाति नाचती चुलिभाणोशा जवळीं
शाहीरामधी एक सरेना नाच्याची मंडळी ”

किंवा

“ कवि विठ्ठल नामी संत जनाला शरण ।
वावी ग्राम तिथें परशराम करी कवीश्वरी ॥ ”

किंवा

“ वावी नांव गांव धनवटांत आखाडा जब्ररं ।
कोणी विरळ एकादा राहील सांभाळून अब्ररु । ”

किंवा

“ विठू परशराम गातो लावणी महशूर दक्षणांत ।
जरीचा पटका सेनांत । ”

इत्यादि त्याच्या दर्पोक्तीवरूनहि ती गोष्ट सहज लक्षांत भरेल.

तमाशा म्हणजे एक तऱ्हेची नाटक कंपनीच होय. नाटक कंपनींतील लोक सोंगें सजतात, गातात, नाचतात, नकला करतात, अभिनय करतात; परंतु त्यांना कोणी तरी नाटक लिहून देणारा नाटककार लागतो. आणि सामान्यतः तो बाहेरचा विद्वान् लेखक असतो. तथापि क्वचित् असेंहि आढळतें कीं, कंपनींतील कोणी लिहिण्याचें देणें असलेले प्रतिभासंपन्न नट स्वतःच नाटकें लिहून तीं बसवितात. आण्णासाहेब किर्लोस्करांचे उदाहरण प्रसिद्धच आहे. तमाशांतहि स्वतःच लावण्या रचून म्हणणारे आणि दुसऱ्यांच्या लावण्या म्हणणारे असे दोन प्रकार असतच. त्यापैकीं परशरामाचा तमाशा पहिल्या

वर्गातील होता. तो स्वतःच उत्तम कवि असल्यामुळें त्याला प्रश्न फक्त गाणाऱ्या, वाजविणाऱ्या साथिदारांचा आणि चांगला नाच्या पोऱ्या मिळण्याचाच काय तो. पण तोहि प्रश्न चांगला सुटला. गाणारे, वाजविणारे चांगले मिळाले आणि भवानी नांवाचा रुंभोडीचा एक तेल्याचा पोरगा फार उत्तम मिळाला. प्रथम त्याला सालीना दहा रुपयांवर ठेवला होता. पण त्याचें काम इतकें लोकप्रिय होऊं लागलें कीं, त्याचा पगार दहा वरून पंधरा व पंधरा वरून विसांवर न्यावा लागला. कांहीं वर्षे नाचाचें काम केल्यावर भवानी स्त्रियांचींहि सोंगें घेऊं लागला. परशरामाच्याच तमाशांत पुरुषानें स्त्रीचें सोंग घेण्याची पहिली प्रथा पडली असें म्हणतात.

परशरामाचा आखाडा नाशकाजवळ धनवटांत गाजत असे. धनवट हें नांव, नाशकाच्या पूर्वेकडे ३० मैलांवर जो प्रांत लागतो त्याला मिळालेलें जुनें प्रादेशिक विशेषण आहे. हा प्रांत गोदा तटाकीं म्हणजे गंगाथडींत आहे. त्या प्रांतांत परशरामाला मोठासा प्रतिस्पर्धी कोणीच नव्हता. इतका त्याचा तमाशा विख्यात असतां दुसऱ्या बाजीरावाच्या काळापर्यंत पुणें दरबारीं त्याचा मुजरा झालेला दिसत नाहीं. बाजीरावा आधींचे सारे पेशवे पुरुष राजाचें मुख्य जें कर्तव्य राज्यकारभार पहाणें त्यांतच सदा गुंतलेले होते. त्यांना ख्यालीखुशाली आणि रंगढंग करण्यास फारसा अवसरच मिळत नसे. येऊन जाऊन दरसाल होळीच्या सणांत तेवढे चार दिवस ह्या शोकांत त्यांचे जात. पेशवे हे साऱ्या भारताचे सम्राट् यामुळें गुणी जनांची त्यांच्या दरबारीं नुसती रीघ लागत असे. पेशवे दप्तरांत होळीच्या सणांत गाणारे, नाचणारे, शाहीर, तमाशेवाले यांना मिळालेल्या बिदाग्यांच्या नोंदी कांहीं कांहीं सांपडतात. त्यांत इतर प्रसिद्ध पांचपन्नास शाहीर, तमासगिरांचीं नांवें आढळतात. परंतु परशरामाचा मात्र कोठेंहि उल्लेख आढळत नाहीं.

दुसऱ्या बाजीरावींत मात्र त्याचा प्रवेश पेशवेसरकारजवळ झाला. दुसरा बाजीराव हा गाण्या-नाचण्याचा आणि तमाशाचा विलक्षण शोकी होता.

त्याचा एकहि दिवस गाणें किंवा तमाशा ऐकल्यावाचून सुना जात नसे. स्वारींतही हे लोक तो बरोबर बाळगी व दर मुक्कामीं आसपासच्या तमासगिरांना बोलावून घेई. १८०८ सालीं परशरामाचा तमाशा पुण्यास आला असावा असें दिसतें; कारण त्याच्या तमाशांतील नाच्या भवानी तेली ऊर्फ बाकेराव याला ५०० आणि १५०० रुपयांच्या देणग्या बाजीरावानें एक मुठीनें दिल्याच्या नोंदी पूर्वी उल्लेखिल्याच आहेत. व्यक्तिशः परशरामाला काय बक्षीस मिळालें तें उपलब्ध नाहीं. तथापि ते बाकेरावाइतके भारी नसणार; कारण पदें रचणाऱ्या नाटककाराचें कौतुक कोण करतो ? तें कौतुक तीं पदें गाणाऱ्या गोड गळ्याच्या आणि सुंदर चेहऱ्याच्या नटाच्याच वांट्यास जात असतें !

बाजीरावाला आपल्या कवित्व गुणाची प्रचीती पटवून देण्याचा आणखी एक प्रसंग परशरामाला लाभला होता. त्याबाबत श्री. शाळीग्राम अशी माहिती सांगतात, " श्रीमंत पेशवे सरकारची स्वारी एकदां कोपरगांवी आली. सगन-भाऊ, होनाजी बाळा, धोंडी मेहत्या, बापू डांग्या, मार्तंड इत्यादि तमासगीर स्वारीबरोबर होते. स्वारीचा मुक्काम बेटांत होता. त्रिंबकजी डेंगळ्यानें बावीस जासूद पाठवून परशरामास तमाशासह कोपरगांवीं बोलावून घेतलें. परशराम आल्यावर क्रमाक्रमानें तमाशांची सुरवात झाली. होनाजी बाळा यानें गंगेवर केलेल्या लावणीचें एक कडवें तेथें कागदावरून वाचलें. पुढें परशरामाची पाळी आली. तेव्हां त्यानें स्वतः नवीन रचलेली गंगेची लावणी, " पश्चिम वाहिनी गोदा, प्रतिमूळ गंगा " ही म्हणून दाखविली. तींत गोदेच्या धार्मिक महात्म्याचें वगैरे वर्णन आहेच परंतु तेथें राघोबादादा व बाजीराव यांनीं बांधलेल्या देवालयांचें व वाड्यांचें वर्णन असून राघोबादादांच्या मृत्यूनंतर बाजीरावानें त्यांची छत्री बांधली त्याचाहि उल्लेख आहे. व शेवटीं—

" रावराजेंद्र सुवंशीक पूर्ण सांब अवतार ।
शिवनेरी तक्त सातारा पुणें शहर ।

चौदेशींचे नृप आणून देती करभार ।
झाले श्रीमंतांचें दर्शन हे एक सार ।
म्हणे परशराम येसू असो राज्य अभंग ''

अशी चाटुस्तुतिहि केली होती. तथापि यावेळींहि बाजीरावानें बक्षीस दिलें तें भवानी नाच्यासच. त्यासंबंधींची दिनचर्येंतील अस्सल नोंद उपलब्ध झाली आहे ती अशी, " श्रीमंत फराळ करून पोरग्याचा तमाशा करविला. मरजी खुस होऊस भवानी नाच्यास हजार रुपये बक्षिस दिले व गाणारास ५० रुपये देऊन बारा घटकास निद्रेस गेले. छ ६ रोज शुक्रवार मुक्काम कोपरगांव."

याच प्रसंगीं बाजीराव परशरामास कांहीं जहागीर देत होता; पण ती त्यानें घेतली नाहीं व

" पोट भराया उभारिला ना तमाशाचा धंदा ।
महाल मोकासे जहरी वळसे करतिल अपुला बंदा ।
रुची मनाची गायन करुनी अळवावे गोविंदा ।
चैनी खातर आम्ही राया पडलों नाहीं या फंदा ।
कर्म आमुचे हरिगुण गावे नाम न विक्री परिसा ।
सुइ दोऱ्याला हयात असो द्या तोंचि इनाम मोकासा ।
निज कर्मीं रत नर झाल्यावर काय उणा मग त्या पैसा । ''

असें निःस्पृह उत्तर देऊन ती त्यानें नाकारली, अशी आख्यायिका सांगण्यांत येते; परंतु तींत फारसा अर्थ असावा असें वाटत नाहीं. कारण पेशव्याची देणगी त्याच्या तोंडावर नाकारण्याचा निःस्पृहपणा दाखविणारा हाच परशराम पुढें बडोदें, ग्वाल्हेरकडे जाऊन पेशवाई बुडाल्यानंतरच्या तेथल्या अधिपतींकडे द्रव्याची याचना करून पैसे मिळवितच होता. वरील ' सुइ दोऱ्याला हयात असो द्या ' इत्यादि निःस्पृह उत्तराची आख्यायिका खरीच म्हणावयाची तर त्याची संगति अशी लावावी लागेल. इतका कवित्व गुण दाखवूनहि

बाजीरावानें नाच्याचीच भर केली म्हणून परशराम रागावला. पुढें ती कुरबूर बाजीरावाच्या कानीं गेली तेव्हां त्यानें त्याची समजूत काढण्यासाठीं कांहीं किरकोळ देणगी देऊं केली पण ती त्यानें रागानें घेतली नाहीं व त्या रागाच्या भरांत उपर्युक्त मुईदोऱ्याची लावणी रचून बाजीरावाला ऐकविली. पण तो त्यावेळीं आलेल्या कवि प्रतिभेचा उन्माद इतकाच अर्थ समजावयाचा. तो स्मशानवैराग्याप्रमाणेंच त्याचा क्षणिक प्रतिभावेग! सारांश आख्यायिका विश्वसनीय म्हणवत नाहीं. शिवाय आख्यायिका रचणाऱ्यांनीं हेंहि लक्षांत ठेवावें कीं, बाजीराव कितीहि वाहवलेला असला तरी शाहीरतमासगिरांना गांव किंवा मोकासा देण्याइतका मूर्ख नव्हता. असल्या लोकांना फार फार झालें तर हजार पांचशें रुपये नक्त इनाम आणि क्वचित् जमिनीचा तुकडा मिळाला म्हणजे पुष्कळ. रामजोशी, होनाजी बाळा, अनंतफंदी यांसारख्या बाजीरावाच्या प्रीतिपात्रांनाहि जहागिरी मिळाल्या असल्याचा दाखला अद्याप उपलब्ध झालेला नाहीं.

## परशरामाचा अखेरचा काळ

पेशवाई गेल्यानंतर सर्व शाहीर तमासगिरांचा आधार तुटला. राज्यक्रांति होऊन गेल्यामुळें समाजाची अगदीं दुर्दशा होऊन गेली आणि तमाशा लावण्यांच्या ढंगाची लोकांना आठवणहि होईनाशी झाली. तेव्हां दक्षिणेंतील साऱ्या शाहीर तमासगीर मंडळींनी बडोदें, इंदूर व ग्वाल्हेरच्या राशियतीकडे मोर्चा फिरविला. दक्षिणेंतील पेशवाई म्हणजे स्वराज्य नष्ट झालें होतें. परंतु त्या तोडून टाकलेल्या पेशवाई-वृक्षाच्या बडोदें, इंदूर, ग्वाल्हेर इत्यादि संस्थानांच्या शाखा अजून हिरव्या राहिल्या होत्या. आनंदाची गोष्ट ही कीं त्या संस्थानिकांनीं या गुणीजनांचा करतां येईल तेवढा आदर करण्यांत कसूर केली नाहीं. १८१८ पासून १८४४ पर्यंत परशरामानें उत्तरेच्या बऱ्याच मुलुखगिऱ्या केल्या. ग्वाल्हेरच्या मुलुखगिरींत तीन हजार रुपये रोख, नऊ दुपट्टे आणि पागेंतलीं दोन घोडीं त्याला मिळालीं. इंदूरच्या त्याच्या

दोन मोहिमा झाल्या; एक मल्हारराव होळकराच्या कारकीर्दींत व दुसरी हरिहररावांच्या कारकीर्दींत. बडोद्यास तर दरसाल जाण्याचा त्याचा शिरस्ता होता. एका प्रसंगीं परशराम होळीवर लावण्या म्हणतांना ऐकून थोरले सयाजीराव महाराजांनीं खूष होऊन त्याला एक भारी दुपट्टा व पागोटें तेथल्या तेथें बक्षीस दिलें. १८४० सालीं परशरामास ९९ रु. रोख व २६ रुपयांचें कापड दिल्याची एक नोंद आम्हास बडोदें–राज्य–दप्तरांत अलिकडे उपलब्ध झाली आहे.

असो, अशा रीतीनें

‘ पोटासाठीं भटकत जरी दूरदेशीं फिरेन ।
मी राजाच्या सदनिं अथवा घोर रानीं शिरेन ’

असें करीत परशराम वृद्ध व विकल होऊन अखेर आपल्या जन्मभूमीस परत आला व राहिलेले दिवस आपली वाणी ईश्वर भजनांत लीन करून त्यानें देह ठेवला.

## ‘ वरदी ’ परशराम

परशराम हा ऐंशीची उमर ओलांडलेला वृद्ध आणि विख्यात शाहीर म्हणून गाजत होताच शिवाय त्याच्या आध्यात्मिक व धार्मिक कवनांमुळें त्याला तमासगिरांतील ‘ वरदी ’ पुरुषाचाहि मान मिळत असे. शाहिरांत होनाजी बाळाचा आजा साताप्पा याला शंकराचा वरप्रसाद आहे अशी तत्कालीन फडकऱ्यांची समजूत होती. जुन्नरचा गोविंदराव शाहीर त्याचीहि तशीच ख्याति असून घरांत भुताची वगैरे बाधा झाल्यास त्या घरांत रात्रभर गोविंदरावी लावण्यांचा तमाशा केला म्हणजे ती जाते अशी लोकसमजूत रूढ आहे. परशरामालाहि तशा प्रसिद्धीचें भाग्य लाभलें होतें. त्याच्या पायाच्या आंगठ्याच्या तीर्थानें अडलेल्या बाळंतिणीची सुटका होई, अशा आख्यायिका गंगथडींत सांगतात. त्याला लाधलेल्या वरदीसाधुत्वाला शोभण्यासारखीच त्याच्या मृत्यूची हकीकत ऐकिवांत आहे म्हणजे असें कीं,

अमुक दिवशीं आपण मरणार असें त्यानें आगाऊ आपल्या शिष्यास सांगितलें. लोकांस ती प्रथम थट्टा वाटली परंतु परशरामानें वावीजवळ मंजूर येथें जाऊन देह ठेवण्याचा निश्चय करून पुढील दहनादिकाची व्यवस्था करविली. व मरावयाचे वेळीं आपल्या शिष्याकरवीं अखेरचा तमाशा करविला व आपलें दैवत जें विठ्ठल त्याचें नामस्मरण करीत आगाऊ सांगितल्या वेळींच प्राण सोडला.

परशराम हा तरुणपणीं वर्णानें गोर आणि देखणा होता, पण तमासगीर पेशा असूनहि व्यसनांधता बिलकूल नव्हती. मोठमोठ्या मजलशींतहि तो नेहमींचा साधा जाडा-भरडा पोषाख करीत असे. नाहीं म्हणावयास सुपारीचें तेवढें त्यास अनिवार व्यसन होतें. त्यासंबंधींची एक विनोदी आख्यायिकाहि उपलब्ध आहे. एकदां म्हणे त्याच्या तमाशाला एका ठिकाणचें बोलावणें करण्यास मंडळी आली असतां त्याच्या तमाशाचा ‘ मॅनेजर ’ येसू यानें जी बिदागी सांगितली त्यांत एक मण सुपारी घेण्याचें कलम होतें !

## परशरामाचें काव्य

परशरामाच्या छापलेल्या लावण्या व पोवाड्यांची संख्या सुमारें दीडशें भरते. लावणीचा पहिला चरण कोणास माहित आहे परंतु ती सबंध कोणास येत नाहीं अशाहि त्याच्या कांहीं लावण्या आहेत. उदाहरणार्थ—बावीस एकदां अनंतफंदी आला असतां फंदीनें बत्तीस बाळ्यांची एक लावणी म्हटली. तेव्हां परशरामानेंहि लगेच ‘ माझी अर्ज विनंति पतिराया ऐका नग आज घडवा ’ अशी एक लावणी रचून त्यास उत्तर दिलें किंवा त्यांवर तोड केली असें सांगतात. परंतु त्या एक चरणाखेरीज बाकीचा भाग आज उपलब्ध नाहीं. अशा कांहीं लावण्या व अद्याप लोकांस न सांपडलेल्या त्याच्या लावण्या कितीहि असल्या तरी त्यांची गणती पांच पंचवीसावर जाणार नाहीं असें वाटतें. म्हणजे कमी अधिक त्याच्या एकूण कवनांची संख्या पावणेदोनशें भरते. या कवनांची वर्गवारी पोवाडे आणि लावण्या या मुख्य दोन सदरांत

केली तर पोवाड्यांची संख्या दहा होते. श्री. शाळीग्राम यांनीं परशरामानें सदाशिवपंत तात्या कणकुरीच्या जहागीरदाराचे कारभारी, स्वतःचे मोक्षगुरू बाबा भागवत देवपूरकर व निंबाजी पाटील मुसळगांवकर यांवरहि पोवाडे केल्याचें सांगितलें आहे; परंतु ते छापलेले नाहींत. आणखीहि एकदोन पोवाडे असतील असें गृहीत धरलें म्हणजे परशरामाच्या पोवाड्यांची एकूण संख्या पंधरा पर्यंत जाते.

परंतु या पंधरांपैकीं पांचसहा तरी पोवाडे असे आहेत कीं त्यांना वास्तविक लवण्यांच्याच सदरांत ढकलणें युक्त होईल. म्हणजे असें कीं त्यांतील विषय एकाद्या व्यक्तीच्या किंवा प्रसंगाच्या वर्णनपर असा नसून त्यांत मोघम समाजस्थितीचेंच वर्णन आढळतें. दिल्लीचा म्हणून जो पोवाडा आहे त्यांत तर मोहना-वटाव या काल्पनिक प्रणयी युग्माचाच प्रपंच आहे. मुंबईचा पोवाडा म्हणून त्यांनीं म्हटला आहे, ती मुंबई बेटाची लावणी आहे. यांखेरीज इंग्रजांचा पोवाडा व त्यापुढें छापलेले चार देशस्थितीचे पोवाडे हे मराठशाही जाऊन इंग्रजी अम्मल सुरू झाल्यामुळें जी सामाजिक क्रांति झाली तिच्या वर्णनाचेच असल्यामुळें त्यांना लावण्यांच्या सदरांतच गोवावें लागेल. फार तर त्यांना पोवाडेवजा लावण्या म्हणावें.

सारांश परशरामाच्या पोवाड्यांची संख्या दहा बाराच होते. तर लावण्यांची संख्या सुमारें एकशेंसाठ-पांसष्ट भरते. त्याच्या लावण्यांची वर्गवारी पाहिली तर त्यांत ईशवर्णनपर, भेदिक किंवा अध्यात्मवेदान्तपर, पौराणिक कथाकथनपर, बोधपर किंवा उपदेशपर, समाजस्थितिवर्णनपर, स्थलवर्णनपर व बाकीच्या शृंगारविषयपर, असे प्रकार आढळतील.

परशरामाचा जन्म १७५४ सालीं झाला व तो नव्वद वर्षांचा होऊन १८४४ सालीं वारला. म्हणजे त्यानें पेशवाईतलीं स्वातंत्र्यांतलीं तीसचाळीस वर्षें आणि आंग्लाईतलीं पारतंत्र्यांतलीं जवळजवळ तितकींच वर्षें जाणतेपणें प्रत्यक्ष अनुभवलीं होतीं. साहजिकच असें वाटतें कीं, एवढा मोठा प्रासादिक

प्रसिद्ध शाहीरकवि त्यानें पेशवाईतील घडामोडींवर, लढायादिकांवर किंवा प्रसिद्ध व्यक्तींवर बरेचसे पोवाडे किंवा लावण्या रचल्या असतील; परंतु त्यांवर त्याचें एकहि कवन उपलब्ध नसावें याचा चमत्कार वाटतो. पानपतच्या प्रसंगीं तो सहा वर्षांचा अल्पवयी होता म्हणून त्यावर त्याचें कवित्व नसावें हें सहज समजतें. परंतु पुढें थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दींतील निजामाची पुण्यावरील स्वारी, राक्षसभुवनची लढाई, हैदरावरील मोहिमा, रमाबाईचें सहगमन किंवा त्यानंतर नारायणराव वध, बारभाई प्रकरण व मराठे इंग्रज युद्ध, खर्ड्याची लढाई, सवाई माधवरावाचा मृत्यु किंवा अखेरचे खडकी अष्टीचे रणसंग्राम एक ना दोन असे किती तरी प्रसंग आहेत, परंतु त्यांवर परशरामाचें एकहि कवन नाहीं. पण या उणीवेची भर त्यानें आपल्या समाजस्थितिपर लावण्यांनीं भरून काढली आहे. पोवाड्याच्या रूपानें राजकीय इतिहास त्यानें लिहिलेला नसो पण सामाजिक इतिहास, लावण्यांच्या रूपानें खरोखरच बहुमोल असा लिहून ठेवला आहे, हें त्याच्या लावण्यांचें अध्ययन केल्यास तेव्हांच पटेल.

## परशरामी रचना व भाषा

परशरामाची वाणी आणि रचनाशैली तुकारामासारखी अगदीं प्रासादिक आणि तशीच प्रभावीहि आहे. भाषा अनगड परंतु फार जोरदार. अगदीं गोफणीच्या माऱ्यासारखी घायाळ करणारी आहे. त्याच्या लावण्यांची अक्कड कडवीं किंवा ध्रुपदें हीं तर अशीं ठाशीव आणि ठसठशीत असतात कीं तीं तेव्हांच मुखोद्गत होऊन जावीं. घराणेदार गायकी चिजांच्या जशा अस्ताया तशीच त्याची ही अक्कड कडवीं, एकदम आकर्षक असतात. जणूं त्यांत पुढील सर्व लावणीचा अर्कच काढून अगोदर हातावर आचमनास टाकला आहे!

" खणाणी जसा गजघाट असा बोभाटा रुपाचा तुझा।
हेत धरून मनिं अलो पाहाया अटकर वांधा खुजा "

या परशरामानें दिलेल्या उपमेनेंच त्याचें वर्णन चांगलें होईल. सजवलेला

हत्ती राजरस्त्यानें येत असतां तो प्रत्यक्ष दिसण्या आधीं त्याच्या अंगावर घातलेल्या घंटांनीं जसा रस्ता दणाणून जातो व त्याचें आगमन जाहीर करीत रहातो, त्याप्रमाणें परशरामाचीं अक्कड कडवीं वाटतात.

" पुत्र असावा सुपुत्र ज्याचे जन कांहो अवघे गुण घेती ।
काय कामाचे दहाविस असुनी, अभिमानामधे धुळ माती "

" दुधड नार नवऱ्याला शिकवि म्हणे वेगळे निघा ।
जहांमर्दि संसार दाविते करुन तुम्हाला बघा. "

" साऱ्या गांवचे ओहळ मिळुनी गंगेची करिती थट्टा ।
सोनाराशिक्का नवा निघाला पंधरा आणे जरी बट्टा. "

" अंधार नगरी बेबंद राजा न्याय नीत कैची ?
ठाके ठोक ठगाई करुन जो राहिल पत त्याची. "

" राग रागिणी गायन कीर्तन ज्या स्थळीं नसे नारदा ।
असून वस्ती स्मशान स्थळिं त्या न राहे लक्ष्मी कदा. "

" तुझी लीला तूंच वदविशी बहु एक नानापरि ।
कर्ता तूंच करवितां वेगळा होउनिया श्रीहरी."

" शुद्ध सत्व ज्याची क्रिया तयाला कांहींच अवघड नसे,
क्रियाहीन जे अमूक प्राणी भूसकणाहीन जसे "

इत्यादि त्याची अक्कड कडवीं एकदां कानांत बसल्यावर कोण विसरेल ?

परशरामाच्या भाषेचें आणि रचनेचें स्वरूप शहरांतल्या बगीच्यासारखें, आंखीव, रेखीव आणि निवडक फुलझाडें त्यांत एकत्र आणून लावलेलीं असें नाहीं. तर तें निसर्गतः वाढलेल्या वृक्षलतांनीं आणि करवंदीच्या जाळ्यांनीं भरून गेलेल्या मावळांतल्या वनस्थलीसारखें असतें. तथापि त्याची शोभा कांहीं विशेषच वाटते. त्यांत कलमी गुलाब आणि बटमोगरे न आढळले तरी तेथें करवंदीच्या आणि कारवीच्या मंद किंवा मादक सुवासाची वाण नाहीं. रानवाऱ्याच्या लहरींसारखीं मधून मधून पुलकित करणारीं सुभाषितें त्याच्या कवनांत कितीदां तरी भेटतात.

"तळहातानें चंद्र झाकेना उजेड त्याचा बहुजागा."

"मखमाली पैजार चांगली उदंड जरि झाली ।
पायाची पायामधि शोभल कोणि बांधली शिरी ?"

"शहाण्यांचे शहाणपण न चाले या संधित ।
चाल सख्या पाय फुंकून मार्ग नीट शोधीत."

"सतिला नाहीं बत्ती हत्ती आहे शिंदळिच्या घरीं."

"गोड घांसावर नजर याची न पाहि पुढल्या हिता."

"मजविषयीं कांहीं तिळमात्र नका गजबजूं ।
प्रीतिच्या स्थळीं भाषण बोलानें उजूं."

"पुण्याई सबळ यशवंत माझें चुडे ।
थोरासंगे दुर्बळास पाणी चढे."

"पाहिल त्याला दिसेल नयनीं उकिरडिं चिंतामणी."

"निज कर्मी रत नर झाल्यावर काय उणा मग त्या पैसा."

"उभा दंड जर एकच पाणी एरंडा अणि उंसा ।
आपआपल्या मोलानें विकतिल खुण चतुराला पुसा."

चार दोन वेंचक वाक्यांत पुरी टर उडवून टाकण्याची सिद्धि परशरामाला तुकारामसारखीच साधली आहे, म्हटलें तरी चालेल. उदाहरणार्थ म्हातारपणाचें हें वर्णन पहा.

"साठ सत्तर वर्षे झालीं आलि उतरती कळा ।
शाम केस ते सफेत झाले मंद दिसतसे डोळा ।
उठतां बसतां संकटीं । बुलबुला हले हनवटी ।
जवळ कोणी न ये शेवटीं । अवघ्याशी पडल्या तुटी"

किंवा योग्यतेवाचून अधिकारी झालेल्याला दिलेला हा कोरडा पहा,

"हेल्यावर जरि दिलि अंबारी, मटकन बसेल भारानं ।
उदंड झाला ताजा गधडा शोभेल काय तरी त्यास जिनं ?"

किंवा स्वत: कांहीं उद्योग न करतां बायकोवर संसाराचा भार टाकून उसनी ऐट आणून फुकट फौजदारी करीत फिरणाऱ्या ऐतखाऊ नादान नौरोबाची ही शोभा पहा—

“ सांड गांवामधी फिरतो भांड रिकामटेकडा असून ।
इकडील काडी तिकडे करीना घर कसे चालेल बसुन ?
तीन तुकड्याचे एक मुंडासे तिनदा बांधी कसून ।
डावे कानावर ठेवुन पागोटें वर तीन पानें खोसून. ”

परशरामाच्या उपमा सुद्धां गांवरान परंतु गोड असतात. घरीं सर्व सौख्य आणि संपदा पाणी भरीत असतां त्या घरांत खेळणारें स्वतःचें मूल मात्र नाहीं म्हणून त्या सौख्याला उबगलेली स्त्री आपल्या मनीचें दुःख कसें व्यक्त करिते पहा—

“ सर्वांगी डोळे पाहून पायाकडे, झुरते मोरा परी ।
एक लेकरावांचून पक्षी निढाळ वृक्षांवरी. ”
“ गोरे गाल जसा नरम खवा, ” “ कुसुंबी गाल जशी बनात, ”

किंवा

“ लाल अंगावर शाल शोभली मशाल जैशी राजसभे ”

किंवा

“ महिना थंड काळचा पौष । राहिलीं हाडें गळालें मांस ।
जसा वृक्ष वाळला तिवस ”

इत्यादि उपमांतील नाविन्य, सौंदर्य आणि साधेपणा न सांगतांच प्रत्ययास येण्यासारखा आहे. शब्दचित्रें चार दोन कलमांत सुबक रंगविण्याची परशरामाची हातोटीहि उल्लेखनीय आहे. त्याच्या नायिकांचीं ही वर्णनें पहा—

“ गौर वर्ण तिची कांचन कांती जशी हवई सुटली ।
उंच मोलाचे तेल उदेलें सर्वांगीं उटली, ”

किंवा

“ गगनांत चांदणी ठळक मारिशी झळक उभी ग आंगणी ।
किती नटून थटून मारशिल छनाछन नयनाच्या संगिनी ”

किंवा

" चोळी अंजिरी जरी कांठाची रंग कटारी नवा ।
कवाळि कर्दळी पिवळी कांती मृदु मिन्याचा रवा "

किंवा

" चिरि कुंकाची बारिक निढळीं घाम आला डवडवा ।
नेत्रीं अंजन चित्रिं बाहुली पाहुन आवडली जिवा, "

किंवा

" निर्मळ मुखडा चंद्राकार । सरळ नाकाची शोभते धार "

किंवा

" फरसबंदिवर हळू चालतां नथ नाकी थरथरी "

किंवा

" कुलपि चुडे करिं हातसर कंकण अरक्त मेंदी नखीं ।
सव्य हस्त सरसावि पदर अदरानें धरला मुखीं."

## परशरामाचा विनोद

उपहास करून हंसविण्याची विनोदी कला इतर शाहिरांपेक्षां परशरामांत अधिक दिसते. जुन्या काळच्या शाहिरी वाङ्मयांत निरपवाद, निरागस, निर्मळ विनोद क्वचितच मिळतो. त्यांत विनोद असे पण तो बहुधा अश्लीलतेनें बरबटलेला असावयाचा. बाकी शुद्ध अध्यात्म किंवा वेदान्तहि हिडीस अश्लील रूपकांत बसवून सांगण्याची जेथें प्रथा तेथें हंसविण्यासाठींच केलेला विनोद त्यांत अश्लीलता न सांपडली तरच आश्चर्य ! परशरामाच्या अशा तऱ्हेच्या विनोदी हास्यकारक आणि उपहासपर लावण्या बऱ्याच आहेत. सवती-सवतींचे झगडे, दोन बायकांच्या दादल्याची फजिती, गंगा गौरी किंवा पार्वती आणि गंगा यांनीं एकमेकींची काढलेलीं वर्मे वगैरे त्यांचे विषय आहेत. एक मात्र परशरामाची खरी शुद्ध सात्त्विक विनोदाची लावणी आहे. तिचा परिचय करून दिल्याशिवाय राहवत नाहीं. वास्तविक तिची

खरी मौज अनुभवण्यास ती लावणी मुळांतूनच सबंध वाचली पाहिजे किंवा ऐकिली पाहिजे. ती एका शेंदाड शिपायाच्या फजितीची कथा आहे. हे नादान राजेश्री बायकोपाशीं बढाया मारून शिपाई बनून लष्करांत रोजगार पाहण्यास गेले. तिकडे लष्कराची मोहीम बरेच दिवस चालली. इकडे त्याची बायको मनांत काळजी करीत होती. पण बिचारीला नवऱ्याच्या खुशालीचें कांहींच वृत्त कळेना म्हणून ती फारच कष्टी झाली. इतक्यांत एक दिवस नवरा घरीं परत आला. त्याचा पोषाख पेहराव कवायती कंपूसारखा डोळ्यांत भरण्यासारखा होता. बायकोला नवरा परत आला म्हणून तर आनंद झालाच परंतु तो तरवार गाजवून पोषाख मिळवून आला यामुळें तर तिला अस्मान ठेंगणें झालें.

“ दोनचार पांघरुणें आला अंगावर लेवून ।
नारिचे दिपले डोळे लिभास पाहून. ”

मग त्या साध्वीनें त्याचें किती कौतुक केलें असेल तें सांगणें नको ! ती म्हणाली, “ तुम्ही परत आलांत यांतच मला लाखों रुपये मिळाले. आतां जीव पुन्हां धोक्यांत घालूं नका. ”

“ बरे आले हेताशिर घरीं आपले जीव घेऊन ।
वडिलांची आर्धी भाकर खाऊ धुवून ।
आहेवपण भोगीन कपाळीं कुंकू लावून. ”

बाईनें लढाईच्या कष्टानें नवरा सुकून गेला म्हणून त्याची खाण्यापिण्याची आरामाची तरतूद चालविली. वाण्याकडून व व्यापाऱ्याकडून उचापत करून हरएक जिन्नस आणून कशाचीहि कमतरता उरूं दिली नाहीं.

नवऱ्यानें तिला आल्याबरोबर आपल्या रोजगाराचे मोठें बहारदार वर्णन सांगितलें होतें.

“ आम्ही बाळ सराईत आधीच घोडेस्वार ।
जाताच लागला लष्करांत रोजगार.

दिला बसाया सभल घोडा धन्याचा प्यार ।
पंगतीचे ताट दिले मशाल खिजमतगार ।
उमतीचा तंवर केली झड घालून तलवार ।
बक्षिसा मिळविल्या चवरी न अबदागीर !
दौलत मिळविली भर उंट दोन चार; "

असे आम्ही सुखांत होतों. परंतु तुझी आठवण येऊन 'जीव करितो हुरहूर' तेव्हां आम्ही धन्यास चार महिन्यांची घरीं जाण्यासाठीं रजा मागितली. ते देत नव्हते. परंतु त्यांनीं दिली. तेव्हां तुझ्या ओढीमुळें दरकूच करीत निघालों. वाटेंत कासारबारीवर आमच्यावर भिल्लांची गर्दी झाली. आणि त्यांत आम्ही पराक्रम करून मि वलेली सारी दौलत लुटली गेली. हा पोषाख तेवढा अंगातच घातला होता म्हणून आमच्या बरोबर निभावला ! बायकोला अर्थातच हें सारें वर्णन खरें वाटलें. दुसऱ्या दिवशीं तिनें स्वतः नवऱ्याला तेल लावून ऊन ऊन पाण्यानें आंघोळ घातली. तेव्हां तिला नवऱ्याला लढाईत किती कष्ट पडले असतील याची प्रत्यक्षच प्रचीती आली; कारण—

" लावी उटणें चवरंगावर होऊन सरशी ।
माथ्याला टक्कल कशाचे हो गुणराशी ।
दोन्ही खांद्याला दोन्ही घट्टे बांधल्या गर्शी ।
वाकडा हात खुळा, देह झाली झांजरशी । "

वगैरे वगैरे. तेव्हां यानें आपल्या पराक्रमाचें बहारदार वर्णन करून त्या लढायांतल्या जखमा आहेत अशी संपादणी केली व म्हणाला, " आमच्या-सारख्या शूरांना लष्करांतच राहण्यांत खरी खरी मौज वाटते; पण केवळ तुझ्या प्रेमासाठीं तें सारें सोडून मी घरला आलों आहे."

" लष्करचें काय सुख सांगू गे तुज नारी ।
तुझे प्रीतिस्तव तें सोडून राहिलों घरीं "

बाई अगदीं खूष झाली. असे दोन चार दिवस गेले. इतक्यांत अशी एक गोष्ट घडली कीं त्यामुळें तिच्या भ्रमाचा साराच भोपळा फुटला आणि

" नारीचे झिझले कपाळ पाया पडतां ।
वाण्याची उचापत देऊं कशानें मी आतां ? "

असें रडण्याचा तिच्यावर प्रसंग आला. कारण जुन्या काळच्या पद्धतीप्रमाणें लष्करांत नोकरी धरतांना याला जो माणूस जामीन राहिला होता तोच याचा शोध काढीत आतां येथें येऊन हजर झाला. जुन्या काळीं जामीन राहणाऱ्या मनुष्याला असें लिहून द्यावें लागत असे कीं, " अमुक अमुक मनुष्यास मी जामीन आहें. तो मनुष्य कोठें गेला—पळाला तर त्याला आणून हजर करण्याची जबाबदारी माझी आहे." तो जामीन राहिलेला माणूस होता त्यानें मग " मुळापासून सांगितली अवघी वार्ता." खरा प्रकार असा कीं, हा शिपाई म्हणून भरती करून घेतलेलाच नव्हता. तर लष्करचा एक कामाठी म्हणजे मजूर म्हणून घेतला होता. सरपणाच्या मोळ्या डोक्यावर वाहणें, आणि खांद्यावर कावड घेऊन बादल्यांनीं पाणी वाहणें हीच याचीं कामें होतीं. प्रत्यक्ष जेव्हां लढाई झाली तेव्हां तर हा बुणग्यामध्येंच होता. एवढेंच नव्हे तर एक उंची पोषाख तेथून चोरून हा पळून गेला.

" माथ्याला टक्कल पडलें मोळी वाहतां ।
खांद्याला पडले घट्टे बादले वाहतां ।
बादल्याची मोडली काठी याचे हातां ।
याला सकाळींच उठून मारति लाथा । "

अशी याची खरी स्थिति होती. मी त्याला जामीन राहिल्यामुळें, " हेलपाटा पडला इथवर याच्याकरितां." म्हणून आतां याला पुढें घालून परत लष्करांत नेण्यासाठीं आलों आहे !

## अभ्यासाच्या वाटा

( १ ) परशरामाचा जीवन वृत्तान्त थोडक्यांत द्या.

( २ ) परशरामी तमाशा लोकप्रिय होण्याचीं कारणें कोणतीं ?

( ३ ) परशरामाची व दुसऱ्या बाजीरावाची भेट कशी झाली ? या भेटीचा फायदा परशरामास झाला का ?

( ४ ) परशरामाची अखेरची स्थिति कशी काय होती ?

( ५ ) परशरामाबद्दलच्या कांहीं आख्यायिका लिहा.

( ६ ) परशरामाच्या पोवाड्यांविषयीं तुम्हांस काय माहिती आहे ?

( ७ ) परशरामाच्या लावण्यांची वर्गवारी कशी करतां येईल ?

( ८ ) ‘ परशरामाची रचनाशैली व भाषा ’ यांवर एक लहान निबंध लिहा.

( ९ ) ‘ परशरामी विनोद ’ यावर एक टिप्पणी लिहा.

# होनाजी बाळ : : : २

होनाजी बाळ हा जातीनें नंदगवळी. आडनांव शिलारखाने. होनाजीला कवित्वाची देणगी पिढीजातच होती असें म्हणावें लागतें. कारण त्याचा आजा साताप्पा आणि चुलता बाळा हे दोघेहि मोठे नामांकित शाहीर म्हणून प्रख्यात होते. होनाजीचा आजा साताप्पा गवळी हा खुद्द श्रीमंत पेशवे सरकारचा खाजगींतला एक चाकर किंवा आश्रित होता. पेशवे रोज-कीर्दींत सन १७३९ सालची एक नोंद त्यासंबंधीं नवीन सांपडली आहे. ती अशी “ अरबैन मया व अलफ छ १० रबिलाखर साताप्पा गवळी चाकर सरकार हा वसमत प्रांते व मांदाड प्रांते म्हशी खरेदी घेऊन येईल त्यास दस्तक ( परवाना ). ” यावरून साताप्पा हा थोरल्या बाजीरावाच्या कारकीर्दी-पासून पेशव्यांच्या पदरीं होता हें सिद्ध होतें. साताप्पा हा त्याहि आधींपासून पेशव्यांच्या चाकरींत कदाचित् असावा असा तर्क करण्यासहि जागा आहे. पेशव्यांचा गुरु ब्रह्मेंद्रस्वामी हा सन १६८९ नंतर कोंकणांत चिपळुणाजवळ प्रथम प्रगट झाला. त्या वेळीं पेढें येथें स्वामीनें कांहीं चमत्कार दाखविल्यामुळें तेथला बाळ गवळी त्याच्या भजनीं लागला व त्यानेंच लोकांत स्वामींची प्रसिद्धि केली. त्याच वेळीं श्रीवर्धनकर देशमुख बाळाजी विश्वनाथ हा जंजिरेकर हबशातर्फे मीठ बंदराचा हवालदार होता. त्यालाहि स्वामीचें दर्शन घेण्याची इच्छा झाली. पुढें त्यानें व वर सांगितलेल्या बाळ गवळ्यानें एकाच वेळीं स्वामींचा कांहीं चमत्कार अनुभविला. त्यावरून तोहि त्याचा भक्त बनला व तेथपासूनच त्याचा व बाळ गवळ्याचा घरोबा पडला. पुढें बाळाजी विश्वनाथाला पेशवाई मिळाल्यावर त्यानें इतर अनेक जुन्या परिचितांचा परामर्ष घेतला, तसाच बाळ गवळ्याचाहि घेतला व त्यास कांहीं वतन इनाम करून दिलें. हाच बाळ गवळी साताप्पाचा बाप असला

पाहिजे. साताप्पाच्या थोरल्या मुलाचें नांवहि बाळा असें आजाचेंच ठेवण्यांत आलें. त्यावरूनहि वरील तर्कास बळकटी मिळते.

असो बाळा गवळी गुरुभक्तिपरायण होता. तसाच त्याचा मुलगा सातप्पा हाहि पुढें वरदी सत्पुरुष म्हणून तमासगीर शाहिरांत विख्यात झाला. तो उत्तम कवि होता. त्याच्या लावण्या अगणित होत्या म्हणतात. दुर्दैवानें त्या उपलब्ध झालेल्या नाहींत. शाहिरी वाङ्मयाचे आद्य संशोधक कै. शालिग्राम यांनीं होनाजीच्या घरचा लावण्यांचा संग्रह धुंडाळला. तो प्रचंड होता, असें त्यांनीं लिहून ठेवलें आहे. तो संग्रह तेव्हांच हस्तगत करून नीट तपासून संशोधून झाला नाहीं म्हणून साताप्पाच्या लावण्यांना महाराष्ट्र मुकला. तथापि शालिग्राम यांनीं होनाजीच्या म्हणून ज्या लावण्या छापल्या आहेत, त्यांतच नजरचुकीनें चार दोन साताप्पाच्याहि छापल्या गेल्या आहेत. त्यावरून साताप्पाच्या कवित्वाचा मासला कळतो. शाहीर म्हणून साताप्पाचा अस्कारा फारच असे. फडकऱ्यांत तर साताप्पा म्हणजे कोणी वरदी महापुरुष आहे व शंकराचा त्याला वरप्रसाद आहे, अशी दृढ समजूत होती. तो केव्हां वारला हें नक्की कळण्यास कांहीं साधन नाहीं. तो कोणत्या तरी श्रावणी सोमवारीं वारला एवढें मात्र निश्चित दिसतें. तो वारला तेव्हां पुण्यास संगमावर त्याची समाधी बांधण्यांत येऊन त्याच्या नांवानें एक शांतलिंग स्थापन करण्यांत आलें. अजूनपर्यंतहि दर श्रावणी सोमवारीं पुण्यांतील तमासगीर तेथें जाऊन हजेरी देत असतात. त्या सर्व प्रकारास ‘ पांचवा ’ म्हणतात.

असो. साताप्पाच्या मृत्यूचा महिना व तिथि अशी मिळाली तरी सालाचा वांधा राहतोच. तथापि तो नक्की कोणत्या सालीं वारला हें जरी कळत नाहीं तरी तो नक्की कोणच्या सालापर्यंत जिवंत होता हें कळण्याचें मात्र एक साधन आम्हांस उपलब्ध झालें आहे. पेशव्यांच्या तिस्सा सितैन सालच्या रोजकीर्दींत ‘ खेरीज मुशाहिरा ’ सदरांत खर्चांत ५ रुपये संतप्पा गवळी शाहीर याच्या नांवें खर्च पडले आहेत. संतप्पा आणि साताप्पा एकच.

रोजकीर्दीतील दुसरी संपूर्ण नोंद अशी आहे—" तिस्सा सितेन राजमंडळ स्वारी पंतप्रधान खर्च ' खेरीज मुशाहिरा ' पोतापैकीं

३२ रु. छ २० रोज वाड्यांत खेळ केला. त्यास इनाम रसानगी चिट्ठी रुपये.

७ सिदू राऊळ शाहीर

५ संतप्पा शाहीर

२० बाळा नाचणार

३२

साताप्पाला तीन मुलगे होते. थोरला बाळा, दुसरा कुशाबा आणि तिसरा सयाजी. यांपैकीं बाळा म्हणजेच सुप्रसिद्ध " बाळा बहिरु " होय. प्रथम हा बापाचे तमाशांत नाचण्याचें काम करीत असे. हें मागच्या नोंदीवरून दिसतच आहे. पुढें तो स्वतःच कवनें रचूं लागला. बाळा बहिरु असें जोड-नांव पडण्याचें कारण, बहिरु नांवाचा रंगारी बाळाच्या बैठकींतला नेहमींचा जिगर दोस्त असे. बाळानें लावणी करावी व ती बहिरूनें म्हणावी किंवा बहिरूची लावणी बाळानें म्हणावी. अशा प्रकारामुळें, त्यांच्या तमाशाचें नांव ' बाळा बहिरूचा तमाशा ' असेंच पडलें व तेहि स्वतःस तसेंच जोड नांव लावूं लागले. बाळा बहिरूचा स्वतंत्र असा लावण्यांचा संग्रह प्रसिद्ध नाहीं. परंतु साताप्पाप्रमाणेंच बाळा बहिरूच्याहि कांहीं लावण्या होनाजीच्या नांवावर शालिग्रामांनीं छापल्या आहेत.

" अशी प्रलयंगता तुझी ग बुध नाहीं कामाची ।
अम्हास आली पत्रें धन्याची जलदी करण्याची."

ही सुप्रसिद्ध लावणी त्याचीच आहे. त्या लावणींत वर्णिलेल्या कर्नाटक स्वारीच्या प्रसंगावरून आणि

" कर्नाटकच्या स्वारीस होतो श्रीमंताबरोबर ।
रणसंग्रामी झडुन केली अंगी तलवार ।
झाडीमध्यें पिट्टुन घातला लुटून हैदर,"

इत्यादि उल्लेखावरून थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीपासून बाळा बहिरूचा

फड पुण्यांत गाजत असावा असें दिसतें. त्यानें केलेला पोवाडा असा मात्र एकच उपलब्ध आहे व तो नाना फडणवीसावरील

" खूप शर्तीनें राज्य राखिलें मनसोबीच्या तलवार,
भले बुद्धिचे सागर नाना ऐसे नाहीं होणार " हा होय.

सवाई माधवरावाचीहि जवळ जवळ सर्व कारकीर्द बाळा बहिरूनें पाहिली. ' इसन्ने तिसैनच्या ' म्हणजे सन १७९१ च्या शिमगा खर्चांत पेशव्याकडून बक्षीसें पावलेल्या सुमारें ३०–४० शाहीर तमासगिरांत बाळा बहिरूचें नांव असून त्यास दहा रुपये पोहोंचले आहेत. त्याच नोंदींत होनाजीसहि पंधरा रुपये मिळाले आहेत. पारसनीस म्युझियममधील सवाई माधवरावाच्या दिनचर्येच्या रुमालांत, इसन्ने तिसेन फाल्गुन वद्य १ ची म्हणजे २१–३–१७९१ ची एक नोंद आहे ती अशी—" सहा घटका दिवसापासून ४ घटकापर्यंत ( श्रीमंत सवाई माधवराव ) लावण्या म्हणवीत होते. १ सिंदे पोरगे–१ बाळा बहिरु गवळी. "

बाळा बहिरु सासवडला वारला. तेथें त्याची समाधिहि अद्याप दाखवितात. बाळा ऊर्फ बाळा बहिरूला कुशाबा व सयाजी असे दोघे भाऊ होते. त्यासंबंधीं विशेष कांहीं माहिती उपलब्ध नाहीं. फक्त कुशाबा हाहि तमाशांत गात असे असें म्हणतात. ' झांगड झांगड नौबत झडे ' हा खर्ड्याच्या लढाईचा एक पोवाडा कोणा कुशाबा शाहिराचा आहे. तो व हा कुशाबा हे एकच असल्यास न कळे. कुशाबाचा खालचा भाऊ सयाजी हाच होनाजीचा बाप होय. त्याच्यासंबंधीं कांहींच माहिती कोणी देत नाहीं. त्यावरून तरुणपणीं लवकरच तो वारला असावा.

## होनाजीचा उत्कर्ष

होनाजीचा जन्म कधीं झाला तें माहीत नाहीं. तथापि थोरल्या माधवरावाच्या कारकीर्दीअखेर तो चांगला सज्ञान होऊन घरचा गवळ्याचा व बाहेरचा तमाशाचा धंदा करूं लागला असावा असें दिसतें. सवाई

माधवरावाच्या कारकीर्दीपर्यंत तो चांगलाच नाणावला. त्यानें आपला स्वतंत्र तमाशा काढला. त्याचा बाळा करंजकर नांवाचा तमाशांतील साथीदार होता. होनाजीनें लावणी रचावी आणि बाळानें ती तमाशांत गावी असा नेहमीं प्रकार असे. यामुळेंच होनाजीच्या तमाशाला ' होनाजी बाळाचा ' तमाशा असें नांव रूढ झालें व पुढें होनाजीलाहि होनाजी बाळच म्हणण्याचा प्रघात पडला. बाळा बहिरूचाहि तोच प्रकार होता हें पूर्वीं वर सांगितलेंच आहे. होनाजीला कवित्वाची देणगी घरचीच होती. शिवाय पुराणादिकांतील कथांचा आणि दाखल्यांचाहि त्याला भरपूर परिचय होता. यामुळें दुसऱ्यांनीं रचलेल्या लावण्या म्हणण्याची पाळी त्याच्यावर येण्याचा संभव नव्हता. तथापि अशीहि एक वृद्ध मुखांतील माहिती आहे कीं, त्यावेळीं शनवारांत नदीच्या बाजूला धोंडोपंत लेले म्हणून ब्राह्मण होते. त्यांनींच होनाजीला देवादिकांच्या बऱ्याच लावण्या करून दिल्या. ही माहिती १८९४ सालीं प्रसिद्ध झालेल्या व्ही. एस्.चे मार्मिक ऐतिहासिक लेख या पुस्तकांत सांगितली आहे.

सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत होनाजीला राजाश्रय मिळाला. सवाई माधवरावाचा रंगाचा समारंभ आणि खर्ड्याची लढाई या प्रसंगावरील पोवाडे त्याच्याकडून भरदरबारांत गाऊन घेण्यांत आले होते. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत होनाजीच्या भाग्याची परिसीमा झाली. स्वतः बाजीराव अत्यंत विषयासक्त, रंगेल आणि गाण्या-नाचण्याचा आणि तमाशांचा कमालीचा शोकी होता. यामुळें इतर सर्व दृष्टींनीं त्याची कारकीर्द जरी निंद्य व हानीकारक झाली तरी अस्सल मराठी लावणी या गायन-प्रकाराचा परमोत्कर्ष तेव्हांच झाला, हें मान्य करावें लागतें. नट-नर्तक, गायक-वादक, नाचे-तमासगीर आणि कसबिणी-कलावंतीणी यांच्या कर्तृत्वाला त्या कारकीर्दींत अगदीं खुलें मैदान झालें. होनाजी हा तर पेशव्यांचा प्यार शाहीर बनून गेला. ते कृतोपकार होनाजीनेंहि सव्याज फेडले. दुसऱ्या बाजीरावावर त्याचें बरेच पोवाडे व लावण्यांचें कवित्व आहे.

होनाजीवर बाजीरावाची विशेष खुष मर्जी होण्याचें कारण आणखी एक हें आहे कीं, होनाजीनेंच प्रथम निरनिराळ्या रागदारीच्या चालीवर लावण्या रचून तमाशालाहि बैठकी गाण्याचें स्वरूप आणून दिलें. कै. शाळीग्राम यांनीं होनाजी चरित्रांत असें म्हटलें आहे, " बाळा बहिरूच्या सर्व लावण्या बैठकीच्या म्हणजे शांत सुराच्या होत्या. तें वळण बाळा-बहिरूस साताप्पापासून मिळालें होतें आणि तेंच पूर्वजांचें वळण होनाजीनेंहि तसेंच उचललें. फडावरील उंच स्वराच्या लावण्या होनाजी कधींच म्हणत नसे." बाजीराव साहेबांनीं एकदा इच्छा प्रदर्शित केली कीं, "बैठकीच्या लावण्यांत रागदारीचे सूर प्रकट करतां येतील काय? ती त्यांची इच्छा होनाजीनें परिपूर्ण केली." या संबंधांत पूर्वोक्त 'व्ही. एस्.' यांनीं निराळीच हकिकत दिली आहे. ते म्हणतात, " दुसऱ्या बाजीरावींत एकदोन घंटे नाचून झाल्यावर श्रीमंत आतां बसून म्हणा असें सांगत. मग कळवंतिणी ख्याल, टप्पा, ध्रुपद म्हणत. प्राकृताची त्यांना माहिती नव्हती. पण पुढें होनाजी बाळ या गवळी शिंप्याच्या तमासगीर जोडीनें प्राकृत प्रथम कळवंतिणीच्या गाण्यांत आणलें.' आपल्या गायकी लावण्या घेऊन होनाजी बाळ तबल्यावर गाऊन तमाशा करूं लागला. पुढें व्यंकट नरसी नांवाची अत्यंत नामांकित नर्तकी पुण्यास होती. तिला तबल्यावर तमाशा सुरू झालेला पाहून राग आला. म्हणून तिनें एक दिवस बाजीरावास आपल्या गायनानें खूष करून त्याच्याकडून असा हुकूम घेतला कीं, तमाशेवाल्यांनीं तबल्यावर गाऊं नये. यामुळें होनाजीचा हिरमोड झाला. मग त्यानें युक्ति केली, ती अशी—होनाजीची अहिली कामाठीण नांवाची एक अत्यंत गोड गळ्याची वारयोषिता शिष्या होती. तिच्याकडून मराठी रागदारी लावणी शिकण्याचें त्यानें कबूल करून घेतलें व तीं दोघेजण सहा महिनेपर्यंत मुंबईस जाऊन राहिलीं. त्यानंतर पुण्यास आल्यावर अहिलीनें मराठी लावण्या बैठकींत म्हणण्यास सुरवात करतांच लोक बेभान झाले. तेव्हांपासून सर्व नायकिणी बैठकींत मराठी लावण्या म्हणूं लागल्या."

होनाजी हा खराखुरा संगीतज्ञ आणि नवीन स्वररचना करणारा कल्पक पुरुष होता, यांत शंका नाहीं. त्याच्या गायकी लावण्या पेशवाईनंतर अनेक

वर्षेपर्यंत रसिकांना मुग्ध करीत राहिल्या, हेंच त्याचें प्रत्यंतर. सुप्रसिद्ध मराठीचे आद्य व्याकरणकार दादोबा पांडुरंग यांनीं आपल्या आत्मचरित्रांत याबाबत लिहून ठेवलें आहे. तें येथें उल्लेखनीय होय. ते म्हणतात, " रामजोशी, सगनभाऊ, अनंत फंदी, होनाजी बाळा यांचीं कवनें मला आवडत असत. होनाजी हा शृंगारांत पुष्कळ ठिकाणीं घसरून जाई. सर्व शृंगाररस सुज्ञ ऐकणारास कंटाळा येईल इतके प्रकाशित करी. परंतु तो दांडग्या रुचीच्या लोकांचा रावबाजीच्या अखेरीच्या कारकीर्दींतला कवि. तथापि मला त्याची कोठें कोठें शब्दांची ठेवण फार सरस वाटते व लावण्यांचे नवे नवे छंद व धाटणी कानास फारच गोड लागतात. हे नवे नवे छंद व तऱ्हे-तऱ्हेच्या धाटण्या हे मराठी कवि कोठून व कसे काढीत असत याचें मला मोठें आश्चर्यच आहे व याविषयीं त्यांची सरस कल्पना रसिक जनांच्या स्तुतीस योग्य होय. जसें इटली व जर्मनी येथें होगार्थ आदि करून अपूर्व गायनाचे कल्पक होऊन गेले, त्याच मासल्याची यांची स्तुत्य कल्पना होय. यांत होनाजी बाळा आदिकरून गरीब मराठी कवि यांजवरच मी आपला टपका ठेवावा हें ठीक नाहीं; कारण यापेक्षांहि बीभत्स कवि संस्कृत भाषेंत पाहिजे तितके सांपडतील."

बाजीराव कमालीचा विषयासक्त आणि गाण्या-बजावण्याचा वेडा, तशांत त्याला कारभारी मिळाला तोहि त्र्यंबकजी डेंगळ्यासारखा माणूस. त्र्यंबकजीनें बाजीरावाच्या चैनबाजीच्या शोकांत यत्किंचितहि कमतरता पडूं नये अशी दक्षता घेतली. त्या त्र्यंबकजीची आणि होनाजीची बहुधा नेहमीं एक बैठकच असे. पेशव्यांकडून शिमग्यामध्यें पांच दिवस सरकारवाड्यापुढें म्हणजे शनवार-वाड्यापुढें तमाशा करण्याबद्दल होनाजीला सालिना तीनशें रुपये मिळत असत. खेरीज अवांतर प्रसंगीं त्यास शेले, दुपट्टे व नख्त देणग्या किंवा बक्षीसें मिळत. त्या सर्वांचा संग्रह होनाजीनें त्र्यंबकजी डेंगळ्याच्या वाड्यांतील आपल्या खोलींत केला होता. त्र्यंबकजी डेंगळ्याचा हा वाडा शुक्रवारात भोतकराच्या हवेलीसमोर मारुतीचे देवालय आहे त्याच्या शेजारीं होता.

तेथें होनाजीची एक स्वतंत्र खोलीच होती. तेथें तो आपले डफ, तंबोरी, मंजीरी इत्यादि तमाशाचीं वाद्यें व आपली मिळकत ठेवीत असे. पुढें इंग्रज सरकारनें त्र्यंबकजी डेंगळ्यास कैद करून सुतळीच्या तोड्यासुद्धां त्याची सर्व मिळकत जप्त केली, त्यांत होनाजीचेंहि सर्वस्व गेलें. पेशवाईनंतर कांहीं वर्षेंपर्यंत होनाजी हयात होता. इतर शाहीराप्रमाणें त्यालाहि पोटासाठीं बडोदें दरसाल पहावें लागत होतें. बडोद्याच्या सयाजी महाराजाकडून त्याला दोनशें रुपयांचें वर्षासन होतें. होनाजीच्या मृत्यूनंतरहि ग्यानू पाड नारळवाला नांवाचा इसम तें घेत असे, अशी माहिती शाळीग्राम यांनीं दिली आहे.

होनाजीचा शेवट मोठा वाईट झाला. कांहीं खाजगी अदावतीवरून त्यावर मारेकरी घालण्यांत आले. हा प्रकार भाद्रपद कृष्ण चतुर्दशीचे दिवशीं घडला. हां हां म्हणतां सर्वत्र बातमी पसरली व शहरांतील सर्व तमासगिरांनीं मोठ्या समारंभानें त्याच्या लावण्या म्हणत व भजन करीत त्याच्या शवाची मिरवणूक काढून मग प्रेतास अग्नि दिला. अद्यापपर्यंत दरसाल भाद्रपद कृष्ण चतुर्दशीचे दिवशीं पुणें शहरांतील सर्व तमाशे गवळी आळीत, होनाजीच्या वाड्यापुढें हजेरी देत असतात. होनाजीचा नक्की मृत्युशक किंवा सन मात्र कळत नाहीं. होनाजीस कुशाबा आणि बाबाजी नांवाचे दोन मुलगे होते. त्यांनींहि कांहीं दिवस तमाशाचा धंदा चालविला. त्यांस इंग्रजसरकारकडून बुधवार वाड्यापुढें शिमग्यांत ५ दिवस तमाशा करण्याबद्दल सालिना शंभर रुपये मिळत असत.

## होनाजीचें काव्य

लावण्या पोवाडे मिळून होनाजीचीं जीं कवनें आज उपलब्ध आहेत त्यांचीं संख्या दीडशेंच्यावर नाहीं. त्यानें रचलेल्या पोवाड्यांची संख्या चार-पांच इतकी आहे. यांपैकीं रंगाचा व खर्ड्याच्या लढाईचा हे दोन सवाई माधवरावाच्या कारकीर्दीवर आहेत. रंगाचा पोवाडा भर दरबारांतच गायिला होता. पोवाड्याचे शेवटीं स्पष्टच म्हटलें आहे—

" होनाजी बाळा पदरचा आहे किंकर,
विज्ञप्ती श्रुत करितो जोडूनि कर।
अक्षयी असावी कृपा सेवकावर।
धनी बक्षीस देणार. "

खर्ड्यांच्या लढाईचा पोवाडा मात्र सवाईमाधवरावाच्या मृत्यूनंतर तयार केला असावा असें त्यांतील,

" सर करुनिया सर्वेहि सृष्टी। शके १७१७ राक्षस नाम संवत्सरी।
शुक्लपक्ष अश्विनी पौर्णिमा। ते दिवशीं सायंकाळीं
मग संपाविला अवतार आपला "

या उल्लेखावरून स्पष्टच आहे. सवाईमाधवराव वारल्यानंतर बाजीरावाला गादीवर बसवावयाचें कीं यशोदाबाईच्या दत्तकास ह्याचा फारच मोठा घोळ पुण्यास पडला होता. त्या वेळीं लोकमत मात्र बाजीरावासच अनुकूल होतें. होनाजीनें खर्ड्यांच्या पोवाड्याच्या शेवटीं,

" गादीचा अधिकार ज्याला। लक्ष त्या श्रीमंतापायीं "

असें म्हणून तेव्हांच बाजीरावास मुजरा ठोकला होता. दुसरा बाजीराव प्रत्यक्ष गादीवर आल्यावर होनाजीनें त्यावर,

" श्रीमंत बाजीराव प्रभूचें पुण्य आगळे दिसे।
जिवनीं लवणापरी परस्पर शत्रु विराले तसे। "

हा स्तुतीपर पोवाडा रचला. त्यांत बाजीरावाच्या गुणदोषांची चाटु स्तुति सांपडेल. " गत वस्तु सायास न करितां ज्याचि त्यास लाभली, " असें म्हणून पेशवाईवरील वारशाचा बाजीराव जो आपल्या बापापासून दावा सांगत आला होता त्याचा त्यानें पुरस्कार केला आहे. बाजीराव स्वभावानें अत्यंत चंचल आणि कपटी होता; पण त्याच्या या दोषाचेंहि वर्णन होनाजीनें कसें केलें आहे पहा,

" आज मर्जि कोणची उद्याचा बेत नेम मसलती।
शेवक जन संन्नीध परंतु हे कोणिच नेणती।

कळो न द्यावे कोणा एकांतीच्या गुज गुह्याप्रति ।
ह्यास्तव ते नरपाल विचारी गुप्तरुपे बैसती ।
जें जनांत बोलणें तेंच प्रकटांत करुनि दाविती ।
हे मुख्य प्रभूचें लक्षण प्रत्यक्ष ह्यास वचन भारती ॥ ”

या नंतर म्हणजे बाजीरावाच्या राज्यारोहणापासून त्याच्या राज्यत्यागाच्या वेळेपर्यंतच्या कारकीर्दीवर होनाजीचा पोवाडा नाहीं. आणि पोवाडा रचण्यासारखी बाजीरावाची स्वारीशिकारी किंवा मुलुखगिरीहि कांहीं नव्हतीच. उलट त्याची सर्व कारकीर्द बेफाम चैनबाजी आणि कुपात्रीं उदारदानें यांनीच भरलेली. अर्थात् बाजीरावाच्या विलास-कांडावर होनाजीच्या शृंगारिक लावण्या बऱ्याच आहेत. दुसऱ्या बाजीरावींत पहिलीं कांहीं वर्षें पेशवाईचा मालक दौलतराव शिंदेच जवळ जवळ बनला होता. तो आपल्या सैन्याच्या बळावर पुण्यांत म्हणेल तें करूं शकत होता. त्या दौलतराव शिंद्यावर होनाजीनें लिहिलेला एक अप्रसिद्ध पोवाडा आम्हांस नवीनच उपलब्ध झाला आहे. यानंतर खडकी—अष्टीच्या लढाया होऊन महाराष्ट्राचें स्वराज्य देशोधडीं लागलें. त्या वेळच्या करुण प्रसंगावर होनाजीच्या,

“ दिन असतां अंधार आकाश तळी पडला बाई । ” ही, व
“ शके सतराशे एकुणचाळिसामधीं,
ईश्वरे नाम हा बरवा संवत्सर होता तधी ।
झालि प्रथम लढाई दिपवाळीचे आधी । ”

ही; अशा दोन पोवाडेवजा लावण्या आहेत. त्या मात्र अत्यंत सरस आहेत. त्यांच्या चालीहि हृदयास लागण्या सारख्या आहेत. करुणापर असून त्या ऐकतांच हृदय अति दुःखानें भरून येतें. अशी साक्ष त्या चाली ऐकावयास मिळालेल्या शाळिग्रामांनीं दिली आहे. दुर्दैवानें आतां त्या चाली म्हणून दाखविणारा कोणीच राहिलेला नाहीं. तथापि छापील पुस्तकावरून या लावण्या वाचल्या तरी मनाची अगदीं कालवाकालव होऊन जाते. सभोंवार खिन्न उदासीनता पसरल्यासारखी वाटते आणि आपण क्षणभर बाजीरावाच्या काळींच असून स्वराज्यनाशाचा दुःखकारक सोहळा स्वतःअनुभवीत आहोंत असें भासतें.

बाजीरावाच्या सैन्यांतील कोणा शिलेदाराच्या स्त्रिया शोक करीत आहेत असें स्वरूप देऊन ह्या लावण्या रचल्या आहेत.

" भर दिपवाळीमध्यें युद्ध चाललें शस्त्र अस्त्री ।
श्रीमंत—इंग्रज—दळी किती एक शूर पावले परत्री ।
त्यांत सखा सर्वज्ञ अतां कधि हरि दाविल नेत्री ।
निजध्यास लागला पडेना चैन दिवस रात्री ।
तेजहीन ह्या प्रजा प्रभु करितां जळती अंत्रीं ।
मूर्तिमंत ये काळी विषय विधवारूपे धरत्रीं । "

किंवा

" कुंकुमहनि दक्षिण-वनितेचे वदन दैन्यवाणे ।
येक्या प्राण्याविण उदास दिसती ते देशपरगाणे । "

वगैरे वर्णनें काळजाला पोळून जातात.

पोवाड्यानंतर होनाजीचें जें कवित्व आहे, त्यांत सर्व लावण्याच असून शृंगारिक लावण्यांचा हिस्सा मोठा आहे. दुर्दैवानें शाहिरी कवितेला तो एक मोठाच कलंक आहे, वाढयाशिवाय जसा ऊस सांपडावयाचा नाहीं त्याप्रमाणें कोणाहि शाहिराची कविता घेतली तरी त्यांत कांहीं कांहीं लावण्या या बीभत्स अश्लील असावयाच्याच. तथापि वाढयाकरितां कोणी ऊस खाण्याचें टाकून दिलेलें नाहीं; वाढीं तोडून टाकलीं म्हणजे बाकीची सर्व साखरच आहे. सुज्ञ लोक तीच साखर-पेरीं खातात. उलटपक्षीं गुरें मात्र उसाची वाढीं आधाशासारखीं खातात. त्याप्रमाणें हीन रुचीचे लोक इतर चांगला भाग सोडून त्या गलिच्छ लावण्यांत रमतात. याला एक उपाय आहे व तो हाच कीं, वरील शाहीर लोकांच्या तशा लावण्या वगळून बाकीच्या शब्दार्थ व टीपा देऊन प्रसिद्ध करणें व त्यांचा शाळादिकांत प्रसार करणें. असें झालें तरच ही शाहिरी कविता समाजास परिचित व प्रिय होईल.

बाकीच्या, लावण्या इतर शाहिराप्रमाणेंच, ईश्वरस्तुतीपर, पौराणिक कथापर, क्षेत्र वर्णनपर व सामाजिक वर्णनपर आहेत. कृष्णाच्या बाललीलापर होनाजीच्या लावण्यांत, 'घनःशाम सुंदरा' ही त्याची भूपाळीची लावणी खरोखरीच 'अमर' आहे. तेवढी त्याची एकच भूपाळी शिल्लक रहाती तरी सुद्धां त्याचें नांव चिरंजीव झालें असतें. होनाजीच्या रचनेंत प्रसाद हा काव्यगुण सर्वत्र असून ह्या भूपाळींत तो मोठ्या प्रसन्नतेंत आहे. होनाजीच्या मृत्यूनंतर शंभर वर्षांनीं गोविंदाग्रजांना होनाजीच्या भूपाळीनें स्फूर्ति होऊन त्यांनीं 'महाराष्ट्राची भूपाळी' तशीच रचावी आणि त्यांत, "तुला जागवी ऐन पहाटे गवळी गोपाळ। धार दुधाची काढित काढित होनाजी बाळ। अशी त्याची आठवण काढावी ह्यांतच होनाजीच्या कवित्व गुणाचा व्हावयास पाहिजे तो सर्व गौरव होऊन चुकला आहे !

"झाडी घनदाट दिशा ढवळी। मोठा दुर्धर पंथ दिसेना सूर्य अभ्रमंडळी।
निबिड तरूच्या जाळ्या। त्यांतुन देती व्याघ्र आरोळ्या।
अस्वले दिवाभीते सायेळ्या। देति गुंघाटे किंकाळ्या।
बदके बिडाळके पाकोळ्या। कस्तुरि मृग भुजंग वेटोळ्या।
जांभया देऊन चाटति जिभळ्या। नाना जाति श्वापद पाळया।
हिंडती वनी निःसंग निराळ्या।"

किंवा

"सरळ चिरी कुंकाचि कपाळी लाल जशी पिकली मिरची"

किंवा

"ज्याला घातले पाठीशी जावे मग कां त्याचे वाटेशी।"
"नको लांबणिवर घालु उगवला दिवस जातो राहिना।
ह्या मनुष्य जन्मीचा भरवसा कोणाला येईना"

किंवा

"अपवित्रा दृष्टीनें मुलीच्या होत्या बारा स्थळिं फिरल्या।
दुपारच्या साउल्या न होती त्या बहुल्या वरल्या ॥"

किंवा

“ बांधिय बुचड्याची लवक पदर अति सुबक खोविला तिपदरी वेणिचा ।
चंदन ढाळित जसा लपेटा काळे नागिणिचा ॥ ”

अशा सरस पंक्ती होनाजीच्या कवनांत जागोजाग प्रसन्न प्रवाहांत फुललेल्या कमलाप्रमाणें दृष्टीस पडतात. ( आधुनिक महाराष्ट्रांतील सुप्रसिद्ध कवि बी ह्यांच्या विख्यात ‘ कमला ’ काव्यांतील, “ चंदन विटपा जसा लपेटा जहरी सर्पाचा ” हा चरण त्यांना होनाजीच्या ह्या चरणावरूनच सुचला असेल असा तर्क केल्यास तो चूक ठरणार नाहीं. )

होनाजीनें पुराणांतील उपदेशपर कथा लावण्यांत रचून समाजाला नीतिबोध पुष्कळच केला आहे. त्यापैकीं—

“ जन्मोजन्मी हरिप्राप्तस्तिव उद्युक्त भामासती ।
प्रश्न पुसुन नारदालागि तो दान दिला श्रीपती ॥ ”

ह्या लावणीचा मुद्दाम, अखेरीस परिचय करून द्यावासा वाटतो. त्यांत निष्काम प्रेम हेंच खरें प्रेम व त्यालाच ईश्वर वश असतो हें तत्त्व पुराणांतरींच्या गोष्टींत आपला विनोदी मालमसाला मिसळून अधिक मनोहर करून होनाजीनें लोकांच्या मनांवर ठसविण्याचा प्रयत्न केला आहे. सत्यभामेनें नारदास विचारलें, “ हे नारदमुने ! ह्या जन्मीं तर मी कृष्णाला जिंकून मुठींत ठेवलें आहे. पण तो जन्मोजन्मींसुद्धां मला मुकणार नाहीं अशी कांहीं तरी युक्ति मला सांगा. ” नारद हा जगाला नीतितत्त्वें सोदाहरण शिकवण्याकरितांच निर्माण झालेला कळलाव्या; त्यानें ताबडतोब तिला सांगितलें, “ बा ! काय हें तुझें पातिव्रत्य ! एक युक्ति आहे. ती ही कीं जे आपल्याला अतिप्रिय असतें तेंच दान करून टाकलें म्हणजे तें आपल्याकडे चालत येतें. म्हणून तूं कृष्णाचें मला दान करून टाक म्हणजे झालें. ” भोळी सत्यभामा. तिनें कृष्णाचा सल्ला घेतला. कृष्ण काय ! नारदाचाच साथी ! तो म्हणाला, “ अगदीं बरोबर. पण

तुझा हेतु साधावयाचा तर तुझ्या सोळा हजार सवतींना ह्याची कुणकूण कळण्याच्या आंत दान देऊन मोकळी हो. मग बसूं दे त्या सगळ्या जणींना हात चोळीत."

"भामे, हरि म्हणे त्वरा कर क्षणी।
सखये ही मात न फुटतां जनीं।"

तेव्हां तेथेंच भामेनें नारदास कृष्णाचें दान दिलें; मग लुच्चा नारद पोट भरल्या सारखा म्हणाला,

"नारद म्हणे हे त्रिजग धुंडिता न मिळे असा सोबती."

मग त्यानें कृष्णाला हुकूम केला,

देवा ऊठ तूं माझा आतां गुलाम आहेस.

"उठ चाल त्वरें मजसवें जगन्नायका।
विणा गवाळें पुस्तक, सांभाळि आमुच्या पादुका।"

मग काय? तो त्रैलोक्याचा भटक्या नारद पुढें आणि मागें श्रीकृष्ण असे धांवत आहेत.

इकडे सगळ्यांना आश्चर्याचा हादरा बसला. सगळ्या सवतींनीं सत्यभामेला लाखोली वाहिली कीं, "कोण होशी वैरिण, भामे अनर्थ न पाहतां त्वां अपपरमार्थ गमाऊनि व्यर्थ पतिदानार्थ कोणे शास्त्रार्थ सुचविला?" कृष्णाची आई देवकी आली. ती डोकें फोडून रडूं लागली. बळिरामदादा तर क्रोधानें लाले लाल झाला आणि त्यानें आपलें सैन्यच नारदामागें लावलें. गाठ पडतांच नारदानें सांगितलें,

"दान करी भामा कृष्णासी, आम्ही ठकवुनि नेतो काय हरीसी।"

नारद कसा खोटें बोलेल? शेवटीं बळिरामदादानें तोड काढली "कीं तूं कृष्ण चोरला नाहींस, कबूल आहे. दानामुळें तो तुझ्याच मालकीचा झाला, हेंही

कबूल; पण आतां कांहीं तरी 'पालट' म्हणजे मोबदला घेऊन तूं आमचा कृष्ण आम्हास परत दे. म्हणजे कृष्णाच्या राण्या, त्याची आई, सर्व यादव, अखिल प्रजाजन ह्यांचा जीव भांड्यांत पडेल." त्यावर नारद बळेंच ओढून धरून म्हणूं लागला,

" ब्रह्मादि वंदिती ज्या यदुकुल भूषणा।
अनायासे लाधला आम्हाप्रति न करितांचि साधना।
ते वस्तू तुम्ही नेऊ म्हणत असा मज ठकवुनि ब्राह्मणा"।

पण अखेर दया येऊन, तो म्हणाला, " बरें आहे. कृष्णाच्या भारंभार सोनें घेऊन मी तुमचा कृष्ण तुम्हास देण्यास कबूल आहे." मग तुळेकरतां मोठा घट आणून बसविला आणि कृष्णाला एका पारड्यांत बसविलें. सत्यभामा ही श्रीमंताची लेक. त्याचा तिला फार गर्व. तिच्या बापानें म्हणजे सत्राजितानें तिला लग्नाचे वेळीं एक मणी दिला होता. त्यांतून रोज पाहिजे तेवढ्या सोन्याच्या राशी प्रसवत असत. तिनें तोच मणी आणून दुसऱ्या पारड्यांत घातला; पण काय ?

" तरि कदापि न उचले ते पारडे।
पडे समुद्रामाजी हरळ तैसे झाले रडे।"

मग देवकी आणि समस्त यादवांनीं असतील नसतील त्या अष्ट धातु आणून पारड्यांत घातल्या तरी कांहीं नाहीं.

" जन करिती आश्चर्य बहु जड झाला श्रीहरी।"

अखेर रुक्मिणी कृष्णाचें ध्यान करीत निमग्न होती तिला ही वार्ता सांगून विदुरानें तेथें आणलें. तिनें दुसरें तिसरें कांहींच केलें नाहीं. निरपेक्ष प्रेमानें तुळशीचें एक पान घेऊन मनोमन तें कृष्णार्पण केलें आणि तेंच पान पदराखालीं झांकून आणून पारड्यांत टाकलें आणि चमत्कार असा झाला कीं,

" सुवर्ण काढूनि तुळेंतें तुलसीपत्र ठेवितां। पारडे उंच उसळले !!।"

आणि अशा रीतीनें,

" भीमकिनें भावार्थे सोडवुन नेला श्रीहरि ह्या रिती।"

## अभ्यासाच्या वाटा

( १ ) ' होनाजीला कवित्वाची देणगी पिढीजात होती. ' होनाजीच्या वडीलधाऱ्यांची माहिती देऊन हें विधान स्पष्ट करा.

( २ ) ' बाळा बहिरू ' बद्दल तुम्हांस विशेष काय माहिती आहे.

( ३ ) ' होनाजी बाळा ' हें नांव कसें सिद्ध झालें ?

( ४ ) लावणीप्रकारांत होनाजीनें कोणत्या नवीन गोष्टी रूढ केल्या ? त्याचा परिणाम काय झाला ?

( ५ ) शाहिरी वाङ्मयाबद्दल दादोबा पांडुरंगांचें काय मत आहे ?

( ६ ) होनाजीची आयुष्याची अखेरी कशी गेली ? त्याचा अंत कसा झाला ?

( ७ ) होनाजीच्या पोवाड्यांत प्रसिद्ध पोवाडा कोणता ? त्याच्या लावण्यांचें स्वरूप कसें आहे ?

( ८ ) ' अमर भूपाळी ' कोणती ? त्या भूपाळीचें रसग्रहण करा.

( ९ ) होनाजीच्या एखाद्या कथात्मक लावणीची सविस्तर माहिती लिहा.

## अनंतफंदी : : : ३

अनंतफंदीचा जन्म सन १७४४ सालीं झाला. हा यजुर्वेदी कौंडिण्य गोत्री ब्राह्मण. आडनांव घोलप. याच्या पूर्वजांचा धंदा गोंधळीपणाचा व सराफीचा असा सजोड असे. अनंतफंदीच्या वडिलांचें नांव काय, ते काय उद्योग करीत वगैरेसंबंधीं कांहींच माहिती मिळत नाहीं. पण फंदीबुवाच्या बालपणच्या वगैरे ज्या आख्यायिका उपलब्ध आहेत, त्यावरून फंदीबुवाचे वडील लहानपणींच निवर्तले असून त्याच्या विधवा बायकोनें म्हणजे राऊबाईनेंच नंतर या एकुलत्या एक लहानग्याचा प्रतिपाल केला असावा, असें म्हणतां येतें. लहानपणीं फंदीबुवाला कोणाचाच धाक नव्हता. बाप वारलेलाच होता. अशा स्थितींत आपल्या आईचें प्रेमसर्वस्व बनलेल्या एकुलत्या एक पोराला तिचा कितीसा धाक लागणार ? तिचा कांहींहि उपाय न चालून फंदीबुवा लवकरच गांवांतला एक खोडकर, उनाड पोरगा बनला. त्यानें लिहिणें-पुसणें अगदीं सोडलें. दोन वेळ गिळायला तेवढें आईचें तोंड पाहून सगळा दिवस उनाडक्यांत घालवावा आणि नंतर सगळी रात्र उजाडून येईपर्यंत तमासगिरांच्या फडांत काढावी, हा क्रम त्यानें धरला. याच काळांत एक दिवस आईशीं भांडून रागारागानें फंदीबुवा हा भवानीबुवा म्हणून एक अवलिया संगमनेरांत होता, त्याच्या मठांत जाऊन बसला. त्याची आई तेथें आली व भवानीबुवाजवळ आपल्या मुलाचीं गाऱ्हाणीं सांगूं लागली; तेव्हां अकस्मात् त्या वुरदी पुरुषाच्या कृपेनें फंदीबुवाला तेथेंच कवित्व स्फूर्ति झाली ! या आख्यायिकेचें तात्पर्य इतकेंच धरून चालावयास हरकत नाहीं, कीं फंदीबुवा लहानपणापासूनच कवित्व करूं लागला. त्याचा वडिलार्जित धंदा गोंधळीपणाचाच असल्यामुळें ही कवित्वाची विद्या त्याला स्वल्प परिश्रमानें साध्य

होण्यासहि मदतच होण्यासारखी होती. तें कसेंहि असो, या विद्येच्या जोरावर तरुणपणांतच फंदीबुवानें आपला तमाशाचा फड निर्माण केला आणि राजरोस रीतीनें लावण्या रचून त्या म्हणण्याचा किंवा म्हणविण्याचा उद्योग करून, त्यानें चरितार्थाची सोय केली. या कामांतले त्याचे मुख्य साथीदार मलकफंदी, रतनफंदी व राघवफंदी असे तिघेजण असत, असें त्याच्या लावण्यांवरून दिसतें.

आपल्या उमेदींत असतां फंदीबुवानें निरनिराळ्या प्रांतांत अनेक मुलुखगिऱ्या केल्या. जिकडे तिकडे लौकिक मिळविला. उमाप पैसा जोडला. प्रौढ वयांत वयोमानानुरूप त्यानें शृंगारिक, ग्राम्य लावण्या रचण्याचें टाकून देऊन, आपली वाणी परमार्थाकडे वळविली व कीर्तनकाराचा पेशा स्वीकारला. हा पेशा त्यानें अहिल्याबाईचे उपदेशावरून स्वीकारला, अशी आख्यायिका आहे. त्याच्या समयसूचकतेच्या आणि शीघ्र कवित्वाच्या गुणाला हा पेशा फारच मानवला. उत्तर वयांत पुणें प्रांतांत त्याचा अत्यंत बोलबाला झाला. अनंतफंदी पुण्यास प्रथम केव्हां आला हें कळण्यास मार्ग नाहीं. परंतु १७९५ सालीं खर्ड्यांचे स्वारीचे वेळीं पुण्यास त्याचें वास्तव्य होतें व दरबारांत त्याचा परामर्श घेण्यांत आला होता, हें नक्की आहे; कारण 'सवाई माधवराव सवारी' या खर्ड्यांचे पोवाड्याचे शेवटीं स्पष्ट उल्लेख केला आहे कीं, "फंदी अनंत कटिबंद छंद ललकारी श्रीमंताचे दरबारीं." सवाई माधवरावानंतर रावबाजीच्या कारकीर्दींत सुरवातीस अनंत फंदीचा फारच गौरव झाला. खुद्द बाजीरावाची त्याच्यावर बहाल मर्जी बसून गेली. इतकी कीं आपल्या खासगत पत्रव्यवहारावरून स्वतःच्या राज्यारोहणाच्या राजकारणाची सर्व हकीगत लिहून देऊन त्यानें फंदीबोवाकडून 'माधव-निधन काव्य' लिहून घेवविलें. कीर्तनकार या नात्यानें असलेला फंदीबोवाचा विलक्षण लौकिक पाहूनच धूर्त बाजीरावानें हा उद्योग केला असावा यांत शंका नाहीं. पण त्यावरून फंदीबुवाची तत्कालीन समाजावर केवढी छाप होती तें चांगलें दिसून येईल.

माधव-निधन आख्यानाचे सहा अध्याय असून त्यांत एकंदर ३५९ ओव्या आहेत. सवाई माधवरावाच्या मृत्यूनंतर जे घोटाळे आणि घालमेली झाल्या, नाना फडणीस, परशराम भाऊ व शिंदे यांनीं परस्परावर जे डाव टाकले त्याचें बाजीरावास अनुकूल अशा रीतीनें सुसंगत व सुगम वर्णन या आख्यानांत केलें आहे. बाजीराव हा सद्गुणांचा पुतळा असून गादीचा अधिकार त्यालाच कसा पोचत होता हें सांगून त्याच्या प्रतिपक्षीयांची बरीच निंदा त्यांत वाचावयास सांपडते. प्रत्येक अध्यायाचे शेवटीं,

" ही कथा बाजीराव रघुनाथें। लिहून दिधली आपुल्या हातें।
त्या पत्राबरहुकूम टीका येथें। कवित्व केलें कवीनें "

अशी, किंवा

" ही कथा राघवात्मजें। लिहीली आपुल्या स्वकरांबुजें।
लेखाबरहुकूम काय जें। कवित्व केलें फंदीनें "

अशी ग्वाही दिली असल्यामुळें ऐतिहासिक पुराव्याच्या दृष्टीनें या आख्यानाचें महत्त्व पहिल्या प्रतीचें मानावें लागतें. पटवर्धनी पत्रांतील पत्रांच्या प्रत्यंतर पुराव्यानें हें आख्यान सर्वस्वी सत्य, सुसंगत आहे असें दिसून येतें. या ओवीबद्ध आख्यानाचीच दुसरी एक विविधवृत्तात्मक प्रत उपलब्ध आहे. तिचा उपयोग फंदीबुवा कीर्तनाचे वेळीं करी.

फंदीबुवाची पुणें प्रांतांत केवढी छाप बसली होती याबाबत दुसराहि एक महत्त्वाचा पुरावा उपलब्ध आहे. महाराष्ट्रांतील विख्यात शाहीर होनाजी बाळ यानें फंदीबोवावर एक उत्कृष्ट लावणी रचिली आहे. त्यांत त्यानें त्याचें सुंदर चित्र काढलें आहे.

" फंदी अनंत कवनांचा सागर। "

" वाचा वाचस्पतीसारखी बहुतांचे तनमन हरखी।
लांगे लुंगे कवि भेदरले, अवघ्यावर त्याची गुर्की। "

" समोर गाता कोणी टिकेना।" " धन ज्याच्या हातचा मळ।"

" फंदी आनंदी छंदी, वरदी ब्राह्मण, त्यावर गुरुकृपा।"

" अकट बिकट कवनांच्या चाली नित्य नव्या अक्षयि थापा।"

" विद्याभिमान नाही जयाला असा कवी कंचा धुंडा।"

" कीर्तन रंगी झडा घालिती मानवला सर्वत्रांसी असे।
पुढे मागे ऐसा नसे दुसरा मृत्युलोकीचा रहिवासी"

" पहावे रत्न पंधरावे," इत्यादि वर्णनानंतर जास्त कांहीं लिहिण्याचें कारण नाहीं.

तथापि ती लावणी फारच सुंदर असल्यामुळें येथें सबंध उद्धृत करण्याचा मोह आवरत नाहीं.

" फंदी अनंत कवनाचा सागर। अजिंक्य ज्याचा हातखंडा।
चमत्कार चहुकडें चालतो। सृष्टीवर ज्याचा झेंडा॥
मूळ संगमनेर ठिकाण त्याचें। कीर्ति उदय जैसा अर्की।
नविन तऱ्हा नारळी डोइला। पदर पागोट्याची फिर्की॥
वाचावंत संपत्ति सारखी। बहुतांचे तनमन हरकी।
लांगे लुंगे कवि भेदरले। अवघ्यांवर त्याची गुर्की॥
समोर गातां कोणि टिकेना। मनामधीं बसली कर्की।
धन ज्याचा हातचा मळ। केवळ तो रुप्याचा हंडा॥
फंदि आनंदी छंदी वरदी। ब्राह्मण त्यावर गुरुकृपा।
सरस्वती जिव्हाग्रि अक्षयी। भंग नसे ज्याच्या हरपा॥
कवन बहुत उदरामधिं भरले। फणस जसा मोठा कापा।
भाळीं त्रिपुंड टिळा केसरी। कस्तुरिका वरती छापा॥
मोठमोठ्या राज्यामधि महशुर। जगजाहिर चारी तर्फा।
अकट बिकट कवनाच्या चाली। नित्य नव्या अक्षयि थापा॥
विद्या अभिमान नाहीं जयाला। असा कवि कंचा धुंडा।

नांवाचे चांदणे जगाचे । मुख्य मुख्य खासे खासे ॥
कीर्तनरंगी झडा घालिती । मानवला सर्वत्रासी असे ।
पुढे मागे ऐसा नसे दुसरा । मृत्युलोकिंचा रहिवासी ॥
पहावे रत्न पंधरावे; माता । धन्य जन्मली हे त्यासी ।
असा पुरुष चिरकाल असावा । गुण निर्गुण पंडितराशी ॥
होनाजी बाळा म्हणे जगावा । बहुतकाळ आयुष्य यासी ।
अवीट ज्याची करणि ऐकतां । देह प्राण होतो थंडा ।
गुरव त्याचे संगे सोबती । कुशलकला जाणे उदंडा ॥ ”

या लावणींत फंदीबुवाच्या पोशाख पेहरावाचें जें वर्णन आहे तेंहि लक्षांत घेण्यासारखें आहे. जुन्याकाळीं फोटोची कला अवगत नव्हती आणि चित्रें तसबिरा काढलीं जात तींहि बहुधा सरदार दरकदारांची; त्यामुळें शाहीर कीर्तनकारादि लोकांच्या जुन्या तसबिरा उपलब्ध होणें अशक्यच. म्हणूनच सदर लावणींत—

‘ नविन तऱ्हा नारळी डोइला । पदर पागोट्याची फिर्की

किंवा

‘ भाळीं त्रिपुंड टिळा केसरी । कस्तुरिचा वरती छापा ’

इत्यादि फंदीबुवाच्या पोशाख पेहरावाचा जो उल्लेख आहे त्याची अपूर्वाई !

समकालीन प्रसिद्ध कवींकडून स्तुतीचा काभार मिळविण्याचें आणि प्रत्यक्ष पेशव्याच्या हातानें काव्यसामुग्री लिहून मिळण्याचें परमभाग्य मराठी शाहिरांतील दुसऱ्या कोणासहि लाभलेलें नाहीं. इ. स. १८०० ते १८०१ नंतर फंदीबोवा पुणें प्रांतांत नव्हते असें दिसतें. सन १८०६ च्या सुमारास यशवंतराव होळकराचा दंगा उसळला. यशवंतरावानें बाजीरावाच्या व शिंद्याच्या फौजांचा हडपसरच्या लढाईत पराभव करून बाजीरावास कोंकणांत पळवून लावलें आणि पुढें बरेच दिवस त्यानें पुणें प्रांतांत अंमल गाजविला. या काळांत रयतेचा अतोनात छळ झाला. अनंतफंदीनें हडपसरच्या लढाईवर

व यशवंतरावाच्या पुणें प्रांतांतील कारभारावर एक पोवाडा रचलेला सांपडतो. हा पोवाडा हडपसरच्या लढाईनंतर लगेच रचून यशवंतराव होळकराला ऐकविण्यांत आला असावा; कारण—

" अनंत फंदीचे छंद ऐकतां लढाई ही झाली सारी ।
सुभेदार यशवंत कन्हैया । सदा फत्ते करि तलवारी । "

असें पोवाड्याच्या शेवटीं स्पष्टच सांगितलें आहे. दुसऱ्या बाजीरावाला यशवंतराव होळकराविषयीं निस्सीम द्वेष आणि भीति वाटत असे व त्यानें बाजीरावास पळतां भुई थोडी करून इंग्रजांचा आश्रय घेण्यास भाग पाडलें आणि अखेर इंग्रजांशीं त्याच्या झालेल्या वसईच्या तहानें तो इंग्रजांचा गुलाम बनला. यामुळें तर यशवंतरावाच्या नांवाचा उच्चारहि त्याच्या पुढें कोणी केल्यास तो नखशिखांत संतापून जाऊं लागला. अशा त्या यशवंतराव होळकराचा स्तुतीपर पोवाडा अनंतफंदीनें रचला हें सुद्धां अनंतफंदीवर बाजीरावाची एकदम गैरमर्जी होण्यास कारण झालें असावें. वास्तविक पोटार्थी हरदासाला किंवा शाहीराला येईल त्या धन्याची स्तुति करण्याखेरीज गत्यंतर नसतें, हें बाजीरावाला समजत नसेल असें नाहीं. परंतु त्या राजेश्रींचा असा कांहीं मनस्वी व छांदस स्वभाव होता कीं एकदां खुनस किंवा अढी कोणाविषयीं बसली, म्हणजे ती निघूंच नये. कसेंहि असो, कारण कांहींहि असो, परंतु पुणें दरबारांत बाजीराव पुन्हा पुण्यास येऊन गादीवर बसल्यावर अनंतफंदीचें त्याच्याशीं बिलकूल सौरस्य राहिलें नाहीं आणि ज्या तोंडानें, त्यानें कीर्तनांतून बाजीरावाचीं स्तुतीपर कवनें गायिलीं, किंवा आख्यानें लाविलीं त्याच तोंडानें ' वडिलांचे हातचे चाकर त्यास न मिळे भाकर ' अशी त्याची निंदा तो गाऊं लागला.

आपल्या ऐन उमेदींत फंदीबुवानें निरनिराळ्या अनेक प्रांतांत व राज्यांत मुलुखगिऱ्या केल्या व लौकिक मिळविला.

" मोठ्या मोठ्या राज्यामधिं महशूर । जगजाहिर चारी तर्फा ॥

असें त्याचें होनाजीनें वर्णन केलेंच आहे. उत्तर वयांत १८०३ च्या नंतरच्या काळांत तो मिरज, सांगली, बडोदें वगैरे ठिकाणीं जाऊं लागला. चिंतामणराव सांगलीकर, बाळासाहेब मिरजकर, फत्तेसिंग गायकवाड इत्यादिकांवर रचलेले पोवाडे त्या त्या मुक्कामांतीलच आहेत. तो १८१९ सालीं वारला. त्याचें वय तेव्हां ७५ वर्षांचें होतें.

अनंतफंदीला कवित्व करण्याची स्फूर्ति अगदीं पहिल्या पंचविशींतच झाली ही गोष्ट लक्षांत घेतां त्याचे हातून हमखास विपुल कवित्व लिहून झालें असलें पाहिजे; परंतु आज त्याचा जो कविता-संग्रह उपलब्ध आहे त्यांत सारे सात पोवाडे व पांच पंचवीसुत्र लावण्या आहेत. शिवाय त्यांतहि कांहीं संशयितच आहेत. उदाहरणार्थ—

" अनंत भगवंताची नामें । त्यांतुन हीं उत्तम "

ही संध्येवरील लावणी अनंत फंदीच्या, रामजोशाच्या व रामा लक्ष्मणाच्या अशा तिघांच्या संग्रहांत त्यांची त्यांची म्हणून छापलेली आहे. ' फंदी अनंत कवनांचा सागर ' अशी ज्याची समकालीन होनाजीनें स्तुति केली त्याचा जेम तेम 'घागर' भर सुद्धां कवन-संग्रह उपलब्ध होऊं नये हें दुर्दैव होय. तो त्याचा संग्रह साताप्पादिकांच्या लावण्याप्रमाणेंच कोठें तरी अजूनहि धूळ खात पडला नसेल कशावरून ? तो पुढें मागें एखाद्या पायाळू संशोधकाला सांपडेल अशी सदाशा बाळगत राहावें हेंच खरें. भासाचें नांव कालिदासादिकांनीं आदरानें उच्चारून प्रसिद्ध केलें होतें खरें; परंतु आश्चर्याची गोष्ट ही कीं गेलीं अनेक शतकेंपर्यंत भासाच्या नाटकाची एक ओळहि कोणास कधीं पाहावयास मिळाली नव्हती. परंतु गेल्या ३०–४० वर्षांतच भासाचीं बहुतेक सर्व नाटकें उपलब्ध होण्याचा चमत्कार घडलेला आहे. तेव्हां तशी आशा करणें अगदींच खुळेपणाचें खास ठरणार नाहीं. असो. अनंत फंदीला श्रीपत फंदी नांवाचा पुत्र होता. तोहि बापाप्रमाणें कीर्तन करून चरितार्थ चालवीत असे. तो स्वतःस सवाई फंदी म्हणवी. 'फंदी मूल' असा शेवट असलेल्या

लावण्या त्याच्याच आहेत. सवाई फंदीला पुन्हां अनंत फंदी आणि गणपत फंदी असे पुत्र होते. त्या सर्वांत कवित्व करण्याचा शोक पिढीजात चालत आला असून आजचे नवशिक्षित अनंत फंदीचे पणतू, अनंत फंदी, बी. ए. हेहि कवित्व करतात.

अनंतफंदीचा जन्म १७४४ सालीं झाला. अर्थात् होनाजी, प्रभाकर, परशराम, रामजोशी या पेशवाईतील शाहीरपंचकांतील लोकांपेक्षां तो वडील ठरतो. हें खरें असलें तरी कवित्व गुणाच्या बाबतींत त्या चारांहून तो लहानच गणला जाईल. पोवाडे लावण्यादिक सर्व जमेस धरून त्याची कवन-संख्या चाळीसच्या पुढें जात नाहीं. त्यांपैकीं पांच सहा ऐतिहासिक पोवाडे व माधव-निधन हा बखरवजा छंदोबद्ध प्रबंध यांची किंमत त्यांतील काव्यापेक्षां इतिहासामुळेंच फार आहे. तो भाग वगळून ज्या लावण्या म्हणून उरतात त्या सुमारच आहेत. अनंतफंदीचा भाषेचा, वर्णनाचा, सगळा थाट, देसुरी धनगरी वाटतो. वास्तविक परशराम हा सुद्धां अनंतफंदीसारखाच धनगट देशांतला आणि तसाच ग्रामीण आणि खेडवळ कवि. तथापि त्याच्यांत जी प्रतिभा, रचनाकौशल्य किंवा विद्वत्ता आहे तिचा गंधहि अनंतफंदींत सांपडणार नाहीं. मग प्रभाकर किंवा होनाजी यांच्या काव्यांत आढळणाऱ्या नाजुक, नागरी सुसंस्कृतपणा इत्यादि गुणाविषयीं बोलावयासच नको. अर्थात् त्याचा विनोदहि त्याच जातीचा म्हणजे शुद्ध शिमग्यांतील बीभत्सपणाच होय. कटायाच्या धर्तीवर धावती रचना करीत छल्ले, पल्ले, गल्ले, दुल्ले असले प्रास साधून ते चमत्कृतिजनक करण्याकडेच त्याचें लक्ष असतें. नाजुकपणा असा कोठें दिसावयाचा नाहीं. त्यानें लावणींतील एका कोमल व रंगेल नायिकेच्या पेहरावाचें वर्णन करतांना,

" दुमजली पैठणचे पातळ । लफ्फा घे टाचेची खबर । "

असें दांडगें केलें आहे! जुन्या भाषेंत एखाद्याची खबर घेणें याचा अर्थ त्याचें शासन करणें, असा होत असे. येथें तिच्या पैठणी पातळाचा भरजरी

पदर येवढा मोठा काढलेला होता कीं तो तिच्या पायाच्या टाचेपर्यंत पोंचत होता, हें नाजुक वर्णन वरील दांडगेश्वरी पद्धतीनें केलें आहे. त्याच्या एका नाजुक नायिकेच्या पायांतल्या जोडव्यांच्या आवाजाचें त्याला वर्णन करावयाचें तर —

" पायी जोडवी खणाणी ।

जसे घोड्याचे नाल वाजती आवाज कानी दणाणी । "

असले सणसणीत करून तो मोकळा होतो. परशराम हा त्याच्यासारखाच खेडवळ, देसूर, कवि असतांहि, हेंच वर्णन त्यानें,

" फरसबंदिवर हळू चालता । नथ नाकीं थरथरे । "

असें यथार्थ व सुंदर केलेलें आढळतें. नाहीं म्हणावयास अनंत फंदीचे " फटके " मात्र वैशिष्ट्यपूर्ण असून आज कालांतरानें तो त्या फटाक्यांच्या-मुळेंच केवळ लोकांच्या स्मरणांत राहिला आहे. या फटाक्यांतून साधा व्यावहारिक उपदेश निर्भीड सडक शब्दांनीं केलेला असून ते फटके खातांना श्रोत्यांना किंवा वाचकाला आनंदच वाटतो यांत मात्र संशय नाहीं. त्याच्या फटक्यापैकीं

" लंडे गुंडे हिरसे तट्टू, यांची संगत धरूं नको."

हा फटका फारच प्रसिद्ध आहे.

" त्रिकट वाट वहिवाट नसावी धोपट मार्गा सोडूं नको ।
संसारामधी ऐस आपला उगाच भटकत फिरू नको ।
वर्म कादुनी शरमायाला उणे कुणाला बोलु नको ।
बुडवाया दुसऱ्याचा ठेवा करुनी हेवा झटू नको ।
मी मोठा शहाणा धनाढ्यहि गर्व फार हा वाहु नको ।
एकाहुन एक चढी जगामधी थोरपणाला मिरवु नको ।
हिमायतीच्या बळे गरिबगुरिबाला तूं गुरकावु नको ।

दो दिवसाची जाइल सत्ता । अपेश माथा घेउ नको ।
विडा पैजेचा उचलु नको । उणी तराजू तोलु नको ।
गहाण कुणाचे डुलवु नको । असल्यावर भिक मागू नको ।
नसल्यावर सांगणे कशाला? गांव तुझा भिड धरूं नको ।
कष्टाची बरि भाजी भाकरी । तूप साखरे चोरु नको ।
आल्या अतिथा मुटभर द्याया मागे पुढती पाहूं नको."

फटक्यांतील हे खडे तात्त्विक बोल माहीत नसेल असा कोण आहे?

## अभ्यासाच्या वाटा

( १ ) अनंतफंदीच्या बालपणाबद्दल तुम्हांस काय माहिती आहे? फंदीच्या कवित्वस्फूर्तीबद्दल कोणती आख्यायिका आहे?

( २ ) अनंतफंदीला कीर्तनकाराचा पेशा अधिक कां मानवला?

( ३ ) 'माधव-निधन' काव्याबद्दलची सविस्तर माहिती लिहा.

( ४ ) होनाजीबाळानें अनंतफंदीची कोणत्या शब्दांत स्तुति केली आहे?

( ५ ) अनंतफंदीवर बाजीरावाची गैरमर्जी कां झाली?

( ६ ) 'शाहिरी वाङ्मयांत अनंदफंदीचें स्थान' या विषयावर एक निबंध लिहा.

# रामजोशी : : : ४

तमासगीर आणि कीर्तनकार या दोन्ही नात्यांनीं गाजलेले शाहीर दोनच. एक अनंत फंदी आणि दुसरा रामजोशी. इतर शाहिरांच्या मानानें रामजोशाच्या चरित्राची माहिती लोकांना थोडी अधिक आहे. याचें कारण जितकें त्याचें कवित्व आणि पांडित्य, तितकेंच त्याचें विक्षिप्त विलासी चरित्र! त्याच्या चरित्रासंबंधीं अनेक आठवणी, आख्यायिका किंवा दंतकथा प्रचलित होऊन त्या समाजांत दृढमूल झाल्या आहेत. रामजोशाला सोलापूरकर रामजोशी म्हणतात. कारण त्याचें घराणें सोलापुरांत फार जुन्या काळापासून वास्तव्य करीत आलें होतें. मुसलमानी पातशाहींत त्याच्या घराण्यांतील एक मुलगा सोलापूर येथील किल्ल्याच्या बांधकामाचे वेळीं बळी देण्यांत आला व त्याबद्दल पातशहानें कसबे सोलापूरची जोशीपणाची वृत्ति रामजोशाच्या पूर्वजांना करून दिली. त्या जोसकीचें वतन आजतागायतहि त्याचें घराणें उपभोगीत आहे. बळी दिलेल्या मुलाचें देऊळ सोलापूर किल्ल्याच्या दारांतच असलेलें अद्यापहि दाखवितात. रामजोशाचें खरें उपनांव तासे असें होतें. जोशी हें नांव पुढें त्यांच्या वृत्तीवरून पडलें.

रामजोशाचा बाप जगन्नाथ जोशी. त्याला अनंत जोशी नांवाचा एक भाऊ होता. हे दोघेहि बंधु चांगले पढीक विद्वान्, वेदशास्त्रसंपन्न होते. एका सनदेंत जगन्नाथ जोशाचा ' सिद्धांत-वक्ते ' असा उल्लेख केलेला सांपडतो. यावरून त्याचा पेशा ज्योतिषाचा, कीर्तनकाराचा किंवा पुराणिकाचा असावा हेंच स्पष्ट होतें. जगन्नाथ जोशानें आपल्या विद्येच्या जोरावर बरींच इनामें मिळविलीं. १७५८ सालीं जगन्नाथ जोशी व अनंत जोशी या दोघां बंधूंना नानासाहेब पेशव्यांनीं पुणें मुक्कामीं सनद देऊन सोलापुरास तीस बिघे जमीन

इनाम करून दिल्याचा दाखला सांपडतो. जगन्नाथपंताला दोन मुलगे झाले. थोरला मुद्गल व धाकटा रामजोशी. दोघां बंधूंत बऱ्याच वर्षांचें अंतर होतें. मुद्गल जोशी हा कथा-कीर्तन करून, पुराण सांगून आणि आपलीं वतनें, इनामें व वर्षासनें सांभाळून प्रपंच चालवीत असे. बाप वारल्यानंतर धाकट्या भावाचा म्हणजे रामजोशाचा सांभाळ त्यालाच करावा लागला. तो विद्वान् व व्युत्पन्न कविहि होता. त्याच्या मराठी स्फुट सुभाषितांच्या श्लोकांचा संग्रह इतिहाससंशोधकांना उपलब्ध झालेला आहे. तसेंच 'यदुवंश' नामक रघुवंशाच्या धर्तीवर रचलेलें त्याचें एकोणवीस सर्गांचें एक संस्कृत महाकाव्यहि उपलब्ध झालें आहे.

रामजोशाचा जन्म सन १७५८ च्या सुमारास झाला असावा. नक्की काळ कळण्यास कांहीं गमक नाहीं. परंतु १७७८ सालीं मुद्गल व रामजोशी या भावाभावांचे जे फारीखत पत्र झालें त्यावरून रामजोशाचा जन्म १७५८ सालचा किंवा त्या आधींचाहि असावा असें मानण्यास आधार सांपडतो.

सदर फारिकत सन १७७८, २२ मार्च रोजचें आहे व फारकत लिहून देणाऱ्या मुद्गल भटानें असे स्पष्टपणें म्हटलें आहे कीं, "लोकांचें देणें तुमचे व आमचे उभयतांचे मारफातीचें निघालें तें वारूं." सदर देणें थोडें थोडकें नसून साडेनऊशें रुपये होतें व त्यांतील सहाशें रुपये खुद्द एकट्या रामजोशानें केलेले होते! अर्थात् येवढें कर्ज उभारण्याची पत असलेला रामजोशी चांगला सज्ञान, प्रौढ, प्रपंचाची जबाबदारी ओळखणारा बावीस-तेवीस उमरीचा तरी असणें जरूर आहे. म्हणूनच त्याचा जन्म श्री. शाळिग्राम यांनीं ठरविल्याप्रमाणें सन १७६२ न स्वीकारतां तो सन १७५८ किंवा त्याहि पूर्वीं न्यावा लागतो.

लहानपणीं रामजोशानें बिलकूल अभ्यास केला नाहीं. तो जात्या फार बुद्धिमान् होता; पण अभ्यासापेक्षां स्वच्छंदी उनाडक्यांतच त्याचें सारें लक्ष असे. बापाप्रमाणें आईहि लहानपणींच वारलेली असल्यामुळें रामजोशाला

धाकांत धरील असें मायेचें माणूस कोणीच नव्हतें. भाऊ त्याला वडिलासारखा खरा, परंतु भावाचें व त्याचें पटेना. तो भावाच्या हुकमतीला न जुमानतां गांवांत छंद फंद बेलाशक करी. त्यांच्या घरासमोरच कोणा धोंडीबा शाहिराचा फड होता, तेथें त्यानें आपली बैठक थाटली. तथापि मूळ संस्कारहि कांहीं लोपत नाहीं. त्या फडांत बसतां बसतांच धोंडीबाला लावण्या रचून देण्याचेंहि काम रामजोशी करूं लागला. धोंडी शाहिराच्या नांवावर मोडणाऱ्या कांहीं लावण्या रामजोशानेंच करून दिलेल्या आहेत असें म्हणतात.

होतां होतां रामजोशाची वागणूक भावाला अगदीं असह्य झाली. तेव्हा दोघां भावांनीं एकमेकांपासून कायमची कायदेशीर फारकतच करून घेतली. फारकत-पत्रांत,

" आपण व तुम्ही एक स्थळीं असतां चालेनासे जाहले,
कजिया होऊं लागला, या निमित्य विभक्त जालो "

असें नमूद केलें आहे.

भावापासून फुटून निघाल्यावर मात्र, स्वतंत्र प्रपंचाची जबाबदारी रामजोशाला जाणवूं लागली व अखेर अनेक ठेंचा खात खात त्याचे डोळे साफ उघडले. आणि मग अनन्य-गतिक होऊन तो पंढरपुरास वे. शा. सं. बाबा पाध्ये यांच्याकडे अध्ययन करण्याकरितां जाऊन राहिला. तेथें कांहीं वर्षे राहून त्यानें उत्तम विद्या आणि कीर्तनाची कला संपादन केली व मग तो पुनरपि विद्वान् कीर्तनकाराच्या संभावित पेशानें सोलापुरास परत आला.

या प्रसंगाची एक आख्यायिका सांगतात ती उल्लेखनीय आहे. ' रामजोशी सोलापुरास परत आला त्या सुमारास मुद्गल जोशी हा सोलापुरांतील एका प्रसिद्ध देवालयांत भारत ग्रंथ सांगत होता. म्हणजे त्या ग्रंथावर त्याचें त्या देवळांत पुराण होत असे. परंतु त्या सुमारास त्यास ज्वर येऊं लागला होता. त्यामुळें कांहीं दिवस पुराण सांगण्यांत खंड पडला होता. ही गोष्ट रामजोशी यांस सोलापुरास जाताच समजली. ती अशी कीं बंधूने भेटीसाठीं हा घरीं

जाऊन थडकला नाहीं तोंच बंधू आजारी असल्याची खबर कळली. मुद्गल जोशानें रामजोशास पहातांच त्याजवर शिव्यांची वृष्टी केली आणि म्हणाला, " तूं आमच्या कुळांत केवळ बट्टा लावण्यास उत्पन्न झाला आहेस. जर संस्कृत भाषेचीं दोन अक्षरें शिकतास तर असा बोलण्याचा मला प्रसंग आला नसता. " वडील बंधूचें बोलणें रामजोशानें मुकाट्यानें ऐकून घेतल्यावर म्हणाला कीं " पोथी कोठें आहे ? मला आज पुराण सांगावयाचें आहे. " मुद्गल जोशी मुळचाच रागीट असून तापानें कावलेला, त्यांतून रामजोशाचें हें बोलणें ऐकून, ( रामजोशानें पंढरपुरीं राहून गीर्वाण भाषेचा व्यासंग केला होता ही गोष्ट मुद्गल जोशास मुळींच समजली नाहीं असें दिसतें ) संतापानें पोथी अंगावर टाकून म्हणाला, कीं " डफ वाजविण्यामध्यें आणि पुराण सांगण्यामध्यें महदंतर आहे, असें मला पक्कें ठाऊक आहे. " रामजोशानें त्या बोलण्याकडे कांहींच लक्ष न देतां पोथी उचलून ठेवून दिली. पुराणाची वेळ झाल्यावर ( पूर्वीं पोथीवरून मनन करीत असतात तसें यानें कांहींच न करितां ) पोथी घेऊन देवळांत गेला. नंतर व्यासपीठावर बसून पोथी सोडली. ग्रामस्थ मंडळी पुराण श्रवणासाठीं म्हणून जी आली होती त्यांनीं ही फंदीमूर्ति पुराण सांगण्याचा आव आणून बसलेली आहे असें पाहून विनोद करिती झाली. या स्वारीनें विणा लावून " या कुंदेंदु " या अक्षरांस प्रारंभ करितांच त्या गोड लकेऱ्यांत मंडळी थिजून गेली ! त्यास सर्व गोष्टींची सामुग्री मिळाल्यावर मग काय पाहिजे ! ! पुराणांत फारच बहार करून दिली. मुद्गल जोशी पुराण सांगत असे त्या दिवसापेक्षां त्रिगुणित श्रोते मंडळी ह्या दिवशीं अधिक जमली ! त्या सर्वांनीं वाहवा ! शाबास ! ! असे उद्गार तोंडांतून पुष्कळदां काढले ! ! ही त्याची पुराण सांगण्याची शैली पाहून सर्वांस विलक्षण कौतुक वाटून जे ते स्तुतिच करीत चालते झाले. हा लौकिक मुद्गल जोशी याचे कानांवरहि लवकरच गेला. त्यानें प्रकृतीस

त्या अलौकिक गुणांचा विलक्षणच अचंबा वाटला. त्या दिवसापासून मुद्गल-जोशी रामजोशावर प्रेम करूं लागला व मागील सर्व राग त्यानें सोडून दिला. '

या काळानंतर त्याचा जिकडे तिकडे बोलबाला होऊं लागला. पंढरपुरच्या त्याच्या मुक्कामांतच सुप्रसिद्ध मोरोपंत कवीची कीर्ति त्याचे कानांवर गेली होती; परंतु तेव्हां त्यांच्याशीं परिचय होण्याचा योग आला नाहीं. तो पुढें एके प्रसंगीं बाबूजी नाईक बारामतीकरांच्या घरीं झालेल्या कीर्तन प्रसंगीं घडून आला व तेव्हांपासून उभयतांत परस्परांविषयीं फार आदर व स्नेह उत्पन्न झाला. इतका कीं मोरोपंत कागदोपत्रीं रामजोशाला 'कविप्रवर' असें संबोधूं लागले. तर उलट रामजोशी मोरोपंताना काव्य रचनेंतील गुरु म्हणूं लागला. यमकांची खटपट, भाषेची सजावट, संस्कृत व प्राकृत शब्दांचें मिश्रण, एक चरण मराठी, तर एक चरण संस्कृत, तर कधीं संपूर्णच संस्कृत कविता इत्यादि रामजोशाच्या लकबी पाहतां, गुरूची विद्या शिष्याला चांगलीच अवगत होती, असें स्पष्ट दिसतें. रामजोशानें मोरोपंतांच्या पायापाशीं आपला डफ फोडून टाकला व त्यांचें शिष्यत्व तेथेंच पत्करिलें ही दंतकथा खरी असो वा नसो, रामजोशाच्या रचनाशैलीवर मोरोपंतांची छाप पुष्कळच आहे यांत शंका नाहीं. मोरोपंतांच्या आर्या रामजोशानेंच प्रथम आपल्या कथा-कीर्तनांतून सर्रास उपयोगांत आणून मोरोपंतांची कीर्ति महाराष्ट्रांत आबाल वृद्धांपर्यंत पसरविली.

यानंतर पुढील आयुष्यांत रामजोशी महाराष्ट्रभर कथा-कीर्तनें करीत होता. पंढरपूरवर्णन, तुळजापूरवर्णन, गिरीच्या व्यंकटेशाचें वर्णन, बार्शीच्या भगवंताचें वर्णन वगैरे लावण्या त्या त्या प्रवासांतच निर्माण झाल्या आहेत. पुण्यास तो दरसाल येऊन जाई, असें म्हणतात. दुसऱ्या बाजीरावाच्या कारकीर्दींत त्यानें पुणेंकरांवर मोठीच मोहिनी घातली होती. बाजीरावाची त्याच्यावर मर्जी बसली. या संबंधांत नवीन संशोधनानें पुढील विश्वसनीय बाबी प्रथमच लोकांपुढें येत आहेत.

पुण्यास १७९३ पासून रामजोशाची उत्तम कीर्तनकार म्हणून ख्याति सुरू झाली. त्या सालीं कोणा गोविंदराव बाजी जोशी नांवाच्या गृहस्थानें स्वतःच्या घरीं रामजोशाचे प्रथम कीर्तन करविलें. दुसऱ्या बाजीरावाचे व त्याचा दिवाण सदाशिव माणकेश्वर याचे जे खाजगी जमाखर्च उपलब्ध झाले आहेत त्यावरून बाजीराव सरकार वाड्यांत रामजोशाचीं कीर्तनें नेहमीं करवी, असें दिसतें. १८०८ सालच्या जमाखर्चांत गोकुळाष्टमीस शुक्रवारचे वाड्यांत रामजोशाची कथा करवून दुसरे दिवशीं त्यास पारण्यास भोजनास बोलावून शंभर रुपये दक्षिणा देण्यांत आली होती. स्वतः बाजीराव रामजोशाचे बिऱ्हाडीं एकदां जेवावयासहि गेला होता. ते वेळीं त्यानें देवापुढें शंभर रुपये दक्षिणा ठेवली. या १८०८ सालच्या जमाखर्चावरून कमींत कमी हजार रुपये तरी पेशव्याकडून रामजोशास मिळाले. कारणपरत्वें दिलेल्या बिदाग्या व देणग्यांखेरीज बाजीरावानें त्याला दरमहा पंचवीस रुपयांची नेमणूकहि करून दिली.

रामजोशाला अशा रीतीनें कीर्ति व प्रसिद्धीप्रमाणें पैकाहि उमाप मिळत गेला. पण तो त्याचेजवळ कधींच टिकला नाहीं; कारण तो कमालीचा विलासी, व्यसनी आणि उधळ्या असे. त्याचा कीर्तनकाराचा पेशा आणि त्याचें खाजगी जीवन यांचा बिलकुल मेळ नव्हता. उचापत काढल्याशिवाय त्याचा दिवस जात नसे. स्वारी गांवोगांव कथा करण्यास निघाली म्हणजे चिमा नायकीण म्हणून राख बरोबर असावयाचीच. तिला व स्वतःला बसण्यासाठीं एक खास रेशमी काढण्यांचा झोपाळा स्वारींत बाळगण्यांत येई. शिष्यमंडळी, मोठा घोडा, दोन कुत्रीं, दोन माकडें, दोन राघू व दुसरेहि विलासी पदार्थ, बरोबरच्या स्वारींत असत. तो शाक्त म्हणवून मद्यहि पिई ! गांजा ओढणें, तंबाखू खाणें, हीं तर त्याचीं अगदीं मामुली व्यसनें !!

सारांश, पाण्यासारखा पैसा मिळूनहि रामजोशी शेवटपर्यंत भिकाऱ्या-सारखाच राहिला. १८१२ सालीं काशीयात्रेस जावें, असा हेतु धरून तो

पुन्हां बाजीरावाकडे आलाच होता. परंतु यावेळीं पुण्यास त्याला फारसा भाव राहिला नव्हता.

वर्षें तीन पुण्यास जो मिरवला तो रामजोशी पहा।
यात्रोद्देश धरूनिया तनुमुळें घेतो निरोपासि हा ॥
या मागे न कधी पुढेहि न कधी मागावयाचा गुणी।
ऐसे जाणुनि घ्या यशासह तुम्ही ही याद ही लेखणी ॥

असें म्हणून त्यानें पुण्यांतील सर्व गृहस्थ मंडळीकडे व पंडित सभांत झोळी फिरविली. परंतु त्याची डाळ शिजली नाहीं. "कोणासहि मत्‌गुणाचि कळेना" अशी त्याला तक्रार करावी लागली. अखेर, "आलों रावबाजीपाशी या कविस घडावी काशी," असें म्हणून तो बाजीरावास शरण गेला. बाजीरावानें आज्ञापत्रें पाठवून लोकांकडून परडी जमविण्याचा हुकूम केला. पण तरी सुद्धां फारशी रक्कम लोकांनीं दिली नाहीं. रामजोशास काशीयात्रा घडवून आणणें आणि त्यास दहावीस हजार रुपये एकमुठीनें उचलून देणें हा बाजीरावाच्या हातचा मळ होता. परंतु रामजोशाला यावेळीं त्याचेकडून कांहीं प्राप्ति झालेली दिसत नाहीं. कसेंहि असो रामजोशाला काशीयात्रा न घडतां तो १८१३ सालीं वारला.

रामजोशी हा दोन एकांतिक टोकांचा संगम होता. पांडित्य आणि गावकळपणा, विद्वत्ता आणि ग्राम्यता, वैराग्य आणि व्यसनांधता, यांचें कांहीं अलौकिक मिश्रण त्याच्या चरित्रांत आणि कवित्वांतहि आढळतें. किंबहुना या वैलक्षण्यामुळेंच त्याची माहिती समाजास अधिक. ज्याचा जो धंदा आहे, त्यावरूनच, लोक कोणाचीहि झाली तरी, परीक्षा करतात. शिपाईगडी आपला लढण्याचा आणि पराक्रमाचा पेशा उत्तम बजावीत असला म्हणजे मग तो बाहेरख्याली असला तरी चालतें. लोक त्याकडे लक्ष देत नाहींत; कारण त्याचें मुख्य कर्तव्य जें अपेक्षित असतें त्यांत कसूर झालेली नसते. उलटपक्षीं पावित्र्याचा आणि विरक्तीचा असा आदर्श मानला

गेलेला जो शंकराचार्यपदावरचा अधिकारी, त्यानें जर अनाचारास सुरवात केली तर लोक त्याला जरूर नांवें ठेवतील. कारण लोकांना सद्धर्माचा आदर्श दाखवून त्यांना उपदेश करणारा आणि प्रायश्चित्तें देणारा हा प्राणी स्वतः विषयासक्त असेल तर लोकांना तिरस्कारार्ह झालाच पाहिजे. रामजोशाचा धंदा कीर्तनकाराचा म्हणजे उपदेशकाचा होता. जगत् माया आहे, विषय विषमय आहे, स्त्री ही पापाच्या गर्तेंत भुलवून नेणारी मायावी मोहिनी आहे, असें तो कथेंत रगडून सांगे. पण कथा संपली कीं, मात्र तो पुनः आपल्या बया व चिमाबाई या वेश्यांच्या गळ्यांत गळा घालून बसे !

त्याच्या चारित्र्यांतील हा विरोध त्याच्या काव्यांतहि तसाच आढळतो.

" अंबरगतपरि पयोधरांते रगडुनि पळतो दुरी । "

अशी संस्कृत कवि जगन्नाथ पंडिताला शोभण्यासारखी त्याची छेकापन्हुतीची प्रौढरचना जशी सांपडते तशीच, " गरतीला पाहुन गल्ली, " अशा लावण्या-सारखी शुद्ध शिमग्यांतील बीभत्स रचनाहि पुष्कळ आहे. जाड जाड संस्कृत शब्द आणि त्याच्याच जोडीस खांद्याला खांदा लावून बसलेले ग्राम्य प्राकृत शब्द त्याच्या कवितेंत हुकमी आढळतात. एकंदरींत पाहतां रसनिर्मितीपेक्षां चमत्कृतींतच रामजोशाला आवड वाटे. प्रौढ व सुसंस्कृत समाजापुढें केलेल्या कीर्तनांत श्लिष्ट पदांच्या वेण्या बांधून त्या श्रोत्यांना उकलून दाखवून थक्क करणें आणि उलटपक्षीं ग्राम्य जनांना चकित करण्यासाठीं बोडका, मोडका, दोडका, घोडका, खोडका, थोडका, गोडका असल्या प्रासांच्या उतरंडी रचून श्रोत्यांना हंसविण्यांतच त्याला समाधान लाभे. १८०३ सालीं पुण्यास दुर्गादेवीसारखा भयंकर दुष्काळ पडला. त्याच्या वर्णनांत खरोखर किती करुण रस उतरावयास पाहिजे ? परंतु रामजोशाची ती दुष्काळ वर्णनाची लावणी वाचत असतां केवळ त्याच्या शब्दचमत्कृतीचाच ठसा मनावर उमटतो.

संस्कृत, मराठी, कानडी व हिंदी या चार भाषांचा उपयोग करून लिहिलेली ही लावणी पहा. तीवरून त्याचें चमत्कृतिप्रेम चांगलें प्रत्ययास येईल.

## लावणी

" पाहि पाहि निजभवनं प्रति " " कां बोलसी मुडदारा " ।
" नितं मातना केलुदिला " " चल छोड पलो मेरा " ॥ धृ० ॥

" देहि देहि पथमिदं मुरारे " " उचित नव्हे तुजला "
" मी परगतिणी याक " पकडतां यौं क्यौं करभूला ।
" पाहि पाहि निज–जनक–यशस्त्वं " सोडि वाट मजला ।
नवपति निजमणि मुणगदशा क्यौं कीने तुज बोला ॥

( चाल )

त्वं कया विनोदं कुरुषे वेडे मूल ।
निवतं दिगेहळे क्यौं तुज पडली भूल ।
त्वद्दर्शनतः खलु उठतो मस्तक-शूळ ।
इगनडि माधव ना शिरपर डालुंगी धूळ ॥

( चाल )

मुंच मुंच चैलांचल मधुना नंदाच्या पोरा ॥
हिड नियतं फिग मन्याग पिहूजन बुरा बहुत मेरा ॥ १ ॥ धृ० ॥

तिष्ठ तिष्ठ सखि इतकी कां गे रागानें बोली ।
नागोकुळपति तिन्नम्याल खुषि सुनरी अलबेली ।
अंग संगमो मया समं तव दैवदशा खुलली ।
इष्टम्याल विन विनसा गौलन मान भरनवाली ॥

( चाल )

यन्मयोदितं तत्सत्यं निजमनिं मान ।
नडि कुजद वको मैनै जुज बैमान ।
किं रोषं कुरुते मागतसे तुज दान ।

निमिति याड-कसि देख हमारी शाम ।
त्वंतु रतिमिह मयोचिता नको भाव धरूं दुसरा ।
इष्ट मात मन केला सखे क्यौं उतर गये चेहरा ॥ २ ॥ धृ०
सापि गोपिका यदुपति वचना दति–मुदिता गौरी ।
हरि कई हिडि कसि नडिके लिगमे तुयपर हुंवाली ॥
शांत भवतुते कांत वदन चुंबनमिह घे पदरीं ।
सिडब्याड इगदया माडि तुम परवर गिरधारी ॥

( चाल )

इति तद्वचसा किल हर्षित हरि धरि हात ।
आ गोपिक चुंबक कोट्टा गुजर गई रात ।
साल ध्वरता मग आय हरिला गात ।
यलो नागेश वल्ली सुनो बेहेरि की बात ॥
धुंडि शाहिर शरणं नको करूं लटिका तोरा ।
व्यंकटपति व्यंकटपति मुंदड फुगुळू हिंडि तव गावनका छोरा ॥ ३ ॥

तथापि उपर्युक्त दोष असले तरी रामजोशी हा त्या काळच्या लोककवींत उच्च स्थानीं शोभण्यासारखा कवि होता हे मान्य केलेंच पाहिजे. त्याचे पोवाडे व समाजस्थितीपर लावण्या बोटांवर मोजण्या इतक्याच स्वल्प आहेत. ' पुणें वर्णना 'चा त्याचा पोवाडा प्रसिद्ध आहे.

" ब्राह्मणी राज्य जोरदार घोड्यावर स्वार होते शिपाई ।
जबर सद्दि कैकानि पाहिली शत्रु ठेविले नाहीं. "

हाच तो पोवाडा होय. त्यांतील,

" धनि कृपावंत प्रभु कल्याण करी रयतेचे ।
लंकाच पुण्यामधे लेश न दारिद्र्याचे ।
सरदार एकाहुन एक श्रीमंताचे ।
लढणार शिपाई किती सांगु मी वाचें । "

किंवा

" साक्षांत विष्णुअवतार पेशवे कूळ ।
संपूर्ण महीचे भूप कांपती धाकदरारा प्रबळ ।
सगोपंत देवराव विठ्ठल नाना काळ ।
शहाण्यांत साडेतिन शहाणे बुद्धिचे सबळ ॥
सेवेंत सर्वदां श्रीमंताच्या जवळ ।
होळकर, भोसले, शिंदे मानकरी सकळ ॥
तलवार बहाद्दर करित शत्रुची राळ ।
स्वारिच्या भोंवती पटवर्धन-मंडळ ।
युद्धांत रणांगणिं जसा आगिचा लोळ ।
बहुनामी पल्लेदार तोफांचा कल्लोळ ॥
जेजाल जंबुरे बाण करी वळवळ ।
सरदार सभोंवति दाट पमरती तळ ।
घोरपडे रास्ते सरदार पुरंदरे स्वार पानसे पाहीं ।
फडणीस नानाची जरब भुमंडळीं राहीं ॥ ब्राह्मणी राज्य० ॥

इत्यादि वर्णन जोरदार आहे. रामजोशाच्या कृष्णलीलापर शृंगारिक लावण्या बऱ्याच आहेत परंतु त्या सामान्यच म्हणाव्या लागतात. अनंतफंदीचे उपदेशपर फटकेच जसे चिरंजीव झाले आहेत त्याप्रमाणें रामजोशाच्या उपदेशपर लावण्याच तेवढ्या मनाची पकड घेतात.

" नरजन्मामधि नरा करुनि घे नर नारायण गडी
तरिच हे सार्थक मानव कुडी "

किंवा

" बा काय घालिशी संसृतिचा पिंगा
या मानव देही भजरे श्रीरंगा "

इत्यादि लावण्या आजहि लोकांच्या तोंडी खिळून राहिल्या आहेत. उदाहरणार्थ ही लावणी पहा.

भला जन्म हा तुला लाधला खुलास हृदयीं बुधा
धरिशि तरी हरिचा सेवक सुधा ॥ धृ० ॥
चराचरी गुरु तरावयाला नरा शिरावर हरी
जरा तरि समज धरी अंतरीं ॥
हटा तटानें पटा रंगवुनि जटा धरिशि कां शिरीं
मठाची उठाठेव कां तरी ॥
मनात अथवा जनात हो कां मनात व्हावे परी
हरीचें नांव भवांबुधि तरी ॥

( चाल )

काय गळ्यांत घालुनि तुळशीची लांकडें ।
हीं काय भवाला दुर करतील माकडें ।
बाहेर मिरविशी आंत हरिसि वांकडे ।

( चाल )

अशा भक्तिच्या रसारहित तूं कसा म्हणविशी बुधा
हरिरसं सांडुन घेशी दुधा ॥ १ ॥
जाळ गळ्यामधि माळ कशाला व्याळ काम कोपला
आंतुनि, बाहेर म्हणविशी भला ॥
वित्त पाहता पित्त येतसे 'चित्त पाहिजे मला'
असे हरि म्हणतो नुमजे तुला ॥
वर संभावित दांभिक अभ्यंतरी नाहिस भिंवला
बहिर्मुख नर नरका लाधला ॥

( चाल )

तूं पोटासाठी करि खटपट भलतिशी ।
परि भक्तिरसाविण हरि भेटेल काय तुशी ।
काय मौन धरुनिया गोमुखिला जाळशी

(चाल)

स्वार्थसुखें परमार्थ बुडविला अनर्थ केला मुधा ।
न जाणशि कांजी म्हणशी सुधा ॥ २ ॥
टिळाटोपिवर शिळा पडो या बिळांत करिशी जपा
तथापि न होय हरीची कृपा ॥
दर्भ मुष्टिच्या गार्भि धरुनिया निर्भर पशुच्या वपा
जाळिशी तिळा तांदुळा तुपा ॥
दंड कमंडलु बंड माजविशि मुंड मुंडिशी तपा
न सार्थक लटक्या साऱ्या गपा ॥

(चाल)

ही वार वार तलवार येइल काय पुन्हा ।
या दुर्लभ नर देहात टेविशी कुन्हा ।
भगवंत भुकेला भक्तीचा पाहुणा ।

(चाल)

वर्म कळेना धर्म घडेना कर्म चित्त ना द्विधा ।
सदा हरि कविरायावर फिदा ॥ ३ ॥

असो. सरते शेवटीं रामजोशाच्या दोन छोट्या परंतु गुणानें मोठ्या अशा लावण्यांचे मासले हा. त्यावरून त्याचे गुणदोष म्हणजे प्रौढ संस्कृत शब्द कीं लगेच खेडवळ मराठी शब्द योजण्याची त्याची लकब, श्लेषादि शब्द चमत्काराचा त्याचा हव्यास व संस्कृताचा त्याचे कवितेवर बसलेला आसर इत्यादि गोष्टी कळून येतील. पाहिला 'सुभद्रेचा पोवाडा' म. म. द. वा. पोतदार यांनीं शके १८३७ सालीं संशोधून जगापुढें आणला. दुसरा 'दुसऱ्या बाजीरावाच्या शुक्रवार वाड्याचा पोवाडा.' तो भा. इ. सं. मंडळानें सन १९३४ च्या सुमारास प्रथमच प्रकाशित केला.

## सुभद्रेचा पोवाडा

मायबापाचा श्रीकृष्णाचा विचार मोडुनि बळिदेवे ।
•दुराग्रहानें निश्चय केला सुयोधनाला मज द्यावे ॥
भाउ नव्हे ग बाई बाउच केवळ भाउनि मनांत उमजावे ॥
वडिल बंधु परि अडिल खोडकर खळाकडिल हे समजावे ॥
हंसा टाकुनि काय वायसा मुक्ताफळ हे अर्पावे ॥
ब्राह्मण ढकलुनि चांडाळाला कां म्हण जेऊ घालावे ? ॥
जन्मांतरिचा वैरी भाऊ अशा वरुनि हे वळखावे ॥
अपाय याला उपाय न सुचे काय करावे विष खावे ॥
दुर्योधन खळ मेला गेला उलथोनि तो पोटभरा ॥ १ ॥

भाऊजीचा निरोप घेऊनि गेला तीर्थें हिंड फिरा ॥
कोणी जागा न कळे आहे जागा किंवा नीजसुरा ॥
तडी तापडी किंवा भापडि होउनि गेला काशिपुरा ॥
आवडिनें कीं कावडि नेल्या शेतुबंध रामेश्वरा ॥
गंगा यमुना तपती तुंगा कृष्णा रेवा हरिद्वरा ॥
यांच्या पुलिनें रम्य साधुच्या मंडळिमध्ये असल खरा ॥
काटक बाई कर्नाटक व्यंकटपति पाहुनि करवीरा ॥
पंढरपुर भू वैकुंठाला आला हरिजन माहेरा ।
पुंडलिकानें कान फुंकिला केला चेला संत पुरा ॥ २ ॥

किंवा अमराधीशें नेला अमरावतिला निजकुमरा ।
तिलोत्तमा, उर्वशी मेनका रंभादिक ज्या सुराप्सरा ॥
असला सुंदर ठसला + सला भुलवुनि नेला त्यांनि घरा ॥
रुसला बसला घुसला जाउनि फसला तेथें खराखुरा ॥
अथवा झाला असेल साधू शोधुनि सगळी प्रसुंधरा ॥
प्राणाधिक तो आणा घालुनि आणावा वर पार्थहिरा ॥

अर्जुन घेऊनि कशास कोणा गर्जुन मज भय नाहि जरा ॥
अर्जुन वर्जुन देह विसर्जुन वाटे मजला मृत्यु बरा ॥
तो बैरागी मी बैरागिण होउनि जाइन दिगंतरा ॥ ३ ॥

बहर नवतिचा कहर करितसे लहर आलि बाइ धरा धरा ॥
पळपळ युगसम वाटे अनुभव पहिला वहिनी मनीं स्मरा ॥
काल रात्रि म्यां स्वप्न देखिले जणू पूजिते गौरिहरा ॥
गौरव करुनि गौरीनें हा प्रसाद दिधला हार तुरा ॥
कौरव पतिला रौरव होइल बोले ऐसी दिव्य गिरा ॥
जाइल बाइल करुनी येइल ती तुजला ठिक नर नवरा ॥
यती नव्हे या वरुनी गमतो पति अर्जुनजीचा चेहरा ॥
खुणा पाहता उणा नसे तिळ कोणा सांगुन तुम्हि होरा ॥
शुभ चिन्हे ही देही सांगति कविरायाचा ठिक होरा ॥ ४ ॥

## पेशव्यांच्या शुक्रवार वाड्याचा पोवाडा

कृष्ण जन्म आनंद वाटतो गोकुळ अज हे पुणें ॥
श्रीमंतांचें मंदिर कांहिन वसुदेवाहुनि उणे ॥ धृ० ॥

अद्भुत कविचा वार पहाहो कृत मंदिर चातुरी ॥
काय कल्पना अचाट शोभा बाहेर तसि भीतरी ॥ १ ॥

जिकडे तिकडे रंग कटारी खिडक्या जाळ्यावरी ॥
ज्याणे जेथें बसुनि पहावें तेथें सुख अंतरीं ॥ २ ॥

ठाई ठाई हवुद जळाचे अमृतसराचे परी ॥
स्नानें करिती संध्या जप तप किति विप्रांच्या हरी ॥ ३ ॥

जेथें नर नारायण पूजा सांबासह आदरी ॥
प्रभुच्या हस्तें विप्रभोजनें भोजन ऐका तरी ॥ ४ ॥

साग्र कर्दळी दले तयावरि षड्रस साखरपुरी ॥
भात केशरी भक्षुनि वाढें सर्व वरपिती खिरी ॥ ५ ॥

पक्वदळाचे विडे सुवसने ज्या त्या वरि भर्जरी ॥
हार गळ्यामधे तुरे लटकती ज्याच्या त्याच्या शिरी ॥ ६ ॥
गीत कला नर्तनें दिवा निशि सदैव रसमाधुरी ॥
राजसु झाला एक वेळ हा नित्योत्सव मंदिरी ॥ ७ ॥
ज्या ज्या ऋतुचे जसे यथोचित विलास नाना परी ॥
भागवतांचे थवे नवे किति कीर्तन रस या घरी ॥ ८ ॥
तळीं धरुनिया शिरो मंदिरा पर्यंकहि एकसरी ॥
पडदे कुल रेशमी बिछोने जरबाबी झालरी ॥ ९ ॥
कविनें मंदिर कमळ म्हणावे जर ही सरसी पुरी ॥
पंकज मंदिर खरे न कमला राती कमलो दरी ॥ १० ॥
या सदना मधे निरंतर श्री दिवाराति साजिरी ॥
संधे पासुनि निशांत शोभा दीप तिमिर संहरी ॥ ११ ॥
फाणस कंदिल पोत दुशाखा हिलाल समया तरी ॥
समया अगणित मेणबत्तीचा प्रकाश अंतःपुरी ॥ १२ ॥
सायंकाळी सुवास लक्ष्मीसमा फिरति सुंदरी ॥
दांत मंचकी किती कितिक त्या डोले वरि नागरी ॥ १३ ॥
ज्याच्या दामल मुक्ता सत्कुच कंदुक शोभति उरी ॥
आनंदे क्रीडती नारि किति न कळत या किन्नरी ॥ १४ ॥
सुभोवत्या अप्सरा पहाहो चिन्ह भासते कसे ॥
सूक्ष्म दृष्टिनें पाहिल त्याला सत्यचि सर्वहि दिसे ॥ १५ ॥
यास्तव या घरि कृष्णजन्म हे सत्याचि, लटिके नसे ॥
टाळ, विणे, किति रबाब भेरी वाद्ये वाजति रसे ॥ १६ ॥
दानधर्म आनंद पहाहो किति निशिदिनिं होतसे ॥
जेथे नरनारायण वसले स्वये भक्तिच्या गुणें ॥
ते मंदिर कविराय वर्णितो नको म्हणावे कुणे ॥ १७ ॥

## अभ्यासाच्या वाटा

( १ ) रामजोशी यांच्या घराण्याबद्दल ऐतिहासिक माहिती लिहा.

( २ ) रामजोशी हा कुटुंबांतून विभक्त कां झाला ?

( ३ ) रामजोशी यांची विद्याप्राप्ति व तीमुळें झालेली कीर्ति यांसंबंधीं तुम्हांस काय माहिती आहे ?

( ४ ) मोरोपंतासंबंधीं रामजोशी यांस कां आदर वाटे ?

( ५ ) 'रामजोशी हा दोन एकांतिक टोकांचा संगम होता' या विधानाची चर्चा करा.

( ६ ) रामजोशी यांच्या काव्याचे विशेष कोणते ?

( ७ ) 'सुभद्रेचा पोवाडा' किंवा 'पेशव्यांच्या शुक्रवार वाड्याचा पोवाडा' याची काव्यदृष्ट्या चर्चा करा.

---

## प्रभाकर : : : ५

प्रभाकराचा जन्म नाशकाजवळ गंगापूर येथें सन १७६९ सालीं झाला अशी माहिती प्रभाकरी लावण्यांच्या संपादकांनीं दिलेली आहे. परंतु प्रभाकराच्या लावण्यांतील अंतस्थ पुराव्यांवरून त्याचा जन्म सन १७५५ च्या सुमारास झाला असला पाहिजे असें सहज सिद्ध करतां येतें.

याला प्रमाण म्हणून प्रभाकरी लावण्या पोवाड्यांच्या संग्रहांतील लावण्या नं. २१, २२, २३, २४ वाचकांनीं पहाव्या. या चारहि लावण्यांतील विषय थोरले माधवरावसाहेब यांनीं सन १७७० च्या आगेंमागें केलेल्या हैदरावरील मोहीमांस अनुलक्षून आहेत. लावणी नं. २१ मध्यें कोणी स्त्री आपल्या शिलेदार असलेल्या नवऱ्याला स्वारींत सामील होण्यापासून परावृत्त करीत आहे. ही स्वारी कर्नाटकची आहे. नवऱ्याला परावृत्त करतांना ती स्त्री म्हणते,

" मुळीं मुलुख कर्नाटक । निर्दयी लोक कंटक ।।
विश्वासघातकी ठक । बिकट झाडी चहूकडून ।
बाऱ्या कठीण निर्जल भूमी ।। "

लावणींतील नायिका नवऱ्याला परावृत्त करीत आहे तो काळ श्रावण झडीचा आहे. कारण ती म्हणते—

" नका जाउ दुर देशी घरीं काय धन द्रव्याला कमी ।
आली हो वर्षाची नागपंचमी ।। धृ० ।।
झिरमिर झिरमिर पर्ज्यन्य वरसे भर महिना श्रावण ।
कठिण लष्करची हवा दारुण ।।

महोत्सव नगरांत मिळाले देशावरिल ब्राह्मण ॥
पाहु सुखसोहळा दोघेजण ॥"

इ. स. १७७० साली हैदरअलीवरची तिसरी स्वारी करण्याची तयारी झाली. (ऐतिहासिक लेखसंग्रह पत्र नं. १००३ पहा) त्यांत लावणींतील नायिकेनें सांगितलेली हकिकतच दिलेली आहे. श्रावण मासाचा समारंभ झाल्यानंतर मग श्रीमंतांचे वाड्यांत दशग्रंथी ब्राह्मण चारशें व पंडीत वर्षाप्रमाणें ·········दक्षणाहि बरीच होत्ये······खासा श्रीमंत भाद्रपद शु ॥ ७ स डेरे दाखल होणार ऐसी बोलवा आहे."

वरील प्रत्यंतर पुराव्यानें ही लावणी इ. स. १७७० साली भाद्रपदाच्या आधीं रचली गेली हें निःसंशय आहे. ही लावणी गंगु हैबतीनें केलेली आहे. लावणीचा शेवट असा आहे—

" करी गंगु हैबती कवन ।
गवसून सारखी गवन, ठेवी कडो विकडीची ठिवण ।
अक्षरी मोत्याची ववण ।
लय लावुन करिती श्रवण ।
जणुं मिष्टान्नाचें जेवण ।
(चाल)
महादेव कविश्वर म्हणे । विद्येचें माहेर पुणें ।
काय गुणिराजाला उणें ।
(चाल)
पदरचना नित प्रभाकराची सभेस गाइन मी ॥ "

लावणीच्या या तुकांत " करी गंगु हैबती कवन " असें स्पष्ट म्हटलें असल्या-मुळेंच ही लावणी गंगु हैबतीची आहे असें आम्ही म्हणतों. याच तुकांत पुढें " महादेव कवीश्वर म्हणे " किंवा " पदरचना नित प्रभाकराची " असे शब्द आहेत. त्यावरून ही लावणी महादु सुताराची किंवा प्रभाकर दाताराची

ती कोणाचीहि असो; लावणीवरून प्रभाकर सन १७७० त गंगु हैबतीच्या फडांत सामील झालेला होता एवढें निश्चित दिसतें. प्रभाकर गंगु हैबतीच्या फडांतील एक गाणारा साथीदार होता. म्हणजे अर्थात कमींत कमी पंधरा वर्षांवर वयाचा असलाच पाहिजे. म्हणजे इ. स. १७७० च्या पूर्वी पंधरा वर्षे त्याचा जन्मकाळ नेल्याशिवाय गत्यंतर नाहीं. वर दिलेल्या तुकांत 'पदरचना नित प्रभाकराची । सभेस गाइन मी' असे शब्द आहेत. त्यावरून प्रभाकर या सुमारास कवित्व करूं लागला होता असें दिसतें. याच तुकांत 'नित' म्हणजे नेहमीं असा स्पष्ट शब्द आहे. त्यावरून तर प्रभाकराचा जन्मकाळ १७५५ च्याहि पूर्वी न्यावा लागेल. चरित्रकारानें प्रभाकराला वयाच्या पंधरा सोळाव्या वर्षी काव्यरचना करण्याचा छंद लागला असें लिहिलें आहे. तें कदाचित् खरेंहि असेल. परंतु लावणी नं. २१ मधील अंत:पुराव्यावरून त्याचा जन्मकाळ वर सांगितला तोच धरला पाहिजे.

लावणी नं. २२ हिचाहि विषय कर्नाटकच्या स्वारीसंबंधींच आहे. त्यांत स्पष्ट म्हटलें आहे–' टेउन हस्तीवर जरिपटका । निघाले रावसाहेब कटका । नको घालु अडकांठि साजणी । कर आमुची सुटका ॥ ' ही लावणी गंगु हैबतीची आहे. तिचा शेवट असा आहे–" कवन करी गंगू हैबती । झडती नावाच्या नौबती । महादेव गुणि सुगर प्रभाकर सुमित्र रसवन्ते." जातीनें कर्नाटकच्या मुलुखगिऱ्या करणारा पेशवा म्हणजे माधवरावच होय. हैदरअल्ली-वरील तीन स्वाऱ्यांपैकीं कोणत्या तरी एका स्वारीच्या वेळचा या लावणीचा काळ आहे. ह्या लावणीच्या शेवटीं गंगु हैबतीनें आपल्या रसवन्त्या म्हणजे गोड गळ्यानें गाणाऱ्या मित्रांत प्रभाकराची गणना केली आहे. यावरूनहि आम्ही वर सांगितलेला जन्मकाळच खरा दिसत नाहीं काय ?

लावणी नं. २३ त्याच काळची व त्याच मोहिमासंबंधींची आहे. कारण शेवटीं निकरानें, प्रियेचा प्रेमपाश तोडून सैन्यांत दाखल झाल्यामुळें कष्टी

" गंगु हैबती म्हणे जतन कर नवतीची बहरी ।
फत्ते करून खावंद त्वरित येतील पुण्य शहरी ।
महादेव गुणिराज कवीची जरब पडे कर्णी ।
प्रभाकराचे छंद बाण भेदती अंतःकरणी ॥ "

या तुकावरून गंगु हैबतीची ही लावणी हैदरअल्लीवरील स्वारीचे वेळींच तयार झाली हें उघड दिसतें. त्याचप्रमाणें प्रभाकराच्या वयावरहि या तुकानें प्रकाश पडतो.

लावणी नं. २४ ही देखील कर्नाटकच्या मोहीमेसंबंधींच आहे. त्यांत तर खुद्द थोरल्या माधवरावाच्याच छावणींतील वर्णन आहे.

" दिन दुनियेचे मुकुटमणी राव सुचिन्ह मंडित छत्रपती ।
त्यजुन सौख्य सुखशेज यथाविधि सुरेश्वरापरि तप तपती ।
...... जा जा हो याहो रायांची भेट घेउनि ।
कुच करूं आपण मग पंचामृत जेवुनी ॥ "

या लावणीच्या शेवटावरूनहि मागें वर्णन केलेला प्रभाकराचा काल निश्चित ठरतो. तो शेवट असा—

" करी कवन गंगु हैबती । जीवन ठेवुनि महादेव गुणिराज म्हणे ।
ही चतुर सुगर कांता पाहिली ।
प्रभाकरावर मर्जी बहाल दोघांची बहुत जाहाली ॥ "

सारांश वर दिलेल्या चार लावण्यांतील अंतः पुराव्यावरून खालील गोष्टी सिद्ध होतात. गंगु हैबतीचा फड थोरल्या माधवरावाचे कारकीर्दीपासून गाजत होता व इ. स. १७७० च्या सुमारास प्रभाकर त्याच्या फडांत लावणी रचणारा व गाणारा म्हणून सामील झालेला होता. अर्थात् चरित्रकारांनीं प्रभाकराचा दिलेला जन्मकाळ चूक ठरतो.

प्रभाकराचें सबंध नांव प्रभाकर जनार्दन दातार. हें घराणें हरणई नजीक मुरूड गांवचें राहणारें. तेथून प्रभाकराचे आजोबा किंवा वडील गंगापुरीं रोजगारास

गेले. तेथून ते पुण्यास पेशव्याच्या फडांत कारकून म्हणून लागले. प्रभाकरास एक ज्येष्ठ बंधु होता, पण तो घरांतून कायमचा बेपत्ता झाला. प्रभाकराचें लग्न गंगापुरासच झालें होतें. पण तें कुटुंब वारल्यावर ठाणें जिल्ह्यांतील मुरबाड येथें राहणाऱ्या कोणा साठे यांच्या कन्येशीं त्यानें विवाहसंबंध केला. नंतर प्रभाकर पुण्यास येऊन स्थायिक झाला. पुण्यास त्याचें राहाण्याचें ठिकाण भाऊ महाराजांचे बोळांत आप्पा घाणेकर यांच्या वाड्यांत होतें असें सांगतात. प्रभाकराची बहुतेक हयात पुण्यासच गेली. वडिलांचा कारकुनी पेशा असल्यामुळें प्रभाकरास तें शिक्षण लहानपणापासूनच होतें. १७९० च्या सुमारास रास्त्यांच्या पदरीं शागिर्दपेशांत त्याला कारकुनीची आसामी होती.

हा पांढरपेशाचा सन्मान्य धंदा करीत असतांनाच दुसरीकडे प्रभाकरानें आपल्या तमाशाच्या शोकाची पुरेपूर हौस फेडून घेतली. तो स्वतः चांगला विद्येचा संस्कार झालेला आणि त्यांतच त्याला प्रतिभादेवी सदा प्रसन्न, यामुळें त्यानें लावण्या-कवनेंहि स्वत: खूप रचलीं. पेशवाईत त्यावेळीं गंगु हैबतीचा शाहिरी फड पुण्यांत फार गाजत होता. त्या फडांतील गंगु हैबती, महादबा सुतार, गुणीराज, गंगाधर वगैरे लोकांची व त्याची ओळख पडली व नंतर लवकरच तो त्यांच्या फडांत एकरूप झाला. " पुणें शहर दक्षिणेंमधीं तक्त बादशाही, वस्ताद गंगु हैबती तेथिल रहिवाशी. " असा गंगु हैबती. पण थोड्याच दिवसांत, लावणी प्रभाकरानेंच रचावी आणि इतरांनीं ती म्हणावी अशी स्थिति प्रभाकरानें आणली. सवाई माधवरावाच्या कारकीर्दींत रंगाचा मोठा समारंभ झाला. त्यावर प्रभाकरानें पोवाडा रचला. तो पोवाडा खुद्द पेशव्यांनीं दरबारांत गाववून घेतला, असें त्या पोवाड्याचा शेवटच सांगतो. सवाई माधवरावाच्या कारकीर्दींतील दुसरे दोन महत्त्वाचे प्रसंग म्हटले म्हणजे एक खर्ड्यांची लढाई व दुसरा सवाई माधवरावाचा मृत्यु. या दोन्ही प्रसंगांवर प्रभाकराचे पोवाडे असून ते अत्युत्कृष्ट आहेत. सवाई माधवरावाच्या मृत्यूच्या पोवाड्याच्या शेवटीं प्रभाकर म्हणतो, " महादेव गुणिराज श्रुत गादीचे । नवे नूतन नव्हती शाईर जदिद वर्दिचे " यावरून प्रभाकरी फडाला पेशव्यांचा आधार होता असें दिसतें.

सवाई माधवरावाचे मृत्यूनंतर बाजीरावींत तर प्रभाकराचा फारच बोलबाला झाला. बाजीरावाची प्रभाकरावर निहायत खुषी झाली. उलटपक्षीं खुद्द बाजीरावाच्या विलास-वर्णनपर पस्तीस-छत्तीस तरी लावण्या त्यानें रचल्या. त्याचप्रमाणें दोन-तीन पोवाडेहि रचले.

चरित्रकार हे, प्रभाकर रास्त्यांच्या कारकुनी फडांत नौकरीस होता व त्याचे उत्तरवयांत रास्ते यांजकडून त्याला वार्षिक ऐशीं रुपयाचें वर्षासन होतें असें म्हणतात.

सन १८१८ नंतर प्रभाकराची दारिद्र्यपीडित अवस्था झाली व ज्यानें स्वराज्यांत कीर्ति व पैसा जोडला त्यालाच पोटाकरितां दारोदार भटकण्याची पाळी आली. १८४३ सालीं तो मरण पावला. त्याची औरस संतति हयात नाहीं.

## प्रभाकरी पोवाड्याचें वैशिष्ट्य

प्रभाकराचे एकंदर तेरा चौदा पोवाडे आहेत. यांपैकीं रंगाचा, खर्ड्याच्या लढाईचा हे दोन तर पेशव्याच्या दरबारांतच गायिलेले होते. पेशवाईतील प्रसंगांवर किंवा त्यांतील प्रसिद्ध व्यक्तींवर वगैरे मिळून त्याचे आठ पोवाडे भरतात. बाकीचे चार सयाजीराव गायकवाड, राघोजी आंग्रे, नाना शंकरशेट, असल्या इंग्रजशाहींतील पुरुषांबद्दल आहेत. विश्वसनीय सुसंगत इतिहास आणि सुंदर शैली या दृष्टीनें प्रभाकराचे पोवाडे हे सर्वांहून सरस असून शाळांतून पाठ्यपुस्तकांत घालण्यासारखे उपयुक्त आहेत.

उदाहरणार्थ हा पोवाडा पहा—

यशस्वि झाले श्रीमंत पहिले सर्व लढायाला ।
अतांच आलें अपेश कोठुन बाजीरायाला ? ॥ धृ० ॥

दादासाहेब पुण्यप्रतापी निस्सिम शिवभक्त ।
स्वारि करुन दरसाल हलविलें दिल्लीचें तक्त ॥
आनंदीबाइ सुशिल शिरोमणि सुगुण संयुक्त ।

पतिभजनीं सादर घडोघडि अखंड आसक्त ॥
बाजिरावसाहेब सदोदित जो जीवनमुक्त ।
जन्मांतरिं तप केलें निराहारि राहुन एकभुक्त ॥

( चाल )

शके सोळाशें शहाण्णवीं अति उत्तम जय संवत्सरीं ।
पौष शुद्ध दशमीस भरणी नक्षत्र भौमवासरीं ॥
ठिक पहिल्या प्रहरांत जन्मले रात्रीच्या अवसरीं ॥

( चाल )

पहा बाईसाहेब धार मुक्कामीं राहुनी ।
कंठिला काळ कांहीं दिवस दुःख साहुनी ।
केलें तेथुन कुच सुपुत्रमुख पाहुनी ॥

( चाल )

गंगातीरीं येउन राहिली अपूर्व ठायाला ।
कच्चेश्वर शुक्रेश्वर सन्निध दर्शन घ्यायाला ॥ १ ॥
समाधान सर्वांस वाटलें कोपरगावास ।
स्वारि शिकारिस बरोबर जाती कथा उत्सवास ।
जें करणें तें पुसून करिती अमृतरावास ॥
एकास नख लागल्या दुःख होइ त्रिवर्ग भावांस ।
असें असुन नानांनीं मांडिला अति सासुरवास ॥
हळुच नेउन जुन्नरास ठेविलें श्रीमंतरावास ॥

( चाल )

इतक्या संधित सवाई माधवराव मरण पावले ।
तेव्हांपासून नानांनीं राक्षसी कपट डौल दाविले ॥
परशुराम रामचंद्र निरोपुन मग वाटेस लाविले ॥

( चाल )

आले खडकी पुलावर श्रीमंतास घेउनी ।
दर्शनास नाना परिवारें येउनीं ॥
दाखविली याद रावास एकांतीं नेउनी ॥

( चाल पहिली )

भय मानुन शिंद्यांचें निघाले वाइस जायाला ।
साताऱ्यांत राहून लागले भेद करायाला ॥ २ ॥

आपण बाळोबा होउन एक केली खचित मसलत ।
चिमाप्पास धनि करुन राखिली जुनाट दौलत ॥
करारांत दोघांच्या झाली कांहीं किंचित् गफलत ।
म्हणुनि फिरून नानांनीं उलटी मारून केलि गल्लत ।
सूत्रधारि जो पुरुष तयाच्या गुणास जग भुलत ।
हातांत सगळे दोर पतंगापरि फौजा हालत ॥

( चाल )

परशुराम रामचंद्र आणि बाळोबास टाउक रण ।
राजकारणी नव्हेत ! एक केसरी एक वारण ॥
कठिण गांठ नानाशीं न चाले तेथें जारण मारण ।

( चाल )

महाडास बसुनी नानांनीं बेत ठरविले ॥
बाळोबास शिंद्याकडुन कैद करविलें ।
शिवनेरि गडावर पटवर्धन धरविले ॥

( चाल पहिली )

रास्ते झाले जामिन प्रसंगीं अवघड समयाला ।
असा गुदरला वक्त नेले मांडवगण पहायाला ॥ ३ ॥

घडि बसवून महाडाहुन नाना त्वरितच उलटले ।
द्वेषबुद्धि विसरून संशय सर्वांचे फिटले ॥

शिंदे भोसले होळकर मुश्रुल्मुल्क एकवटले ।
दलबादल डेऱ्यांत श्रीमंतासन्निध संगटले ॥
बाजीराव राज्यावर बसतां आनंदे जन नटले ।
तोफांचे भडिमार हजारों बार तेव्हां सुटले ॥

( चाल )

नंतर नाना एकविसांमधि समाधिस्त झाले ।
महाल मुलुख शिंद्यांनीं बाविसामधिं आपले पाहिले ॥
यशवंतराव होळकर लढाईस जमुन उभे राहिले ।

( चाल )

शिंद्यांनीं करुन माळव्यांत खातरजमा ॥
केली फौज गंगेच्या रोखावर खुप जमा ।
सोडीना कंबर कधीं काढिना पायजमा ॥

( चाल पहिली )

कुच मुक्काम दररोज बनेना पलंगी निजायाला ।
धेई जोटाचा पचंग समरीं कोण जिंकिल याला ॥ ४ ॥

दिला मार पळणास । जातिनें पुण्यास येउनियां ।
शहर सभोंते वेढुन बसले चौक्या ठेवुनियां ॥
खंडेराव रास्त्यांनीं प्रभुला वसइस नेउनियां ।
सुखांत होते स्वस्थ सतत पंचामृत जेउनियां ॥
इंग्रजास कुमकेस प्रसंगीं बरोबर घेउनियां ।
सरंजाम अलिबहादरपैकीं तयास देउनियां ॥

( चाल )

अगोदर सोजर तुरुक धांवले मप्याशी दक्षिणी ।
त्या भयानें होळकर परतले नाहीं कोणी संरक्षणीं ॥
भरघोसानें श्रीमंत त्यावर पुण्यास येतांक्षणीं ॥

( चाल )

झाला बंदोबस्त सर्वही पहिल्यासारखा ॥

परि घरांत शिरला सबळ शत्रु पारखा ।

लाल शिरिं टोपी अंगी आठ प्रहर अंगरखा ॥

( चाल पहिली )

धर्म कर्म ना जात पात स्थल नाहि बसायाला ।

असें असुन संपूर्ण व्यापला प्राण हरायाला ॥ ५ ॥

खड्यांचा किंवा पेशवाई-वर्णनाचा किंवा दुसऱ्या बाजीरावाचा हे पोवाडे वाचकानें दोन चारदां वाचतांच सहज पाठ होण्यासारखे असून त्याला मुख्य मुख्य घटनांच्या शकामुद्रां त्या त्या विषयाची संपूर्ण माहिती मिळते. पेशवे वंशाच्या पोवाड्यांत पानपतपर्यंतच्या पहिल्या चार पेशव्यांचे वीर-रसात्मक संकलित वृत्त आहे. या पराक्रमी पेशव्याविषयीं अभिमानाचा स्फुंद येऊन प्रभाकर म्हणतो,

" पाषाण धातुच्या मूर्ति धरत्रिवरति आहेत अनंत ।
त्या पूज्य परंतु नाहित प्रगट जीवंत । तसे नव्हेत हे तर देव ।
कलित भूदेव ब्राह्मण संत । त्या वंशि पेशवे झाले सबळ बळिवंत."

दादासाहेबांच्या शौर्याबद्दल आणि अटकेवरील झेंड्याच्या बहादुरीची स्तुति प्रभाकर अशी करतो,

" शत्रूस न जाती शरण आल्या जरि मरण न देती पाठ ।
दादाहि गणावा त्यांत बाण भाल्यांत भाताचें ताट ।
भलत्याच ठिकाणीं घालि रिपूशी गांठ ।
तिन्ही काळ निरंतर साधि जातिनें बांधि हत्यारें आठ ।
पेडून नवस माहोरास गेले लाहोरास जिंकित झेंडे ।
अरे ज्यानि सहज अटकेंत पाव घटकेत लाविले झेंडे ॥ "

पेशवाई गेल्यानंतर लिहिलेल्या,

" जगदीश्वर कोपला गोष्ट झालि खरीच निरुपाई ।

म्हणुन एकाएकि सर्व बुडाली ब्राह्मण ब्राच्छाई."

या पांच चौकी छोट्याच पोवाड्यांत पेशवे वंशांतील पुरुषांच्या पराक्रमांचा जो मोजक्या शब्दांत नांव-निशीवार उल्लेख केला आहे तो पाहण्यासारखा आहे.

" पुरुष पंधरांतून पराक्रमी गत झाले अकरा,
तदनंतर चौघांनि दिल्या आल्या शत्रुसवे टकरा।
उपाय हरले याच प्रसंगीं गोष्ट गेलि निकरा,
जो रक्षणा आणिला तोच करी दौलतिचा विकरा. "

दुसऱ्या बाजीरावाच्या पोवाड्यांत त्याच्या कारकीर्दीचा सुसंगत धावता आढावा असून खडकी अष्टीच्या लढायांचे आणि त्यानंतरच्या हृदयद्रावक पळापळीचें तपशीलवार वर्णन केलें आहे. त्यांतील सहाव्या चौकापासूनचे पुढील नऊ चौक वाचतांना त्यांतील वर्णनानें हृदयांत केवळ कालवाकालव होऊन जाते. बाजीरावाचे दोष जाणत असतांहि तो आपल्या स्वातंत्र्याचा, तेव्हांचा प्रतिनिधी असल्यामुळें त्याच्या झालेल्या दुर्दशेनें आज या छापील पोवाड्यांतील निर्जीव अक्षरें वाचतांनाहि आपण गहिंवरून जातों, तर पेशवाई गेल्यानंतर थोड्याच दिवसांत रचलेला हा पोवाडा प्रत्यक्ष शाहीराच्या तोंडांतून श्रवण करीत असतांना श्रोत्यांची काय अवस्था होत असेल त्याची कल्पनाच केली पाहिजे.

" सकळ शहरचे लोक हजारों हजार हळहळती।
सौख्य स्मरुन राज्याचे मीनापरी अखंड तळमळती ॥
रात्रंदिस श्रीमंत न घेतां उसंत पुढें पळती।
यमस्वरुप पलटणें मागें एकदांच खळबळती ॥
धडाक्यानें तोफांच्या वृक्ष आणि पर्वत हादळती।
त्यांत संधि साधून एकाएकीं दुरून कोसळती ॥

(चाल)

भणाण झालें सैन्य सोडिली कितिकांनीं सोबत।
कितिक इमानी बरोबर झुकले घर टाकुनि चुंबत।
कितिक मुक्कामीं अन्न मिळेना गोलि साहेबनौबत ॥

(चाल)

कोठें डेरे दांडे कोठें उंट तट्टें राहिलीं ।
कोठे सहज होऊन झटपट रक्तें वाहली ।
कोठे श्रीमंत बाईसाहेब सडी पाहिली ॥

(चाल पहिली)

बहुत कोमावली पाहवेना दृष्टीनें उभयांला ।
हर हर नारायणा असें कसें केलें सखयाला ॥ ”

“ जे श्रीमंत सुकुमार वनांतरिं ते भटकत फिरती ।
कळेल तिकडे भर दिसांस प्रभु काट्यां-मधिं शिरती ॥
आपला घोडा आपण स्वहस्तें चुचकारुन धरती ।
खालीं पसरुन उपवस्त्र दिलगिरींत वर निद्रा करती ॥
अस्मानिं कधिं रात्रीं भात भक्षिती पाटावरती ।
दर कुच दर मजलीस कृपेंतिल सेवक अंतरती ”

हें पेशव्यांच्या पळाचें करुण वर्णन वाचून कोणाच्या डोळ्यांत अश्रु येणार नाहींत ? सवाई माधवरावाच्या मृत्यूचाहि पोवाडा अप्रतिम असून त्यांतील रमाबाईच्या शोकानें वाचकाचें मन विदीर्ण होतें.

जी पोवाड्यांच्या बाबत स्थिति तीच प्रभाकराच्या लावण्या बाबतहि आहे. प्रभाकराची ग्रंथरचना इतर कोणाहि शाहीरापेक्षां संख्येनें जशी अधिक आहे तशीच ती गुणांतहि वरचढ आहे. प्रसाद हा तर होनाजीप्रमाणें त्याचा प्राणच आहे. परंतु त्याच्या वर्णनांत वेचकपणा, चमत्कृति आणि अनुरूप अर्थानुकारी शब्दयोजना व रसांचा गाढपणा हे विशेष गुण आहेत. पंढरपुरच्या विठोबावर, कृष्णाच्या मुरलीवर व आणिकही इतर पौराणिक कथांवर होनाजी, रामजोशी, परशराम सगळ्यांनींच कवनें रचिलीं आहेत; पण प्रभाकराच्या त्या त्या विषयावरील लावण्या आपल्या विशेष लावण्यानें तेव्हांच चमकून नजरबंद करतात. होनाजी बाळाच्या “ घनःश्याम सुंदरा ” या भूपाळी सारखीच थेट—प्रभाकराची

" झडकरि हरि गोविंदा मुरारी ।
अरुण उदय होऊ पाहे सरलि रात्र सारी । "

ही भूपाळी आहे. ती होनाजीपेक्षां कोणत्याच गुणांत कमतर नसता तिचा उदयकाळ येऊं नये हा केवळ योगायोगाचा प्रकार म्हणावा लागतो ! प्रभाकराची मुरली तर वर्णनाच्या बाबतींत गोविंदाग्रजासुद्धां कोणाहि आधुनिक मान्य कवीच्या कवितेशीं मानानें बसण्याइतकी सरस आहे.

" अघटित नित करणी करतो नंदाचा नंदन कान्हा ।
तृण त्यागुनि सर्वहि धेनू वत्साविण घालिती पान्हा ।
स्तन अदरे वदनीं देता, पय प्राशन करिना तान्हा । "

किंवा

" निर्वैर धरित्री झाली, चाटितात व्याघ्र करीना ।
भेटतात सन्मुख अंगे, शार्दुल अणि शरभ हरीना ।
निर्जिवास सये जिव आले, श्रव सुटले महान् गिरीना ।
नव पल्लव तरुंना फुटती, गर गर्जुन मधुकर उठती ।
अंतरिक्षि तारे तुटती ।
अंबरांत नाद न माई ।
मुरलीनें मन अवघ्यांचे मोहिले ग सखये बाई । "

कालिया मर्दनाची कथा,

" भागवतांतील गोड कथा शुक परीक्षितीला सांगे बरी ।
त्याच कथेचें कवन प्रभाकर करुन सभा डोलवी खरी । "

असे प्रभाकरच सांगतो. परंतु ती कथा आपल्या शब्दप्रभुत्वानें आणि रचनाशैलीनें दुधांत साखर घातल्याप्रमाणें त्यानें अधिकच गोड कशी केली आहे हें मुळांतूनच ती लावणी वाचल्याखेरीज कळणार नाहीं. कालियाच्या विषामुळें जल स्थल आकाश सर्व कसे विषमय झाले होतें त्याचें प्रभाकराचें वर्णन पहा,

" स्नान पान सगळेच राहिले दुरूनि दर्शन मात्र घडे ।
मीन मगर उसळोनि सोडिती प्राण तिराच्या पलीकडे ।

पक्षि उडुनि अंतरिक्षिं जातां उजळुनि ते जळिं गळुनि पडे।
अरण्य झाले शुष्क सभोंतें यमुनाजळ गरळानें कढे। ”

पंढरीच्या विठ्ठलाचें वर्णन परशराम, होनाजी, रामजोशी यांनींहि केलें आहे पण हें प्रभाकरचें वर्णन पहा,

“ चंद्रभागेच्या तिरीं विटेवर कटि कर ठेवुनी उभा।
भक्तांचा कैवारि सांवळा त्रैलोक्याचा सुभा।
ध्वजा पताका सोडुनि साधू नाचताति देवळी ।
चरणी रुळ करिं चिपळ्या वदती मुखानें नामावळी ।
पीत वसन कासेस कसुन वर शालजोडि पीवळी ।
तुळशिहार शुभ अपाद मिरवे तनु सुंदर कोवळी ।
धर्माघरिं जी काढि हातानें उच्छिष्ट पत्रावळी।
तीच मूर्त ही विटेवर नटली घनःशाम सांवळी. ”

शृंगार हा तर लावण्यांचा प्राण. प्रभाकराच्या शृंगारिक लावण्या खूपच आहेत. त्या अश्लील व बीभत्स अर्थातच आहेत. तथापि त्यांतहि त्याचे कवित्व इतरांपेक्षां अधिक उसळून येतें. प्रभाकर हा इतर सर्व शाहिरांपेक्षां सुसंस्कृत, पेशानें प्रतिष्ठित, उच्च नागरी जीवनाशीं परिचित यामुळें त्याच्या शृंगारिक लावण्यांतहि बीभत्सपणा असला तरी अडाणीपणा नाहीं. त्यानें वर्णिलेलीं सर्व विलासी वर्णनें राजधानींतील शिष्ट विलासवान् मर्द फाकड्याचीं आहेत. असो शृंगारिक लावण्या खेरीज समाजस्थितिदर्शक अशा प्रभाकराच्या कांहीं कांहीं लावण्या आहेत. तेवढ्यांचाहि आस्वाद घेतला असतां मन प्रसन्न होऊन जाईल. कोणी विरहिणी स्त्री म्हणते—

“ केलि मजसाठीं रंगीत हवेली खासी,
छते आरशांची बशिवली रंग गुलबासी ॥
खांब चौगर्दा सरुदार माधिल मजल्यासी,
रेशमी दोऱ्या शोभतात झोंपाळ्यासी ॥
रुजामे खालीं मऊ साफ स्वच्छता त्यासी,

सभा इंद्राची आणली याच ठायासी ॥
हवाशिर उडति कारंजी ठाई ठाई,
छड्या निट गेल्या गुलछबू फुलल्या जाई " ॥ २ ॥

आपल्या सरदार पतीबरोबर लष्करांत गेलेल्या एका स्त्रीनें लष्कराचा मुक्काम हालून पुढच्या नव्या तळावर जाण्याची लष्कराची तयारी होते त्याचें जें उत्कृष्ट चित्र काढलें आहे तें काव्य व इतिहास या दोन्ही दृष्टींनीं अप्रतिम वाटतें.

" उठा उठा हलवितें आतां पहा पहाट फारच झाली,
व्हा जागृत प्रियकरा कुचाची खरी नौबत वाजुन राहिली ॥धृ०॥
करुन मघां जिनबंदी सख्या पुढें स्वतांच बिनिवाले सरले ।
सरंजामि सरकारि एकांडे ठळक ठळक मागें उरले ॥
र व पडली पहा उंट तटें किती सौदागर देशावरले ।
हाका आरोळ्या देति भयंकर मार्ग चुकुन डोंगरिं शिरले ॥
कठिण घाट आज म्हणुन मुळीं अधि फकिर आणी ढाले फिरले ।
अजुन आपण निद्रिस्त तशामधीं होती मुक्काम फार दुरवरले ॥

( चाल )

पहाटेची झोंप अति गोड केवळ शर्करा ।
उठुं नये वाटतें खरेंच किं हो प्रियकरा ॥
सुखरूप शयन मजलीस गेल्यावर करा ॥

( चाल )

सगुण गुणगंभीरा तुला कशी दुगराचि रे सोसेल कहाली ॥ १ ॥
बृहस्पती शशि दैत्यगुरू तिघे तेजहीन तेजीं बुडले ।
इतर तारे तर लहान केवळ मग दिसतिल कोणीकडले ॥
श्रिमंत प्रभुचे रमणुकिचे ताळिं दल बादल डेरे पडले ।
नवे मंडप सजदार गजावर खांब सहित सारे भिडले ॥
ठाई ठाई तासे तबल तुडुम तिनीं तयारिचे मर्फे झडले ।
आरब रोहिले सिंदी सोरटी कुलतमाम जन गडबडले ॥

( चाल )

आसवलें व्याघ्र या वनांत वृक हिंडती ।
दिवसास परस्पर मनिं निर्भय भांडती ॥
ज्या स्थळीं भुतें झोटिंग पिठें कांडती ॥

( चाल )

अशा गती श्रुत असुन कसे जसे स्वस्थपणें निजलां महालीं ॥ २ ॥
चपळ पंचकल्याण निळे एक एक सुरेख घोडे दिसती ।
उबार दाण्यासाठिं हुजुरच्या कुमेद नरमाद्या हिंसती ।
दूध खिरी शिंगरें पिती सुरू अपेट जे जे वळु असती ।
चारजामे जिन ठेउन अंधारी देउन गडी बळकट कसती ॥
उमेदवारी निवट गोहो कांहीं तयांत कुणी ब्राह्मण असती ।
सर्व कर्म सारून अगोदर एव्हांपासुन रोखुनि बसती ॥

( चाल )

जाहले रथारूढ नभांत नारायण ।
लागलें काल कडकडित उत्तरायण ।
कुठवर तरी करूं आर्जव पारायण ॥

( चाल )

निबिड अरण्यामधीं अशि कशी निचिंतपणाची घडी वाहली ॥ ३ ॥
दिन दुनयेचे मुगुटमणी राव सुचिन्हमंडित छत्रपती ।
त्यजुन सौख्य सुखशेज यथाविधी सुरेश्वरापरि तप तपती ॥
आपआपल्या गुणें शहाणपणें चारी वर्ण शरिरद्वारा खपती ।
चंद्रदर्शनासाठीं सदोदित लक्ष लावुन चातक जपती ॥
स्वहित हिताचें आर्जवितें तरी तुम्हास माझे शर खुपती ।
धर्मस्वरुप साक्षात जयाच्या स्मरणें करुन संकटें लपती ॥

( चाल )

जा जा हो, या हो रायांची भेट घेउनी ।

कुच करूं आपण मग पंचामृत जेउनी ।
करी कवन गंगु हैबती जिवन ठेवुनि ॥

( चाल )

महादेव गुणिराज म्हणे ही चतुर सुगर कांता पाहिली ।
प्रभाकरावर मर्जी बहाल दोघांची बहुत जहाली ॥ ४ ॥
व्हा जाग्रत प्रियकरा ॥धृ०॥

प्रभाकराच्या भाषेचे व वर्णनाचे पुढील चुटके पहा.

" मुख मार्जन करुन फिरुन । देति कनक मोती ।
तेजहीन झळमतात सकल दिपज्योति "

किंवा

" झुळझुळ वारा वहातो चांदणें थंड ग ।
झगमग तारे करती आकाशीं उदंड ग । "

किंवा

" शिळंधार पर्जन्य झडीचा, थंड सुटला गारवा ।
उठा उठा वर चला म्हणुन जणु फिरे भंवति पारवा ॥ "

किंवा

" नयन पाहुन मृग सगळे हृदयीं त्रासती ।
साग्र सरळ नासाग्र विलोकुन शुक चुंचा घांसती ।
इतर मिळुन द्विजपंगती दुरुन हांसती ॥

किंवा

टवटवित गाल नाहिं पडलि कुठे वळकटी ।
स्वादिष्ट सुटे मकरंद मुखातळवटीं ।
कोय आम्र फळाची अति पातळ इनवटी । "

किंवा

" कृत्तिकेचा काय घोंस तुरा नव पदरी सरस वर्णिचा ।
चौकडा सुढाळ नग कर्णिचा "

किंवा

“ तुडुम नौबती तंबुर बिनिवर मेघापरी गाजती ।
सजेले रथ भंवते साजती ॥
कडिकंठ्यांचे स्वार पदाती उदंड ते राजती ।
पाहुन नृप मांडलीक लाजती ॥
बहुत दुतर्फा घण घण नादें गजघंटा वाजती ॥
किती भालदार भाट गर्जती ॥

( चाल )

बाई घटाव खुब स्वारीचा ।
चाले गोल थटुन बहारिचा ।
पडे प्रकाश अंबारीचा ”

किंवा

बाळा बहिरुच्या ‘ अस्त्री प्रलयंगता ’ या लावणींत लढाईवर चाललेला शिलेदार आपल्या दयितेचे प्रेमपाश मन निष्ठूर करून तोडून जात असतो तशाच धर्तीची

“ परम परदेश कठीण कांते । कसें ग तुज न्यावें सगुण शांते ॥
नाहीं पाहिलें उष्ण कधिं ग आजवर तूं सुकांते; ”

ही प्रभाकराची लावणी आहे. तींत शेवटीं नायक म्हणतो,

“ स्वस्थ सावलिंत रहा घरीं तूं । शोक सागर हा दूर करी तूं ।
तुझ्या गळ्याची आण त्वरित येउं घरिं भाग्यवंते ।
ठेवुन हस्तीवर जरि पटका ।
निघाले रायसाहेब कटका । नको घालुं अडकाठि
साजणी कर आमुची सुटका ॥
सोसेना ममतेचा चटका ।
आदर उपचार आतां लटका ।
पाहुन तुझें दीन म्लान वदन । मारितां नये झटका ॥
एकांतीं बसलो सा चार घटका ।

बोल बोलसी तरी तुटका ||
सोड सोड जाउदें नको धरुं कोमल करिं पटका. ”

किंवा

“ फवारे उडती कारंजी पुढें रंगाची हो ।
तरंगती बदके उदकावर कनकांगाची हो ”

अशी किती उदाहरणें द्यावींत ?

एकंदरींत रामजोशी, होनाजी, अनंतफंदी व परशराम हे मराठी शाहिरी काव्याचे मुख्य चार मजबूत खांब मानले तर प्रभाकर हा त्यांवरील कळस म्हणावा लागेल.

रामजोशी, होनाजीबाळ, अनंतफंदी आणि परशराम हे चारी शाहीर आपापल्या परीनें श्रेष्ठ आहेत. परंतु प्रभाकराशीं तुलना करण्याला यांपैकीं कोणीहि शाहीर टिकाव धरूं शकणार नाहीं. रामजोशी हा व्युत्पन्न व संस्कृत भाषेशीं चांगलाच परिचित आहे. परंतु तो प्रभाकराप्रमाणें भाषाप्रभु नसून नुसता शब्दप्रभु वाटतो. एकाद्याला शब्दकोश पाठ असला तरी त्याला रसिकांचा हृदयकोश उमलवून दाखवितां येणार नाहीं. तें साधावयाला शब्दांचें अर्थानुकारित्व, औचित्य समजावें लागतें. रामजोशाजवळ त्याचा सर्वस्वीं अभाव आहे. त्याच त्या अक्षरांनीं भरलेल्या बाराखड्याप्रमाणें त्याच्या अनुप्रासमय ओळी वाटतात. मटमट, चटचट, फटफट असली उत्तान चित्र काव्याची खटपटच त्याच्या काव्यांत दिसून येते. होनाजीबाळांत प्रसाद आहे पण प्रतिभा प्रभावी नाहीं. विषय-वैचित्र्य आहे पण वर्णनाचा विलास नाहीं. त्याच्या काव्यांत भावना आहे पण ती व्यक्तपणानें वठवण्या इतपत सरस भाषाप्रभुत्व नाहीं. अनंतफंदी याचा उल्लेखहि केला नाहीं तरी चालण्यासारखे आहे. येऊन जाऊन परशरामच तेवढा प्रभाकराशीं बराचसा टिकाव धरूं शकेल. प्रभाकराचे पुष्कळसे कवित्व गुण त्याचा कवितेंत आढळतात.

त्याची प्रतिभा उज्ज्वल आहे, त्याची वर्णनशैली अचुक आहे, भाषा जोरदार आहे, विषयवैचित्र्यहि भरपूर आहे. या गुणांत तो प्रभाकराची थोडी फार बरोबरी सुद्धां करूं शकेल. परंतु रसांचा गाढपणा आणि भाषेचे प्रौढ नाजुक प्रसादपूर्ण परंतु तितकेंच ललित स्वरूप हे जे प्रभाकराचे विशेष गुण, त्याचा मात्र परशरामांत अभाव आहे. त्याची भाषा ठोसर आहे व रसाविर्भाव प्रभावी नाहीं.

रामजोशी, होनाजी बाळ, आदि प्रत्येक शाहीरानें आत्मस्तुति मुक्तकंठानें गायिली आहे. परंतु ती त्यांना तितकी शोभत नाहीं. उलट प्रभाकरानें मात्र जी स्वतःची प्रौढी ठिकठिकाणीं सांगितली आहे ती त्याच्या सरस कवित्वामुळें अगदीं यथार्थ वाटते. त्यानें स्वतःच्या तोंडानें आपले जे गुण म्हणून सांगितले आहेत अगदीं तेच कोणीहि रसिक टीकाकार त्याचे गुण-विशेष म्हणून सांगेल.

“ किती प्रभाकराचें कवन मधुर दिलदारी ।
भरि अर्थ यमक अंत्यामधि रंग करारी ”

“ प्रभाकराचें कवन प्रतिष्ठित सभेंत गायाला । ”

“ प्रभाकर गातसे सदा दिलखुलासी ”

“ प्रभाकराची जडण अमोलिक जसा शिरीं शिरपेंच तुरा ”

“ प्रभाकर कविची कविता अमृतासमान ”

“ प्रभाकराची जडण घडण खडखडित म्हणायाला ”

“ काय प्रभाकराची बाणी । शुद्ध अधि वाणी ।
अर्थ खुब छाणी । करा कुणि पाहाणी ।
सरळ कडी गुंफली ”

## अभ्यासाच्या वाटा

( १ प्रभाकराचा जन्मकाल ठरविण्याला कोणतीं प्रमाणें उपयोगी पडतात ?

( २ ) गंगु हैबतीच्या फडाविषयींची माहिती लिहा.

( ३ ) प्रभाकराचे अखेरचे दिवस कसे गेले ?

( ४ ) प्रभाकराच्या काव्यनिर्मितीबद्दलची माहिती लिहा.

( ५ ) प्रभाकराच्या पोवाडे-लावण्यांची वैशिष्ट्यें कोणतीं ?

( ६ ) ' मुरली ' या विषयावर मराठींत कुणी कविता लिहिल्या आहेत ? प्रभाकराची ' मुरली ' काव्यदृष्ट्या तुम्हांस सरस वाटते का ?

( ७ ) ' प्रभाकर हा शाहिरी वाङ्मयमंदिराचा कळस आहे ' या विधानाची चर्चा करा.

## कांहीं शाहिरी वाङ्मय

१. रामजोशी

२. होनाजीबाळ

३. अनंतफंदी

४. परशराम

५. प्रभाकर

६. सगनभाऊ

या शाहिरांच्या कविता पुस्तकरूपानें प्रसिद्ध झालेल्या असून त्यांपैकीं पहिल्या पांच पुणें येथील चित्रशाळेनें प्रकाशिल्या आहेत. सगनभाऊची कविता १९२४ सालीं रा. अधिकारी यांनीं प्रकाशिली होती.

## इतर साहित्य

१. ऐतिहासिक पोवाडे अथवा मराठ्यांचा काव्यमय इतिहास
भाग १ व २ : लेखक य. न. केळकर.

२. मराठी कवितेचा उषःकाल किंवा मराठी शाहीर
लेखक : श्री. म. वर्दे.

३. महाराष्ट्र सारस्वत
लेखक : वि. ल. भावे, नवी आवृत्ति. या ग्रंथांत शाहिरा-संबंधीं स्वतंत्र प्रकरणच आहे.

४. कै. न. चिं. केळकर यांचा लेख—" मराठ्यांचे ऐतिहासिक पोवाडे " हा लेख केळकरांच्या इतिहास-विहार पुस्तकांत छापलेला आहे.

५. मराठी कवितेची प्रभात
लेखक : अ. ब. कोल्हटकर.

# य. न. केळकर यांचे ग्रंथ

१. गीत द्विदल काव्यसंग्रह

२. गीत गुंफा ,,

३. ऐतिहासिक पोवाडे खंड १

४. ,, ,, २

५. भूतावर भ्रमण (ऐतिहासिक लेखसंग्रह)

६. इतिहासांतील सहली

७. वसईची मोहिम

८. चित्रमय शिवाजी

९. तिसऱ्या महायुद्धाच्या छायेंत
(परराष्ट्रीय राजकारणविषयक)

१०. विनोद लहरी (विनोदी लेखसंग्रह)

११. कै. न. चिं. केळकर यांचा खासगी पत्रव्यवहार
खंड १ ला